।। श्री गुरुशरणम् ।।

नित्यशुध्दं निराभासं निराकारम् निरंजनम् ।
नित्यबोधं चिदानंदम् सद्‌गुरु त्वम् नमामि ।।



# प.पू. सद्‌गुरु श्री सिध्दयोगेश्वर महाराज

## अमृत महोत्सव समारंभ : स्मृतिग्रंथ - २००२

# अनुक्रमणिका


जागृत-कुंडलिनीशक्तीची काही लक्षणं ........ 3
दिव्यत्वाची जेथे प्रचिती... ........ 5
अरुण गुजराथी - शुभेच्छा ........ 6
सुरेश प्रभू - शुभेच्छा ........ 7
श्री. गजानन हेरंब तथा काकासाहेब पटवर्धन – शुभेच्छा ........ 8
प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज व महायोगाचे सामर्थ्य ........ 9
श्री सद्‌गुरुकृपा ........ 11
कृपाप्रसाद ........ 14
शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी... ........ 15
शक्तिपात योगाचे शास्त्रीय विवरण ........ 31
नमामि सद्‌गुरु ........ 34
अध्यात्म्याचा महामेरु | माझे सद्‌गुरु || ........ 35
सगुण आणि निर्गुणातील फरक दाखवून देणारे प. पू. श्री सिद्धयोगेश्वर महाराज ........ 38
साधकांसाठी..... ........ 40


ghagmaharaj.guru

# जागृत-कुंडलिनीशक्तीची काही लक्षणं

-- प. पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराज

ज्यावेळी शरीर कापू ळागेळ, रोमांच येऊ लागतील, इच्छा नसतानाही हास्य वा रडू येऊ लागेल, मुखावाटे विकृत शब्द येऊ लागतील, भय उत्पन्न होईल, त्यावेळी समजावे की कुंडलिनी शक्ती कार्यशाली बनली आहे.

ज्यावेळी आसन स्थिर होईल, उड्डियान, जालंधर, मूलबंध स्वतः होऊ लागतील; जीभ उलटी होऊन ठाळूत जाईल, आतून इतकी स्फूर्ती होईल की स्थिर बसता येणार नाही, हातपाय बलाने खेचू लागतील, त्यावेळी परमशक्ती कुंडलिनी क्रियाशील झाली आहे असे समजावे.

ज्यावेळी मूलाधारातून प्राणकलेचा प्रवाह सहस्त्रारात जात आहे असे दिसून येईल; अंतःकरणात प्रणवजप स्वतःहून होऊ लागेळ, आणि प्राणाच्या वर चढणाऱ्या प्रवाहाबरोबर मनाला नाना प्रकारच्या सुखाचा अनुभव येऊ लागेल, त्यावेळी कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाली आहे असे समजावे.

ज्यावेळी मनात आवेष येईल व असे वाटेल की शरीरात कोणीतरी प्रवेश केळा आहे, त्या आवेशात नाना प्रकारची आसने बळाने होऊ लागतील व कोणत्याही प्रकारचे कष्ट विफल वाटणार नाहीत, उलट आनंदच वाटू लागेल, त्याचबरोबर विशिष्ट प्रकारचे प्राणायाम होऊ लागतील; त्यावेळी समजावे की ईरवरी शक्ती -कुंडलिनी देवीशक्ती क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी शरीराच्या निरनिराळ्या भागात प्राणाची गती समजू लागेल व मन ज्या ज्या ठिकाणी लागेल त्या त्या ठिकाणी प्राणाच्या क्रियेचाही अनुभव येऊ लागेल आणि स्नायू मंडलात विधुतशक्ती प्रमाणे सुखसाध्य क्रियांचा अनुभव येऊ लागेल; त्यावेळी समजावे की कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी अष्टौप्रहर आतून काहीतरी क्रिया चालल्याचा अनुभव येऊ लागेल. कोठेही मन एकाग्र होताच शरीर कापू लागेल, अथवा इच्छा नसताही शरीर हलू लागेल, मलीन शौचकूपासारख्या ठिकाणी बसले असताही मन आनंदमग्न क्रियात्मक राहील, निजतानाही प्राणाचा प्रवाह सहस्त्राराकडे जात असल्याचा भास होईल आणि स्वप्नातही मन क्रियात्मक राहील; तर समजावे की अल्हादिनी कुंडलिनी शक्ती क्रियाशीळ झाली आहे.

ज्यावेळी प्रात:काळी अथवा सायंकाळी इच्छा नसतानाही क्रियेचा वेग वाढू लागेल आणि त्या योगाने शरीर-मन-प्राण-विवश होईल, त्यावेळी समजावे की महादेवी-कुंडलिनी देवी-उत्तम कार्य करू लागली आहे.

ज्यावेळी साधनेला बसले असता मनाचे सर्व संशय नाहीसे होतील, कोणत्याही शात्राचा थोडा अभ्यास करताच त्याचे मर्म, भावार्थ बुद्धीला आकलन होऊ शकेल आणि आत्मनिष्ठा होईल; त्यावेळी समजावे की सिद्धशक्ती कुंडलिनी क्रियाशील झाली आहे.

मूलाधारत कंप होऊ लागणे, शरीर कापू लागणे, कुंभक रोखण्याचा प्रयत्न केला असताही तो न होणे, श्वासप्रश्वास जोराने होणे, इच्छा नसतानाही श्वास-प्रश्वास दीर्घ होऊ लागणे, शरीराचा तोल सांभाळला न जाणे, इत्यादी लक्षणं होऊ लागली म्हणजे समजावे की कुंडलिनी शक्ती जागृत होवून ती कार्य करू लागली आहे. त्यावेळी निर्भय होऊन चुपचाप बसून काय होत आहे ते पहात राहिले पाहिजे.

ज्यावेळी आसन दृढ होईल, दृष्टी भ्रूमध्यात राहून डोळ्याचे तारे फिरू लागतील आणि आपोआप केवल-कुंभक होईल; मन बाह्यज्ञान शून्य, निष्क्रिय होईल; त्यावेळी समजावे की महामाया आद्यशक्ती कुंडलिनी देवी क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी डोळे बंद करून आसनावर बसताच संकल्प करण्याबरोबर शरीरात चेष्टा होऊ लागतील. हातपाय फेकले जाऊन बलात्काराने मुखावाटे विकृत शब्द निघू लागतील किंवा कोल्हा, कुत्रा, मांजर, वाघ, सिंह इत्यादी प्राण्यांचे, आवाज जे ऐकावयास कठोर, भयानक व उच्छृंखल असे शब्द मुखावाटे निघू लागतील; त्यावेळी समजावे की रुद्राणी महाशक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशील झाली आहे.

Copyright © ghagmaharaj.guru  ghagmaharaj.guru@gmail.com

ज्यावेळी नाना प्रकारचे शब्द होऊ लागतील; मेरुदंडात कंप होऊ लागेल; शरीर शून्य होईल; अथवा शरीर नाहीच असे वाटेल - सर्व शून्य वाटू लागेल; डोळे उघडण्याचा प्रयत्न केला असताही उघडले न जाणे, शरीरात विद्युत-प्रवाहाचा संचार झाल्यासारखे वाटणे, अथवा शरीर खेचल्यासारखे वाढू लागणे अशा प्रकारची लक्षणं होऊ लागल्यास; त्यावेळी महामाया कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाली आहे समजावे.

ज्यावेळी आसनावर बसताच शरीर ढळू लागेल, आनंदाने गाणे सुरू होईल व त्यातील रागरागिणी अशा प्रकारचे असतील की ऐकणारे मुग्ध होऊन जातील व त्यातील पद्यरचना स्वतःच रचल्या जातील. हाताने तालबद्ध टाळी वाजत राहील. अनेक प्रकारच्या भाषेतील अर्थज्ञानरहित उच्चारण होऊ लागतील, त्याची भाषा कोणाळा समजली नाही तरी ऐकताना मनाला आनंद उत्पन्न होईल त्यावेळी समजावे की सरस्वतीरूपी कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी आसनावर डोळे बंद करून बसताच स्वप्नातीत अवस्था होईल; देवी-देवतांचे दर्शन होऊ लागेल; दिव्य गंध, रुप, रस, आणि स्पर्श यांचा अनुभव येऊ लागेल आणि देवतांकडून आदेश मिळू लागतील, त्यावेळी समजावे की दैवीशक्ती कुंडलिनी क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी साधनेला बसल्याबरोबर मन एकाग्र होऊन देवी-देवतांबरोबर बोळणे होऊ लागेल, त्यांच्याकडून रोगाचे औषध मिळेल. विघ्ननाशार्थ दैवीमंत्र मिळेल, सिद्ध पुरुषांकडून योगाचा अथवा ज्ञानाचा उपदेश मिळेल; त्यावेळी समजावे की सिद्धि प्रदायिनी कुंडलिनीदेवी क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी रस्त्याने चाळताना मनात आवेश निर्माण होईल आणि असे वाटू लागेल की तेथून उठून जावे; जमिनीला पाय लागताच पळणे सुरू होईल; शरीर वायूप्रमाणे हलके होऊन उडत आहे असे वाटेल, कितीही चालले तरी थकवा येणार नाही; मन प्रफुल्लित व प्रसन्न राहील. स्वप्नातदेखीळ अप्रसन्नता येणार नाही, इष्ट अथवा अनिष्ट गोष्टींनी मन विचळित होणार नाही आणि साधकाला कोणतेही काम क्लिष्ट वाटणार नाही; त्यावेळी ब्रह्मशक्ती कुंडलिनी क्रियाशील झाली आहे असे समजावे.

ज्यावेळी आसनावर बसून क्रिया करण्याचा संकल्प करताच आपले सूक्ष्म शरीर प्रत्यक्ष भासू लागेल, स्थूल शरीराचे अस्तित्व भासणार नाही, डोळे उघडले असता सर्व शून्य भासेल व वेळेचे भान राहणार नाही; त्यावेळी समजावे की चित्तशक्ती कुंडलिनीशक्ती क्रियाशील झाली आहे.

ज्यावेळी आसनावर बसताच भ्रूमध्यात दृष्टी स्थिर होईल, जिव्हेने खेचरी मुद्रा होईल (जीभ उलट होऊन पडजीभे मागील पोकळीत जाईल), प्राणप्रवाह अगदी बंद होईळ, मन आनंद सागरात मग्न होऊन जाईल, शांभवी मुद्रा सिद्ध होईल, सविकल्पाच्या सुखाचा अनुभव येऊ लागे | त्यावेळी समजावे की योगशक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशील झाली आहे.

## दिव्यत्वाची जेथे प्रचिती...

प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराजांचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा योग त्यांच्या सर्व साधकांना प्राप्त झाला आहे. यामुळे साधकांना अत्यानंद होणे स्वाभाविकच आहे.

प. पू. महाराजांनी स्वतःला अनेक वर्ष प्रसिद्धी पासून जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे आणि आपले क्षेत्र आपल्या साधकांपुरते सीमित ठेवून त्यांना महायोग सामर्थ्य देण्याचे महत्वपूर्ण कार्य सुरू ठेवले आहे. या दोन्ही गोष्टींची जाणीव व प्रचिती साधकांना आल्यामुळे त्यांचे महाराजांवरील उदंड प्रेम आज आपणांस दिसून येत आहे.

अनेक उदासीन, वैफल्यग्रस्त, व्याधीयुक्त मंडळी महाराजांकडे येतात त्यावेळी महाराजांच्या केवळ प्रथमदर्शनी कृपाकटाक्षानेच ते अर्धमुक्त होतात. महाराज त्यांना सल्ला देतात आणि त्यानंतर ही मंडळी महाराजांचे कायम साधक बनून महाराजांच्या मार्गदर्शनाने आपल्या संसारात सुखी-समाधानी होतात. हा सारा चमत्कार प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या "गुरुप्रसाद" या वास्तूत अनुभवायास मिळत असते.

सर्व साधकांमध्ये कमी-जास्त प्रमाणात आत्मशक्ती  ही जन्मजात असतेच. ज्याप्रमाणे एखाद्या अग्नीवर राखेचे पूट जमल्यामुळे त्याचा प्रभाव जाणवत नाही, त्याचप्रमाणे आत्मशक्ती वर जमलेल्या या राखेवर फुंकर मारुन ती दूर करण्याची किमया महाराजांकडे असल्यामुळें ते साधकांमधील आत्मशक्ती च्या अविष्काराचे प्रकटीकरण करतात व त्यांना तीच्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. ज्यावेळी साधकांना ही जाणीव होते त्यावेळी त्यांना आश्चर्य तर वाटतेच, त्याचबरोबर त्यांना महाराजांच्या अलौकिक दिव्य सामर्थ्याची प्रचिती येऊन ते महाराजांसमोर आपोआपच कृतज्ञतापूर्वक नतमस्तक होतात. "दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती" हे स्वाभाविकच आहे.

प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराजांचा अमृत महोत्सव कृतज्ञतापूर्वक सारे साधक बंधू साजरा करत आहेत. सर्वांच्या मनामध्ये एकच हेतू आहे; तो म्हणजे महाराजांना उदंड आयुष्य लाभावे, उत्तम आरोग्य प्राप्त व्हावे व सर्व साधक बंधूंना त्यांच्या मायेची उब कायम मिळत रहावी. महाराजांनी जे दिले आहे त्यापेक्षा अधिक कोणतीच इच्छा न धरता त्यांना सुख समाधान मिळावे एवढीच साधकांची इच्छा आहे.

प. पू. बाबांना उदंड आयुष्य लाभावे, ही परमेश्वर चरणी प्रार्थना!

अ‍ॅड्. शशिकांत पवार

अध्यक्ष

अमृत महोत्सव समिती



ghagmaharaj.guru

# अरुण गुजराथी - शुभेच्छा

अरुण गुजराथी

अध्यक्ष

महाराष्ट्र विधानसभा

दिनांक ८ ऑक्टोबर, २००२

प. पू. श्री. सद्गुरु सिध्दयोगेश्वर महाराज यांचा अमृत महोत्सव दिनांक १० नोव्हेंबर २००२ रोजी साजरा करीत आहात हे जाणून आनंद झाला. सिध्दयोगेश्वर महाराज यांनी निगर्वीपणे साधकांना आध्यात्मिक व दैवी शक्ती चे महत्व व तिच्या प्राप्तीचे उपाय सांगून त्यांचे दैन्य दूर करण्यात फार मोलाचे सहकार्य केले आहे. प. पू. श्री. सद्गुरु सिध्दयोगेश्वर महाराज यांना दीर्घायुरोग्य लाभो व साधकांचे दैन्य दूर करण्यात असेच सहकार्य मिळो, अशी परमेश्वर चरणी प्रार्थना!

उपरोक्त कार्यक्रमानिमित्त प्रसिध्द करण्यात येत असलेल्या स्मरणिकेस माझ्या शुभेच्छा.

(अरुण गुजराथी)

अध्यक्ष,

प. पू. श्री. सद्गुरु सिध्दयोगेश्वर महाराज

अमृत महोत्सव नियोजन समिती,

गुरुप्रसाद २ रा माळा, ११ डी. एस. सोहनी पथ,

गिरगांव, मुंबई ४००००४.

ghagmaharaj.guru

# सुरेश प्रभू - शुभेच्छा

दिनांक: ७ नोव्हेंबर, २००२

**संदेश**

प. पू. सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्ताने प. पू. सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज अमृत महोत्सव नियोजन समितीतर्फे वयोवस्थानिध - शन्तिसमुच्चय: कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याने वाचून आनंद झाला.

प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या वयाचा अमुत महोत्सवी कार्यक्रम साजरा करणे म्हणजे त्यांनी अध्यात्मिक क्षेत्रात सिद्धयोग साधनेद्वार दिक्षा देऊन अनेक साधकांना जीवन सुख, शांती आणि समाधानी बनविण्याचा सातत्याने जो प्रयत्न केला त्याबद्दल पण श्री सिद्धयोगेश्वर महाराज यांची कृतज्ञता व्यक्त करण्याजोगे आहे.

आपण साजरा करीत असलेल्या प. पू. सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

(सुरेश प्रभू)

श्री. शशिकांत पवार

अध्यक्ष,

प. पू. सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज अमृत महोत्सव नियोजन समिती,

गुरुप्रसाद, २ रा माळा, ११/डी,

एस्. व्ही. सोहनी पथ, गिरगांव,

मुंबई - ४०० ००४.

## श्री. गजानन हेरंब तथा काकासाहेब पटवर्धन – शुभेच्छा

|| श्री सद्‌गुरु शरणम् ||

**गुरुबंधू श्री सिद्धयोगेश्वर महाराजांना अमृत महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

श्री. ग. हे. तथा काकासाहेब पटवर्धन व सौ. विमलाबाई पटवर्धन
(श्री. गजानन हेरंब पटवर्धन)

-: साधकांना शुभ संदेश:-

- मंत्र, औषधे आणि गुरु केवळ श्रद्धेनेच फळतात.

- नित्य साधना केलीच पाहिजे. जो चालतो तो एक दिवस पोहचणारच आहे. जो थांबला तो कधीच पोहचणार नाही.

- शक्तिपात दीक्षा मिळालेल्या साधकांची प्रमुख साधना रोज ध्यानास बसणे हिच आहे.

ghagmaharaj.guru

# प. पू. सद्गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज व महायोगाचे सामर्थ्य

- एन. बी. चव्हाण

सदगुरु प्रणित महायोग हे शास्त्र नसून अनुभवाचे क्षेत्र आहे. मनुष्य शरीराचे जे पंचकोष आहेत, त्या कोशांची शुद्धता करण्याचे हे एक उत्तम साधन असून कैवल्य प्राप्तीची खात्री देणारे आहे.

भगवतगीतेत ज्या योगांचे वर्णन केले, ते योग म्हणजे ज्ञान-योग, कर्म-योग व भक्ती योग होत! मनुष्याच्या निसर्गदत्त सत्व, रज व तम या गुणांना अनुसरून ह्यांपैकी एखाद्या योगाचे आचरण करून मनुष्य जे प्राप्त करू शकतो, तेच मनुष्य महायोग साधनेने प्राप्त करू शकतो. सत्वगुणी, तमोगुणी यापैकी कोणीही, महायोगाने त्या परम पदास प्राप्त करतो. त्यास ते प्राप्त होते. अर्थात महायोगाने या तिन्ही योगाचे त्रियोगाचे फल प्राप्त होते.

महायोगात सद्गुरु शिष्याच्या प्राकृतिक गुणांना उच्च पातळीवर घेऊन जातात. त्यांच्या स्वाभाविक गुणांना दैवी सामर्थ्य देतात व परमपदाला नेण्यास मदत करतात.

शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवस्था कशीही असो, सदगुरुंचा आशिर्वाद प्राप्त झाल्यावर, दिक्षा मिळाल्यावर, साधकांची प्रगती तिन्ही स्थरावर स्वाभाविकपणे चालू हाते. हेच या मार्गाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

सद्गुरुंच्या कृपेने शिष्यांची कुंडलीनी जागृत झाल्यावर ही दैवी शक्ति मातेप्रमाणे साधकाच्या हिताच्या दृष्टीने कार्यरत रहाते.

शारीरिक, पातळीवर शरीरातील व्याधींचे उच्चाटण करते. त्यासाठी वेगवेगळ्या शारिरीक क्रिया साधकाकडून घडतात. साधनाकाळात साधक स्वाभाविकपणे वेगवेगळे अंगविक्षेप करतो. त्याने शरीराचे शुद्धीकरण होत जाते. हे अंगविक्षेप म्हणजेच वेगवेगळी व जरूर असणारी आसने, मुद्रा, प्राणायम व बंध होय. साधकाला याबाबत शिकवावे लागत नाही. सांगावे लागत नाही.

या क्रिया स्वाभाविकपणे घडत असल्यामुळे अस्वाभाविकपणे केल्या जाणाऱ्या योगक्रियेमुळे उद्‌भवणारे दोष निर्माण होते नाहीत. परंतु असलेल्या व्याधींचे निराकरण होते.

मानसिक पातळीवर सुद्धा ही शक्ती कार्यरत असते. दिक्षा प्राप्तीनंतर साधकाला शांतीचा अनुभव येऊ लागतो. मनातील विचारांवर व तिव्र भावनांवर ही दैवी शक्ती कार्य करीत असल्यामुळे, साधक शांततेत व समाधानाने व्यवहार करतो. त्यातून त्याच्या व्यवहारिक, आर्थिक भाग्यरेषा उजळून निघतात.

बौद्धिक पातळीवर सुद्धा कुंडलीनी शक्ती कार्य करते. साधना करणारा साधक दिक्षेनंतर आपल्या प्रश्नाची उत्तरे आपणच शोधू शकतो. बुद्धिमध्ये प्रगल्भता व प्रतिभेचा संचार होतो. महायोगातील साधक व्यवहारात आत्मविश्वासाने वावरताना आढळतो.

मला स्वत:ला पुष्कळ शोधानंतर संकल्पाद्वारे दीक्षा देणारे, माझे सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज प्राप्त झाले व मी कृतार्थ झालो.

बाबांची माझी भेट योगायोगानेच झाली. सदगुरुच्या योग्य मार्गदर्शकाच्या शोधात असल्यामुळे कोणाही सत्पुरुषास भेटणे हा माझा छंद होता. आपल्याला पाहिजे, ते मिळेल का? याचा शोध चालू होता.

दिक्षा प्राप्तीनंतर माझ्या शरीरात, मनांत व बुद्धीत शुद्धीकरणाची प्रक्रिया चालू झाली. त्याची प्रचिती थोड्याच दिवसांत आली.

मनाला मोठा आधार व मार्गदर्शक मिळाल्यामुळे मन निश्चिंत झाले. उदासिनता संपून आत्मविश्वासाचे राज्य सुरू झाले. काय करावे? किंवा काय करू नये? याबाबत बुद्धि अचूक निर्णय घेवू लागली.

या काळात आलेले अलौकिक व लौकिक अनुभव बुद्धीच्या ताकदीवर पडताळून पाहणे, व शब्द बद्ध करणे शक्य नाहीत. केलेतरी त्यांतून योग्य तो अर्थ वाचकांना घेता येईलच असे सांगता येणार नाही. कारण हे 'अनुभव' शास्त्रावर आधारीत नसून अनुभवण्याचे ‘शास्त्र’ आहे.

सद्गुरू बाबा हे शाश्वत परब्रह्माचे स्वरूप आहे. याचा अनुभव इतर बहुतेक साधकांना आलेला आहे, येत आहे. परब्रह्म निर्गुण निराकार असल्यामुळे सर्वसाधारण साधकांना ते उमजत नाही; आणि त्याची मन, बुद्धी संभ्रमात पडते.

साधकांच्या या अवस्थेची परब्रह्मास कल्पना असल्यामुळे व त्यांना मार्गदर्शन प्राप्त व्हावे या उद्देशांने साधकांसाठी सद्गुरु अवतरीत झाले आहेत.

परब्रह्मातील ही अगम्यशक्ती पंचमहाभूताच्या साहाय्याने सद्गुरू स्वरुपांत आम्हां साधकांना आशिर्वाद देत आहे, मार्गदर्शन करून संकटात सहाय्य करीत आहे.

सद्गुरूंचा महिमा जाणणे प्रत्येक जीवत्माला शक्य नाही. जेव्हा तो जीवात्मा साधक होऊन सद्शिष्य होतो; तेव्हाच त्या स्वरूपाचे ज्ञान त्याला प्राप्त होण्याची शक्य ता आहे.

सदगुरुंचे मार्गदर्शन, आशिर्वाद त्याच बरोबर साधकांची श्रद्धा व सधना त्याला त्या पदापर्यंत पोहचवते.

प. पू. बाबांचे मार्गदर्शन व आशीर्वाद आम्हां साधकांचा दैवी आधार आहे; त्या आधारावरच आम्ही त्या परब्रह्माचे स्वरूप प्राप्त करण्यास प्राप्त होऊ, असं बाबा नेहमी आम्हांस सांगतात.

बाबांच्या वयाला पंचाहत्तर वर्ष पूर्ण होत आहेत. या काळांत त्यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने आम्हा सर्व साधकांच्या जीवनांत दैवी शक्ती चे अवतरण झालेले आहे. सर्वसाधक प्रगतीपथावर वाटचाल करीत आहेत.काहींना परमात्मा प्राप्तीचा प्रसाद मिळालेला आहे. परंतु त्यांचा प्रचार करता येत नसल्यामुळे त्यांची नावे सांगता येत नाहीत.

प. पू. बाबां बद्दल सर्वच साधकांच्या अंत:करणात त्यांच्याविषयी श्रद्धा, भक्ती आहे. त्यांच्या या दैवी प्रेमातून उतराई होणे शक्य नाही, म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यापुढे आम्ही काही करू शकत नाही.

अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सगुण परब्रह्माचे दिव्य स्वरूप पहाण्यास मिळणार आहे; म्हणून समारंभाच्या निमित्ताने त्यांत सहभागी होण्याचे सदभाग्य आम्हाला लाभत आहे.

आम्ही साधक प. पू. बाबांची भाग्यवान बालके आहोत. बाबा आमचे सर्वस्व आहेत. आधार आहेत. परब्रह्म आहेत! त्यांना सर्वभावे शरण जाऊन, त्यांच्या चरणांवर सर्वभावे मस्तक ठेवून, साष्टांग दंडवत घालीत आहेत. सर्व साधकांवर त्यांची कृपा आहे व तशीच ती राहावी ही मागणी करावी लागणार नाही; कारण तशीच ती राहणार आहे. अशी आमची श्रद्धा आहे.

प. पू. बाबांनी सर्वसाधकांच्या आत्मशक्ती त प्रभावी दिव्य शक्ती ने संचार केलेला आहे. त्यात त्यांच्याच कृपेने वाढ होत आहे. सर्व बालकांना परमात्मा प्राप्ती व्हावी, त्यांना दिव्य आत्मसाक्षात्कार व्हावा, असाच प. पू. बाबांचा संकल्प आहे. विश्वास आहे.

साधकांच्या जीवनात - संसारातही प. पू. बाबांचा आशिर्वाद हा साधकांचे भौतिक प्रश्न सोडविण्यास सहाय्य करीत आहे. सर्वांना त्याचा अनुभव प्राप्त झालेला आहे. या सहाय्याचे भौतिक स्वरूपात मोल करता येणार नाही, हे सर्वांना माहित आहे. अत्यंत प्रेमाने परमेश्वराकडे आम्ही साधक प्रार्थना करतो की, त्याने आमच्या प. पू. बाबांना उत्तम आरोग्यसह उदंड आयुष्य द्यावे!

## श्री सद्गुरुकृपा

- सुरेश सावंत

*गुरु ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।*
*गुरुः साक्षात्परब्रम्हः तस्मै श्री गुरुवे नमः ॥*

अखंड जगतात हिन्दुस्तान ही पुण्यभूमी मानली जाते. अनेक ऋषी मुनी, साधु संतांनी ही भूमी पूनित केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदासस्वामी सारख्या अनेक साधुसंतांची परंपरा लाभली आहे. त्यातूनच गुरु-शिष्य परंपरा ही वर्षानुवर्षे वेगवेगळ्या मार्गाने पुढे चालू आहे आणि त्यांचाच वारसा आपले प. पू. सिध्दयोगेश्वर महाराज चालवित आहेत.

गुरु-शिष्य परंपरेला अनन्य साधारण महत्व आहे. गुरुशिवाय आपण ज्ञान प्राप्त करु शकत नाही. गुरुगीतेत म्हटले आहे, "गुकारस्तकारश्च, रुकारस्तेज उच्चते| अज्ञान ग्रासकं बम्ह गुरुरेव न संशयः ||"

गुरु या शब्दातील 'गु' हे अक्षर म्हणजे अंधार (अज्ञान) आणि 'रु' हे अक्षर म्हणजे प्रकाश (ज्ञान) होय. ह्याचाच अर्थ असा की, "गुरु म्हणजे अज्ञान नाहिसे करुन अध्यात्मिक उन्नती करणारे ब्रम्ह होय, यांत कोणतीही शंका नाही.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर

*गुकारः प्रथमो वर्णो, मायादिगुणभासकः ।*
*रुकारो द्वितीयो ब्रम्ह, मायाभ्रान्ति विनाशनाम ॥*
*॥ २४ ॥ गुरुगीता*

'गु' या शब्दातील पहिला वर्ण 'ग' हा माया व तीचे सत्व, रज आणि तम गुण भासविणारा असून 'रु' हा वर्ण या मायेच्या भ्रमाचा विनाश करणारा ब्रम्ह होय.

*गुरुकृपा हि केवल शिष्यपरम मंगलम ।*

केवळ गुरुकृपेमुळेच शिष्याची अध्यात्मिक उन्नती होऊन त्याचे जीवन मंगलमय होते.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

*सद्गुरुवीण जान कांही । सर्वथा होणार नाही ।*
*अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहतचि गेले ॥*

*ज्ञानविरहित जें जें केले । तें तें जन्मासि मूळ जालें ।*
*ह्मणौनी सदगुरुची पाऊलें । सदृढ धरावी ॥*

गुरुपद हे सर्वश्रेष्ठ असून ते अढळ आहे. जगातील कोणताही मनुष्यप्राणी गुरु मार्गदर्शनाविना असूच शकत नाही. जे देवादिकांना चुकले नाही ते आपल्यासारख्या सामान्यांना कसे चुकेल? ज्यांनी अर्जुनाला अखंड ब्रम्हांडाचे दर्शन घडविले त्या जगद्पिता भगवान श्रीकृष्णाला सांदिपनी ऋषी सद्गुरु म्हणून लाभले. मर्यादा पुरुषोत्तम रामालासुध्दा वशिष्ठमुनींना गुरु करुन घ्यावे लागले. ऋषीमुनी, देवदेवतांपासून गुरु-शिष्य परंपरा चालत आलेली आहे, हे यावरुन स्पष्ट होते.

परमार्थ साधण्यासाठी अनेकांनी ब्रम्हचर्याश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम आणि गृहस्थाश्रमांचा अवलंब केलेला आहे. त्यांच्यात्यांच्यापरीने हे मार्ग श्रेष्ठ आहेत. परंतु जगरहाटी ही कशी असते, त्याला सामोरे सामान्य माणसाला म्हणा किवा प्रत्येक जीवाला म्हणा कसे जावे लागते, त्यांची सुखं, दु:खं, यातना व भोग ह्याची जर आपणांस जाणीव असेल तरच आपण दुसऱ्याच्या व्यथा समजू शकतो व त्याचप्रमाणे उपाय योजना करुन त्या सामान्य जीवाला त्याच्या या व्यथेपासून, विवंचनेपासून मुक्त करु शकतो. ही विचारसरणी असलेला आणि गृहस्थाश्रम स्विकारून जनकल्याण करणे हाच श्रेष्ठ मार्ग होय. प. पू. सिध्दयोगेश्वर महाराजांचा ह्या दृष्टिकोनातून प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. संसारात राहून ही परमार्थ साधून स्वत: सामान्यांसारखे जीवन जगून, कर्मकांडाच्या मागे न लागता भाविक व जिज्ञासुंना शक्तिपात दिक्षा देऊन त्यांना (साधकांना) मन:शांति व मोक्षप्राप्तिचा मार्ग दाखवून देणारे प. पू. सिध्दयोगेश्वर महाराजांनी त्यांचे सदगुरु महाशक्तिपात शिरोमणी प. पू. सिध्दयोगेश्वर गुळवणी महाराजांचा गुरु-शिष्यांचा वारसा या महाराष्ट्रच्या पावनभूमीत अविरत सुरु ठेवला आहे.

मोक्षप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत; पण ते फार खडतर आहेत. त्यास कष्ट पडतात. परंतु सिध्दमार्गामुळे कैवल्य प्राप्ती सहज होते. विनासायास सिध्दमार्ग हा जवळचा मार्ग आणि हा मार्ग फक्त सिध्द सदगुरुच जाणतात. त्यास सिध्दयोग किंवा शक्तिपात योग म्हणतात. सुरुवातीला येणारे सर्वच लोक कांही मोक्षप्राप्तीसाठी येत नाहीत. प्रपंच म्हटला की, सुखं, दु:खं आलीच. काहीजण ऐहिक सुखाच्या प्राप्तीसाठी येतात, तर काहिजण शारिरीक पीडा दूर व्हाव्यात म्हणून येतात. तर काहिजण प्रापंचिक, आत्मिक, अध्यात्मिक अडचणींचे निवारण करण्यासाठी येतात. महाराजांनी सूर्यत्राटक करुन अद्वितीय शक्ती प्राप्त केलेली आहे. तसेच अनेक मंत्राची अनुष्ठाने करुन मंत्र सिध्द केले आहेत. महाराज या मंत्रशक्ती ने गरजू साधकांच्या अडीअडचणी दूर करतात.

सद्गुरुंनी दिलेल्या गुरुमंत्रात एक अफाट अशी शक्ती आहे. गुरुमंत्र ही फक्त अक्षरे नसून ज्ञान, चैतन्य व आशिर्वादाचे द्योतक असून त्याने साधकांची प्रगती होऊन त्यास लवकरच फळ प्राप्त होते. खरं तर सदगुरुंचे लक्ष शिष्याचा ऐहिक किंवा प्रापंचिक सुखाकडे नसते (कारण ते त्याच्या प्रारब्धानुसार असते) तर त्याच्या अध्यात्मिक, प्रगतीकडे असते. आपल्या शिष्याची अध्यात्मिक उन्नती होवो असा संकल्प सदगुरुंच्या मनात आला की मगच शिष्याची खरी प्रगती होते. यालाच 'गुरुकृपा' असे म्हणतात. कृप म्हणजे दया, अनुग्रह किंवा प्रसाद. गुरुंनी दिलेला प्रसाद होय. गुरुकृपेच्या माध्यमातून जीवाचे नाते शिवाशी जोडले जाते. अन्य मार्गांनी साधना करुन अनेक वर्ष फुकट घालविण्यापेक्षा सदगुरु शिष्याची कुंडलिनी शक्ती जागृत करुन त्यास दिव्यदृष्टी प्रदान करतात, यास शक्ती पात असे म्हणतात. आणि साहजिकच या मार्गाने साधकांची (शिष्यांची) उन्नती लवकर होते. ह्याला महायोग असेही म्हणतात. ज्ञानेश्वर महाराजांनी ह्यालाच 'पंथराज' असे म्हटले आहे.

*गुरो: कृपाप्रसादेन, आत्मरामं निरीक्षयेत |*
*अनेन गुरुमार्गेण, स्वात्मज्ञानं प्रवर्तते || ११० ||*
*(गुरुगीता)*

सदगुरुंच्या कृपाप्रसादामुळेच आत्मदर्शन घडते आणि अशाच रितीने गुरुमार्गामुळेच आत्मज्ञान लाभते.

अनेक काळ साधना करुनही विशिष्ठ पातळीच्या पुढे प्रगती न झालेल्या साधकांनी सत्संग करावा म्हणजे सदगुरुंच्या सानिध्यात रहावे. तसे केल्यास सदगुरुकृपेने साधकांची उन्नती होते आणि त्यानंतर अनुभूती आल्याने त्यास महायोगाची अनुभूती प्राप्त होते. साधकाने गुरुच्या फक्त स्थूल देहाकडे उघड्या डोळ्यांनी पाहू नये. त्यांची गुरुकडे पहाण्याची दृष्टीच अशी असावी की, त्यात फक्त त्याला सदगुरुंची वैशिष्टे कळावी. गुरु हे चोविस तास शिष्यास शब्द आणि शब्दांच्या अर्थपूर्ण माध्यमातून सतत मार्गदर्शन करत असतात. थोडक्यात सांगायचे तर गुरु हे शिष्याचे संपूर्ण जीवन व्यापून टाकतात.

ईश्वर व गुरु एकच आहेत. गुरु म्हणजे ईश्वराचे, परमेश्वराचे साकार रूप आणि ईश्वर म्हणजे गुरुंचे निराकार रूप. सुफी संत कबीर यांची गुरु सेवा व ईश्वर चिंतन एवढे होते की एके दिवशी दोघांनी एकाच वेळी त्यांना दर्शन दिले. कबीरांना दोघांच्या दर्शनाने आपले जीवन सार्थकी झाले असे वाटू लागले. दर्शन देणाऱ्या दोघांना प्रणाम करायलाच हवा. पण प्रथम प्रणाम कोणाला करावा? परमेश्वराला की गुरुंना? परमेश्वराला प्रथम प्रणाम केला तर सद्‌गुरु नाराज होतील आणि सद्‌गुरुंना प्रणाम केला तर साक्षात परमेश्वर नाराज होतील. ह्या द्विधा मन:स्थितीत कबीर असताना परमेश्वराने त्यांची मनावस्था जाणली आणि त्यांना म्हणाले, "अरे असे अडचणींत कां पडला आहेस? माझ्याऐवजी प्रथम तू तुझ्या सद्‌गुरुंना प्रणाम कर. प्रथम मान त्यांचाच आहे. कारण तुझ्या ह्या सद्‌गुरुकृपेमुळेच तुला माझे दर्शन घडून आले आहे." तर असे हे गुरुकृपेचे महात्म्य! म्हणून गुरु सेवा केली की ती ईश्वरालाच पोहचते.

न दिसणाऱ्या ईश्वरासाठी केलेला त्याग, भाव, भक्ति सेवेपेक्षा त्याच ईश्वराचे सगुण रुप असणाऱ्या गुरुंचीच सेवा करणे सोपे जाते. गुरुंना दिलेले ईश्वरालाच दिल्यासारखे होय. ईश्वरानेच दिलेले ईश्वरालाच परत दिल्यामुळे देवाण घेवाणाचा हिशेब निर्माण न होता तो पूर्ण होतो. गुरुंना अर्पण केल्यामुळे प्रारब्धात असणारे भोग भोगण्याची क्षमता वाढते व संचित कमी होते. पाप-पुण्याचा येथे हिशेब होत नाही. जे काही द्यावयाचे असेल ते सदगुरुंनाच घ्यावे कारण त्यांना दिलेले दान सत्पात्री असते. सदगुरुंपेक्षा या जगात सत्पात्र कोणीच नाही. भिकारी, धर्मशाळा, मंदिर यांना दिलेले दान हे भावनेपोटी केलेली कृती असते. त्याने फक्त पुण्यचं मिळते. पण मुमुक्षुला पाप-पूण्य दोन्ही नको असतं. कारण पुण्यामुळे स्वर्ग मिळतो, मोक्ष मिळत नाही. स्वर्गातील पूण्यांचा साठा कमी झाला की परत जन्म घ्यावा लागतोच.

अध्यात्मिक प्रगतीसाठी तन, मन, धन या सर्वांचा त्याग करावा लागतो. साधकाला एक वेळ त्यासाठी धनाचा त्याग करणे सोपे जाते; पण तन आणि मन अर्पण करणे म्हणावे तेव्हढे सोपे नसते. तरी ही तो तनाने शारिरीक सेवा व मनाने नामस्मरण करु शकतो. नामस्मरण करण्यास वेळ, काळ, स्थळ, सुचिर्भूतपणा इत्यादींची काहीही गरज भासत नाही. साधकाने सर्वस्वाचा त्याग केल्याशिवाय परमेश्वर त्याला आधार देत नाही. अध्यात्मिक भाषेत त्यागाबद्दल सांगायचे तर त्याग करणे म्हणजे वस्तूंचा त्याग करणे नव्हे, तर त्या सर्व वस्तूंची आसक्ती सुटणे. परमेश्वराने जे जे कांही निर्माण केले आहे ते उपभोगण्यासाठीच; नाही तर विधात्याने त्या निर्माण केल्याच नसत्या. पण विवेकाने वागून मर्यादेचे उल्लंघन न करता त्याची आसक्ती सोडावी.

जन्माला आलेला प्रत्येक मनुष्यप्राणी आयुष्यात छोट्या मोठ्या गोष्टींसाठी दुसऱ्या कोणाचे तरी मार्गदर्शन घेत असतो आणि त्यास तेव्हढे महत्त्व देत असतो. मग जन्ममृत्युच्या फेऱ्यातून मुक्ती देणाऱ्या सद्‌गुरुंचे महत्त्व किती पटीने जास्त आहे याची त्यास कल्पनासुध्दा करता येत नाही किंवा ते शब्दात सुध्दा मांडता येणे शक्य नाही.

स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव व सामर्थ्याची चुणूक दाखविणारे सद्‌गुरु आपल्या शिष्याच्या अध्यात्मिक उन्नतीकडे आपले लक्ष केंद्रीत करत असतात. शिष्य जे कांही करत असतो ते सदगुरुंना अंतर्ज्ञानाने सर्व दिसत असते आणि ह्याची अनुभूती पदोपदी शिष्याला येत असते. त्यामुळे तो वाईट कृत्ये करणे बऱ्याचवेळा टाळतो. कारण सदगुरुंच त्याला वेळोवेळी सावध करत असतात. सदगुरुकृपेने शिष्यास अमुल्य साधन प्राप्त होत असते म्हणून शिष्याचे आद्यकर्तव्य आहे को, त्याने सद्‌गुरुंच्या सानिध्यात राहून साधनस्थ रहाणे. त्यातच त्याची उन्नती आहे.

ऋषीमुनी, साधुसंतापासून सुरू असलेली गुरुशिष्य परंपरा आणि ह्या भवसागरात सापडलेल्या जीवांना सुखरुपपणे पैलतीरावर पोहचवून मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविणाऱ्या सर्व साधकांचे सद्‌गुरु प. पू. श्री सिध्दयोगेश्वर महाराजांना आमचे कोटी कोटी प्रणाम आणि ईश्वर चरणी प्रार्थना करतो की, त्याने त्यांना उदंड आयुष्य देवो!

*न गुरोराधिकं तत्वं न गुरोराधिकं तप: |*

*तत्व ज्ञानात्परं नास्ति, तस्मै श्री गुरवे नम: ||*

*गुरुरादिरनादिश्च, गुरुः परमदेवतम् |*

*गुरो: परतरं नास्ति, तस्मै श्री गुरवे सिध्दयोगेश्वराय नम: ||*

## कृपाप्रसाद

|| नम: सिद्ध योगेश्वराय ||

ज्याचिया कृपे आनंद झाला | मनांतील सर्वा विकार गेला |
जगदंबेचे दर्शन करविले हो मला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || १ ||
कृपाहस्त माझे शिरी धरियेला | मज जिवनाला उजाळा हो दिला |
पामरास या हो जगी उद्धरीला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || २ ||
सर्वत्र आहे व्याप्ती जयाची | भेट करविली मजला तयाची |
तया दर्शने मनी आनंद झाला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ३ ||
सामान्या परि हो राहाणी जयांची | भक्तावरी असे कृपा तयांची |
सदभक्तीचा हा असे भुकेला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ४ ||
माझ्या चुका असतील अनंत | सदगुरुंनी ना मानीला कधी खंत |
कृपेचा वर्षाव बहू मजवरी केला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ५ ||
कांही न कळले या अज्ञ जिवाला | तरी सदगुरुंनी मजला जवळी केला |
काया वाचा मन अर्पुनी केला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ६ ||
अहंभावाने जरी देह हा पछाडला | श्रीगुरुंनी ना कधी अव्हेरीला |
सागरापरी मन आहे जयाला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ७ ||
कृपा उतराई अल्पशी तरी करण्याला | जरी हा देह ओवाळणीस दिला |
तरीही कमी वाटे माझ्या मनाला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ८ ||
अनंत व्याप्ती असे जो रूपाला | वेदही तयाला ना वर्णू शकला |
जगदिशाने ही असे जो वंदीला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || ९ ||
भेदाभेद ज्याने कधी नाही केला | सदगुरु वामनाने हाती ज्यासी धरीला |
सदगुरुचा वेल ज्यांनी पुढे नेला | नमस्कार माझा श्री सिद्धयोगेश्वराला || १० ||
संकटे पार जाती लयाला | मनोभावे भजे जो सिद्धयोगेश्वराला |
पुंडलिकसुत देई वचनाला | नमस्कार करितो या पूज्य पदाला || ११ ||

प्रल्हाद पुंडलिक गोडगे
(पंढरपूर)

ghagmaharaj.guru

## शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी...

- प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज

या विश्वातील प्रत्येक प्राणिमात्रांचे जीवन गर्भ-जन्म-बाल्य - तारुण्य वृद्धत्व, मृत्यु या अवस्थेत प्राप्त होणाऱ्या आधिदैविक, आधिभौतिक व अध्यात्मिक या त्रिविध दु:खांच्या समुहांनी भरलेले आहे. यातून सुटका होऊन सुख प्राप्त व्हावे यासाठी प्रत्येक प्राणिमात्र अविरत प्रयत्नशील असतो.

केव्हा केव्हा त्याने सुख प्राप्तिसाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्यासारखे दिसत असले तरी सुद्धा अनेक वेळेला त्याने केलेले प्रयत्न विफल होवून, मनुष्य दु:खी झालेला दिसतो. जी जी वस्तु मनुष्याला प्रथमत: प्रिय वाटते, ती ती वस्तू त्याला प्राप्त झाल्यावर, जरी क्षणिक सुखाची प्राप्ती होत असली, तरीसुद्धा त्या प्राप्त झालेल्या सुखाअन्ती दु:खरुपी वृक्षांची बीजेच दडून बसली आहेत. हे कालांतराने त्याच्या दृष्टोत्पत्तीस येते. तर मग ज्याची प्राप्ति झाली असता, अत्यंत परम नित्य सुखाची प्राप्ति होईल असा कोणता पदार्थ या मनोहारी भासणाऱ्या जगात आहे? वरवर मनोहारी भासणारा हा संसार विचार केल्यास अत्यंत भयप्रद आहे.

जन्माला आल्यापासून जीवाला निरनिराळ्या अवस्थांतून जावे लागते. जीवाची बाल्यावस्था कल्पित क्रीडाकौतुकातच निघून जाते. स्त्री, पुत्र, धन यांच्या आसक्तिने मोहांत फसलेले तारुण्य जीर्ण होवून जराजर्जर अवस्थेतील प्राप्त होणारी दु:खच दु:खं भोगित असतो. त्याला केव्हाही कोठेहि सुख्यांतीचा लवलेशही प्राप्त न होता आकस्मितपणे एक दिवस स्वत:चे कल्याण साध्य न करता जीव मृत्यु च्या कराल जबड्यात भक्षस्थानी पडतो. मृत्युसमयी यम यातना वे गर्भप्रवेशासाठी उग्र कष्ट, अशा प्रकारे मानवी जीवनातील दु:ख दिन प्रती दिन वाढतच असते. म्हणून या विश्वातील यश्चयावत् प्राणिमात्र दु:खापासून सुटका व कधीही न संपणारे सुख कशामुळे प्राप्त होईल याचा सतत शोध घेत असतात. परंतु प्रत्येकाला अपेक्षित सुख प्राप्त न होता, नको असलेली दु:खं मात्र प्राप्त होतात. याचा अर्थ असा आहे कि जीवाचे सुख प्राप्तीचे मार्ग तरी चुकत असावे किंवा त्याच्या सुखाच्या कल्पनेत हिनत्व असले पाहिजे. सर्वसामान्य जीव, ज्याला सुख समजतो ते सुखच नसते. दु:खच सुखाचा पोषाख घालून त्याला छळत असते. या विश्वातील भौतिक सुखाची तऱ्हाच अशी आहे. येथील सुर्यादिकांचा जन्मच मुळी अस्तासाठी होत असतो, गर्भ उदरात असतानाच मृत्यु त्याला शोधित असतो. सध्याच्या प्रगत वैज्ञानिक युगातही मानवाने सुखासाठी केलेले प्रयत्न शेवटी नाशालाच कारणीभूत होतील की काय अशी भिती निर्माण होत आहे. त्यामुळे ते सर्व प्रयत्न अपूर्ण आहेत हेच आपल्या अनुभवाला येते. विश्वातील प्राणिमात्रांची धाव सर्व दु:खसमुहांना दूर करून चिरंतन आनंदरूप सुखाची प्राप्ति होण्यासाठीच असते. परंतु पाण्यात पडलेल्या चंद्रबिंबाला मासे पकडण्याच्या जाळ्यांत पकडणाऱ्या प्रयत्नाप्रमाणे त्यांचे प्रयत्न चुकीचे असतात.

मग कोणत्या मार्गाने गेले असता नि:श्रेयस निरतिशय शाश्वत सुखाची प्राप्ती होईल?

आपली सर्व शास्त्र आपणाला सांगतात आहेत कि, ज्या सर्वाधार परमेश्वराच्या आज्ञेने, ब्रह्म या संपूर्ण जगताची सृष्टी निर्माण करतो, तर विष्णू पालन करतो. आणि रुद्र संहार करतो, त्या परमेश्वर प्राप्तिनेच! वेदार्थाचे ज्ञाते ज्याचे यजन करतात, ते सर्व फलांचा दाता असणाऱ्या परमेश्वराच्या प्राप्तिनेच! निष्काम भावनेने कर्म करणाऱ्यांना ध्यान किंवा भक्तिपूर्वक आराधना करताच आपले सनातन वैकुंठपद देणाऱ्या परमेश्वराच्या प्राप्तिनेच! असंख्य दु:खाने भरलेल्या या संसार सागरातून भक्ताला आपल्या लिलेने पार करणाऱ्या परमेश्वराच्या प्राप्तिने. तसेच सर्व शक्तिमान, फलांचा दाता, दयाळू, भक्तिला भुकेलेल्या परमेश्वराला प्राप्त करून घेण्यानेच आपल्याला सर्व बंधातून मुक्त होता येईल व अत्यंत परम आणि अक्षय सुखाची प्राप्ति होईल. या संसार सागरातील दु:ख समुहांना नष्ट करणे म्हणजेच परमेश्वर प्राप्ती होय जीचे एक मात्र लक्षण म्हणजे निरतिशय, आनंदरूप सुखाची प्राप्ती. म्हणून प्रत्येक मानवाने परमेश्वर प्राप्तिसाठीच सर्व प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. परमात्म्याचा साक्षात्कार हेच मानवी जीवाच्या जीवनाचे अंतिम ध्येय असले पाहिजे. परमेश्वराची प्राप्ति करून घेतली असता जीवाला कोणत्याही प्रकारची न्यूनता न रहाता, सर्व गोष्टींची अनुकूलता प्राप्त होते. परमेश्वर प्राप्तीनंतर कितीही दु:खद प्रसंग आले तरीसुद्धा जीव (मानव) विचलित होऊ शकत नाही. अशा परमेश्वराला आपण विसरलो तर आपणच आपल्या अध:पाताला कारणीभूत ठरू.

संपूर्ण ज्ञान, शक्ति, बल, विर्य, तेज, ऐश्वर्य इत्यादी सर्व कल्याणमय गुणांचे ज्याचे स्वरूप आहे, तो परमात्मा जरी शब्दांचा विषय नसला, तरीसुद्धा उपासनेसाठी तत्त्ववेत्त्या ऋषीमुनींनी त्याला भगवान, सच्चिदानंद, महान शांतिसागर, अमृत इत्यादी अनेक नावे दिली आहेत. त्या विविध नावांनी ज्ञात असणाऱ्या परमेश्वराला प्राप्त

करून घेणारा जीव भगवंताच्या नावाप्रमाणेच भगवान, महान सच्चिदानंद परम शांतीचा लाभ देणारा अमृतमय होतो, व त्याची घोर अन्ध:कारमय संसाराच्या दुष्ट चक्रातून सुटका होवून तो मुक्ति प्राप्त करून घेतो. वास्तविक नित्य आनंद अशा सच्चिदानंदधन परमेश्वराचे स्वरूप असलेला असा हा मानव अनंत कालापासून अविद्या-मायेच्या आवरणामुळे भ्रमित होवून, बद्ध अवस्थेचे भोग भोगतो आहे. स्वत: अमृतमय असुनसुद्धा मृत्युच्या भयाने गर्भगळीत होतो. स्वत: स्वर्ग सुखाचे आगर असणारा हा जीव अपूर्ण व परावलंबी सुखासाठी रात्रंदिवस थडपडत असतो. अशा प्रकारे विषयोपभोगातच रममाण होवून स्वत:चे स्वरूप विसरलेल्या जीवाला 'अहं ब्रह्मास्मि' चा साक्षात्कार व्हावा, त्याचे अज्ञान जावून ज्या मूळ अविद्या मायेमुळेच जीव जन्म-मृत्युच्या भोवऱ्यांत सापडून संसाराच्या दुष्ट चक्रात दुःखं भोगत आहे, ते नाहिसे होवून त्याला आनंद मिळावा, मुक्ति मिळावी म्हणून शास्त्रांनी कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, अष्टांगयोग, वगैरे निरनिराळे मार्ग सांगितलेले आहेत, कि जेणे करून त्याप्रमाणे कर्म केले असता संसाराचे सर्व बंध नाहिसे होवून त्याला मुक्तिचा लाभ व्हावा.

सर्व ठिकाणी सर्व पदार्थांमध्ये व्यापलेल्या या प्रकृतितील सत्व, रज, तम या तीन गुणांच्या योगे मनुष्य चांगली अगर वाईट कर्म करीत असतो.

त्याने केलेल्या शुभाशुभ कर्माप्रमाणेच जीवांना एका योनीतून दुसऱ्या योनीत प्रवेश करावा लागून, त्या त्या योनीत त्याने पूर्व जन्मात केलेल्या कर्माची बरीवाईट फळे भोगावी लागतात. याप्रमाणे जीवाला 'पुनरपी जननं पुनरपी मरणं' च्या चक्रात पडावे लागते. यालाच संसार असे म्हणतात. रज, तम गुणांच्या आधिक्याने केलेली कर्म वृक्षादी, स्थावर जन्मापर्यंत व व्याघ्रादी हिंस्त्र पशू योनीपासून ते किटकादी शुद्र जीवापर्यंतच्या नीच योनीत घेवून जातात, यालाच संसार म्हणतात. आपली सर्व शास्त्रे आवर्जून ज्या संसारातून मुक्त होण्यासाठी सांगत आहेत, तोच हा संसार!

या जगातील सर्वसाधारण माणसं स्त्री, पुत्र, धन, शेतीवाडी, घरदार यांनाच संसार असे म्हणतात. ते बरोबर नाही. याला व्यवहार म्हणतात. या व्यवहाराला जे लोक संसार म्हणतात, तो शास्त्रीय अर्थ नव्हे, असे विद्वान लोक सांगतात. सर्वसामान्य लोकांना संसार या शब्दाचा अर्थ माहित नसल्यामुळे व्यवहारी जगात ज्याला संसार म्हणतात, तोच टाकून द्या, असे शास्त्र सांगते असा खोटा आरोप करतात. परमेश्वराची प्राप्ती करून घेण्यासाठी या व्यवहारी जगात ज्याला संसार म्हणतात तो म्हणजे स्त्री पुत्रादी घरदार वगैरे व्यवहार सोडण्याचे काहीही कारण नाही. तर, या व्यवहारातच देव दुर्लभ असा मानव जन्म प्राप्त झालेल्या जीवाने शास्त्रांनी सांगितलेली धर्म-कर्मे व अधार्मिक कर्मे कोणती? यांचा विवेकपूर्वक विचार करून परमेश्वर प्राप्तिला योग्य असणाऱ्या कर्माचरणाने आपले कल्याण करून घ्यावे असे शास्त्र सांगते.

कर्माने देह प्राप्त होतो, जीवाच्या बंधनाला ज्याप्रमाणे कर्म कारण आहे, त्याप्रमाणे त्याला मुक्ती प्राप्त करुन देण्यास कर्मच कारण आहे.

जोपर्यंत जीवात्मा शरीरात आहे, तोपर्यंत शरीराकडून कर्म होतच राहणार. कारण शरीराकडून कर्म होणे हा निसर्ग नियमच आहे. निसर्ग नियम कोणालाच मोडता येणार नाही. प्रत्यक्ष ब्रह्मज्ञानी पुरुषांना सुद्धा! त्यांच्याही हातून कर्म घडतच असतात. कर्मरहीत होणे जीवाच्या आधिन नसून प्रकृतिच्या आधिन आहे. जीवात्म्याचा जोपर्यन्त शरीरांत वास आहे; तोपर्यन्त रात्रंदिवस कर्म ही घडतच राहणार. कर्म करायचे नाही असे जरी जीवाने ठरविले, तरीसुद्धा नैसर्गिकपणे होणारी कर्म उदा. - भूक-तहान, कानांनी ऐकणे, पहाणे, श्वासोच्छवास करणे, बसणे-उठणे, मनाचे विचार ही कर्म होतच राहणार. मग आपण कर्म-त्याग कसा करु शकतो? कर्मत्याग असंभव आहे. कोणीही कर्म-त्यागाचा विचारही मनात आणू नये. कर्मे ही प्रकृतीच्या गुणाधिन असतात व त्याप्रमाणे त्यांची फळे मिळतात.

सत्व, रज, तम हे ते तीन गुण असे आहेत की ज्यांच्यामुळे वाईट अथवा चांगली कर्म घडतात. म्हणून आपण या तीन गुणांमुळे कोणती फळे मिळतात, कोणते आचरण घडते व शेवटी त्याचे परिणाम काय होतात. ते पहाणे आवश्यक आहे.

*मानसं मनसैवायमुपभुडक्ते शुभाशुभम् |*

*वाचा वाचाकृतंकर्म-कायेनैवच कायिकम् || ८ ||*

*म. स्मृ. १२.*

जीव हा मनाने केलेल्या कर्माचे फळ मनाने भोगत असतो, वाणीने केलेल्या कर्माचे फळ वाणीने भोगत असतो. व शरीराने केलेल्या कर्माचे फळ शरीराने भोगत असतो. त्याचप्रमाणे पाप कर्म करणाऱ्या जीवांची अनेक प्रकारे गती कशी होते त्याबद्दल शास्त्र सांगते कि -

*शरीरजै: कर्मदोषैर्याति स्थावरतां नर: |*

*वाचिकै: पक्षिमृगतां मानसैरन्त्य जातिताम् || ९ ||*

*म. स्मृ. १२*

जो मनुष्य चोरी, परस्त्रीगमन, श्रेष्ठांना मारणे, इत्यादी शारीरिक दुष्कर्मे करतो, त्याला स्थावर जन्म प्राप्त होतो. म्हणजे तो वृक्षादी होऊन रहातो. जो वाणीने पाप करतो त्याला पक्षी, मृग यांचा जन्म मिळतो व मनाने दुष्ट कर्म करतो त्याला चांडाळादि योनीमध्ये जन्म घ्यावा लागतो. जीवाच्या देहामध्ये ज्या गुणाचे प्राबल्य असते त्याप्रमाणे तो गुण जीवाला आपल्या प्रमाणे करतो. सत्त्वगुण वाढल्यामुळे आत्म्यामध्ये ज्ञान प्राप्त, शांती शुद्धी वाढलेली दिसेल. वेदांचा अभ्यास, धर्मानुष्ठान ज्ञानाची वृद्धी, पवित्रता, इंद्रिय निग्रह, आत्मचिंतन ही सत्वगुणांची लक्षणं आहेत. जीवात्मा जेव्हा सर्वांकडून ज्ञानग्रहण करावे अशी इच्छा बाळगतो, सत्कर्म करण्यास लाजत नाही व आवडीने धर्माचरण करतो, त्या वेळी समजावे की त्याच्यात सत्वगुण वाढिला लागला आहे. सत्त्वगुणी लोकांना विद्वत्व (देवत्व) प्राप्त होते. सत्वगुणी माणसामध्येसुद्धा तीन भेद आहेत. १) साधारण सत्वगुणी २) मध्यम सत्त्वगुणी ३) उत्तम सत्त्वगुणी. यांना पुर्नजन्म कोणता मिळतो ते मनुस्मृती सांगते कि -

*तपसा यतयो विप्रा ये च वैमानिका गणा: |*

*नक्षत्राणि च दैत्याश्च प्रथमा सात्विकी गति: || ४८ ||*

*म. स्मृ. अ. १२*

जे साधारण सत्वगुणी असतात ते तपस्वी, यती, संन्यासी, वेदपाठी, विमान चालविणारे, ज्योतिषी व देहपोषक म्हणून जन्माला येतात.

*यज्वान ऋषयो देवा वेदा, ज्योतिषी वत्सरा: |*

*पितरश्चैव साध्याश्च द्वितीया सात्त्विकी गतिः || ४९ ||*

*म. स्पृ. १२*

मध्यम सत्वगुणी असतात त्यांना यज्ञकर्ते, वेदांचा अर्थ जाणणारे विद्वान, वेदज्ञ, विद्‌युत व कालविद्या जाणणारे रक्षक, ज्ञानी, कार्यसिद्धीसाठी ज्यांची मदत होते असे आध्यापक यांचा जन्म प्राप्त होतो.

*ब्रम्हा विश्वसृजो धर्मो महानव्यक्तमेवच |*

*उत्तमां सात्विकीमेतां गतिमाहुर्मनीषिण: || ५० ||*

*म. स्मृ. अ. १२*

जे उत्तम सत्वगुणी असतात, व उत्तम कर्म करतात ते सर्व वेद जाणणारे, सर्व विद्येला जाणून विमानादि विविध कला, यान तयार करणारे, धार्मिक, सर्वोत्तम बुद्धीयुक्त, अव्यक्त, प्रकृती वशीत्व यांची सिद्धी प्राप्त केलेले असे जन्माला येतात.

आता रजोगुणी माणसांना कोणता जन्म मिळतो व रजोगुण वाढलेला आहे असे कशावरुन समजायचे, ते पाहू.

*येनास्मिन्कर्मणा लोकं ख्यातिमिच्छति पुष्कलाम् ।*

*न च शोचत्य संपत्तौ तद्विज्ञेयं तु राजसम् ॥ ३६ ॥*

जे कर्म केले असता लोकांमध्ये आपली पुष्कळ प्रसिद्धी होईल असे इच्छितो, संपत्ती नसतानाहि चारण भाटांदिकांना ती देवून आपले स्तुतीपाठ करवितो, अर्थसंग्रह करणे, आरंभ शुरत्व, धैर्य - त्याग असत कर्म करण्याची आवड, निरंतर विषय सेवन, हे गुण रजोगुणाची वाढ झाल्यावर दिसू लागतात.

*भल्ला भल्ला नटाश्चैव पुरुषः शस्त्रवृतयः ।*

*द्यूतपान प्रसक्ताश्च जघन्या राजसीव्या गतिः ॥ ४ ॥*

*म. स्मृ. अ. १२*

जे कनिष्ठ रजोगुणी असतात ते तलवार वगैरे हत्याराने मारणारे, कुदळीने खणणारे, नौका चालविणारे, नाड्यावरुन करसरतीची कामे करणारे, शस्त्रधारी, भृत्य, मद्यपान करणारे यांच्या जन्माला येतात.

*राजानः क्षत्रियाश्चैव राज्ञा चैव पुरोहिताः ।*

*वादयुद्धप्रधानाश्च मध्यमा राजसी गतिः ॥ ४६ ॥*

मध्यम रजोगुणी लोक, राजे, क्षत्रिय, राजांचे पुरोहित, वादविवाद करणारे (वकिल), युद्ध भूमीवरील सेनापती यांच्या जन्माला जातात.

*गंधर्वा गुह्यका यक्षा विबुधानुचराश्च ये ।*

*तथैवाप्सरसः सर्वा राजसीषुत्तमा गतिः ॥ ४७ ॥*

उत्तम रजोगुणी असणाऱ्यांना गाणारे, वाद्य वाजविणारे, धनाढ्य विद्वानांचे सेवक व उत्तम स्वरुपवान स्त्रिया यांचा जन्म मिळतो.

तामस गुणाबद्दल मनुस्मृती काय म्हणते ते पाहू:-

अज्ञान वाढले असतांना तमोगुण वाढले असे समजावे त्याचप्रमाणे

*यत्तु स्यान्मोहसंयुक्तमव्यकतं विषयात्मकम् ।*

*अप्रतर्क्यमविज्ञेयं तमस्तदुपधारयेत ॥ २९ ॥*

*म. स्मृ. १२*

जेंव्हा आत्मा आणि मन मोह युक्त होवून संसारात रमतात, अविवेकी होवून विषयांत आसक्त होतात व जेव्हा ते तर्क वितर्क रहित होतात, तेव्हां तमोगुण वाढला असे समजावे.

*लोभः स्वप्नोधृतिःक्रौर्यं नास्तिकं भिन्नवृत्तिता |*
*याचिष्णुता प्रमादश्च तामसं गुणलक्षणम् || ३३ ||*

तमोगुण वाढतो त्यावेळी लोभ, आळस, निद्रा, भिरुत्व, क्रुरता, नास्तिकता, वेद आणि देवांवर अश्रद्धा, चित्ताची व्यग्रता, प्रमाद होणे, व्यसनांत फसणे हे गुण दिसतात.

*स्थावराः कृमिकीटाश्च मत्स्या; सर्पाश्च कच्छप्पाः |*
*पशवश्च मृगाश्चैव जघन्या तामसी गतिः || ४२ ||*

अत्यंत तमोगुणी असणारे वृक्षादी, स्थावर कृमी, किटक, मत्स्य, सर्प, पशु, कासव, मृग यांच्या जन्माला जातात.

*हस्तिनश्च तुरङःश्च शूद्रा म्लेच्छाश्च गर्हिता |*
*सिंहा व्याघ्रा वराहाश्च मध्यमा तामसी गतिः || ४३ ||*

जे मध्यम तमोगुणी असतात. ते हत्ती, घोडा, शुद्र म्लेच्छ, निंदीत कर्म करणारे, सिंह, वाघ, वराह (डुक्कर) यांच्या जन्माला जातात.

*चारणाश्च, सुपर्णाश्च पुरुषाश्चैव दांभिकाः |*
*रक्षांसि च पिशाचाश्च तामसीषूत्तमा गतिः || ४४ ||*

जे तमोगुणी लोकांमध्ये उत्तम असतात त्यांना कविते द्वारे मनुष्याची स्तुती करणारे, सुंदर पक्षी, दांभिक पुरुष, हिंसा करणारे, अनाचारी, मद्यादि सेवन करणारे, मलीन राहणारे यांचा जन्म मिळतो.

तात्पर्य हे की, परमेश्वराच्या राज्यांत कृत कर्मानुसार कर्त्याला फळ मिळत असते. जेव्हा पाप जास्त होत असते व पुण्य कमी होते त्यावेळी जीवाला पशूदिकांमध्ये जन्म घ्यावा लागतो. तमोगुणापेक्षा रजोगुण श्रेष्ठ आहे, व रजोगुणापेक्षा सत्त्वगुण श्रेष्ठ आहे. याप्रमाणे विचार करुन आत्मोन्नती करणारे जे श्रेष्ठ गुण आहेत, त्याचा स्विकार करण्यास शास्त्र सांगते. परंतु शास्त्रज्ञान न पाळता जे अधर्माने वागतात त्यांना नीच स्थितिमध्ये जन्माला जावे लागते.

श्रेष्ठ गुणांच्या योगे श्रेष्ठ कर्म केल्याने उत्तम जन्म प्राप्त होतो. आणि कनिष्ठ गुणांच्या योगे निच कर्म केल्याने निच जन्म प्राप्त होतो. परंतु ज्यांना मुक्ति प्राप्त करुन घ्यावयाची आहे; त्यांना गुणातीत व्हावे लागेल!

उपनिषदामध्ये कर्म आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या संसाराची कल्पना दिलेली आहे. जीवाने केलेल्या कर्माप्रमाणेच जीवाला एका जन्मानंतर दुसरा जन्म मिळतो असे सांगितले आहे. मनुष्य शरीर धारण केलेल्या

जीवाने अन्य योनीमध्ये जन्म घेतलेल्या जीवाप्रमाणे, फक्त कर्माचीच फळे न भोगता भविष्यामध्ये उत्तम सुख प्राप्त व्हावे म्हणून सत्कर्म करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे. शास्त्रांनी सुखाची दोन साधने सांगितली आहेत.

१) **श्रेय:** सर्व प्रकारच्या दु:खापासून सर्वस्वी सुटका होऊन, नित्य आनंद स्वरुप परब्रह्म पुरुषोत्तमाला प्राप्त करण्याचा उपाय म्हणजे श्रेय होय.

२) **प्रेय:** स्त्री, पुत्र, धन, घर, शेतीवाडी, मान-सन्मान, यश, इत्यादी तसेच स्वर्ग लोकांतील जेवढी म्हणून भोगसामुग्री आहे ती प्राप्त करुन घेण्याचा उपाय म्हणजे प्रेय होय.

मनुष्याला सुख देणारे हे दोन्ही उपाय आपापल्या गुणांनी आपल्याकडे ओढत असतात. भोगात प्रत्यक्ष आणि ताबडतोब सुख मिळत असल्याने बहुसंख्य लोक परिणामांची तमा न बाळागता प्रेय कर्माकडेच आकर्षित झालेले आपणांस दिसतील. परंतु फारच थोडी भाग्यवान माणसं भगवंताच्या कृपेने भौतिक भोगांची परिणीती दु:खदायक आणि क्षणैक असल्याचे जाणून त्यापासून विरक्त होवून श्रेय कर्माकडे आकर्षित होतात, आणि तत्परतेने साधनेला लागतात. अशा लोकांचे सर्व प्रकारे कल्याण होते. असे लोक वर दिलेल्या दु:खमय संसारचक्रातून सुटका करुन घेऊन अनंत, असीम, आनंदरुप मुक्ती ला प्राप्त करुन घेतात.

अनेक माणसांचा पुर्नजन्मावर विश्वास नसल्यामुळे श्रेयस अगर प्रेयसकर्माचा विचारहि न करता भोगामध्ये आसक्त होवून आपल्या देव दुर्लभ अशा मनुष्य जीवनाला पशुप्रमाणे भोग भोगून समाप्त करतात. परंतु ज्यांचा पुर्नजन्मावर व परलोकांवर विश्वास आहे अशा विचारशील माणसा समोर ज्यावेळी श्रेय आणि प्रेय हि दोन्ही येतात, तेव्हा त्या दोहोंच्या गुण-दोषांवर विचार करुन ते श्रेय कर्मानां जवळ करतात. जे लोक पुर्नजन्म मानत नाहित ते पुर्नजन्माबद्दल प्रत्यक्ष प्रमाण विचारतात. त्यांना उत्तर असे आहे को, प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय काही गोष्टी अनुमानाने सिद्ध करता येतात. या जन्मात अनेक वेळेला प्राप्त होणारे अधिकार, धन, बुद्धी, विद्या, दारिद्रय, निर्बुद्धता, मुर्खत्व, सुख-दु:ख इत्यादी गोष्टीवरून पुर्नजन्माची सहज कल्पना येते.

जगामध्ये एकाच क्षणी अनेक जीव जन्माला येतात. पण त्यांच्या पूर्वकर्मामुळे त्यांना निरनिराळ्या अवस्थेत जन्म मिळालेले असतात.

त्यांच्या सुख दु:खाच्या घटना पाहून पुर्नजन्माचे अनुमान होऊ शकते. कित्येकांना जन्मतःच सुख, तर कित्येकांना जन्मत:च दुःखं प्राप्त झालेले आपण पहातो. एक धनाढ्य म्हणून जन्माला येतो, तर दुसरा दरिद्री, एक विद्वान तर दुसरा मुर्ख, एक पुण्यात्मा, तर दुसरा पापात्मा. एक राजघराण्यात जन्माला येतो तर दुसरा झोपडीत अगर उघड्यावर जन्माला येतो. एक आजन्म सुख उपभोगत असतो, तर दुसरा जन्मापासून मरेपर्यन्त अत्यंत हालअपेष्टा सोसून दु:ख भोगत असतो. एका जीवाला रहाण्यासाठी आलिशान बंगला मिळतो; क्षुधा निवारण्यासाठी उत्तमोत्तम पदार्थ मिळतात, ऐष आरामासाठी गाद्यागिरद्या सेवेला नोकर चाकर, मनोरंजनासाठी उत्तमोत्तम साधने व हिंडण्याफिरण्यासाठी सुंदर वहाने तयार असतात; तर दुसऱ्या जीवाला रहाण्यासाठी जीर्ण झोपडीही नसल्यामुळे उघड्यावर रहावे लागते, क्षुधा निवारण्यासाठी अन्नासाठी दश दिशा फिराव्या लागून भूकेला मिळालेल्या कोंड्यावरच भूक भागवावी लागते. दुसर्‍याच्या घरी जीव जाई तोंवर कष्ट करावे लागतात. अशा तऱ्हेने दु:खी कष्टी झालेल्या जीवाची कुणीहि विचारपुस करीत नाही. हा जो भेद आहे तो जीवाच्या पुर्नजन्माच्या पापकर्मामुळे किंवा पुण्य कर्मामुळेच असतो. असे अनुमान निघते, असो! तर कर्मे ही गुणाधिन आहेत. व गुणाधिक्य ज्या प्रमाणात असेल त्याप्रमाणे जो पर्यंत प्राण शरीरात आहे, तोपर्यन्त कर्म हो होतच रहाणार. मग कर्म करण्याची जीवाची इच्छा असो वा नसो! मग, कर्म जर होणारच असेल आणि ज्यामुळे आपले व समाजाचे कल्याण होणार असेल, अशी विहित कर्मे माणसाने टाळण्याचा प्रयत्न करु नये! कर्म जरी जीवाच्या बंधनाला कारणीभूत असेल तरीसुद्धा मुक्ती प्राप्तिसाठी कर्मे करावीच लागतात. त्याचा त्याग केला तर मुक्ती कशी प्राप्त होवू शकेल? कर्माविषयीचे निरनिराळ्या प्रकारचे विचार मंथन केले गेले आहेत. त्यामध्ये तामसरुपी निषिद्ध कर्मः चोरी, व्यभिचार, क्रुरता, व्यसनाधिनता, जबरदस्ती, अभक्षभक्षण, नास्तिकता, प्रमाद होणे. काम्य कर्म: स्त्री, पुत्र धन, घर, शेतीवाडी, मानसन्मान, यश इत्यादी गोष्टींच्या प्राप्तीसाठी, संकटे व रोग यांच्या निवारणार्थ केलेली कर्मे. कर्तव्य कर्म: सर्व दु:खापासून सुटका होवून आनंदरुप परमेश्वराला प्राप्त करण्यासाठी, ईश्वर भक्ति, तप, गुरुजनांची सेवा, देवतांचे पूजन, त्याचप्रमाणे वर्णाश्रमानुसार या संसारातील घडणारी कर्मे यांत जी निषिद्ध कर्मे आहेत, त्यांचा सर्वाथाने त्याग केला पाहिजे.

**कर्म योग:**

जी कर्म भगवंताचे प्रेम व प्राप्तीसाठी केली जातात; त्याला कर्मयोग म्हणतात. मनुष्याला कर्माच्या क्रिया बंधनकारक होत नाहीत. तर त्यामध्ये असणारा 'कर्तृत्व अभिमान' व 'फलाशा' बंधनकारक होत असतात. गुणाधिन कर्म ही इंद्रियाद्वारे होत असतात, व इंद्रियाने केलेल्या कर्माचे कर्तृत्व जीवाने आपल्यावर घेतले तरच जीव बंधनात पडतो. अज्ञानाने जीव स्वत:ला शरीर आहे असे समजून, इंद्रियाने केलेली कर्म स्वत: केली आहे असे मानतो. यामध्ये जीवाचा कर्तृत्व अभिमान व आसक्ति सोडली, तर जीव मुक्तच आहे! सकाम कर्म करणाऱ्या मनुष्याचे चित्त, कर्म करण्यास प्रवृत्त झाल्यापासून त्याच्या पूर्तीपर्यंतच्या अवधित निरंतर, व्यथित व अशांत असते. कारण ते सतत कर्मफलांकडे लक्ष देवून असते. त्या कर्मात यश आल्यास हर्ष व अपयश आल्यास ते दुःखी होतो. असे व्यथित व अशांत चित्त इंद्रियांना नीच कर्म करण्यास प्रवृत्त करते व त्याप्रमाणे आचरण केले गेले तर त्याचे प्रायश्चित म्हणून दु:ख भोगावे लागते. परंतु निष्काम कर्म करण्याऱ्या जीवाच्या ठिकाणी कोणतीहि सांसारिक इच्छा नसते. सर्व कर्माची फलासक्ति सोडून तो कर्म करीत असतो, त्यामुळे तो कर्म बंधनातून मुक्त असतो. आता असा प्रश्न निर्माण होतो की फलांची जर आसक्ति नसेल तर मनुष्याने कर्म तरी कशाला करावे? त्याचे उत्तर असे की सकाम कर्म करणारा जीव जी जी कर्म करतो ती इंद्रिय सुखाची आसक्ति ठेवून, त्यांच्या फल प्राप्तीच्या आशेने. त्यांच्या कर्माच्या हेतूंत वैषयिक इच्छा असतात. अशा तऱ्हेने विषय कामनेच्या हेतूने केलेल्या कर्मामध्ये आसक्त झालेल्या मनुष्याची बुद्धी कामनेने ग्रासली जाते. म्हणून कर्म यशस्वी झाल्यास सुख व अयशस्वी झाल्यास दु:ख प्राप्त होते. निष्काम कर्म करणाऱ्याच्या हातून जी कर्म घडत असतात त्यामध्येही आसक्ति असते. परंतु ती परमेश्वर प्रितीची! सांसारिक फलाशेत त्याची आसक्ती नसते व कर्तृत्व अभिमानहि नसतो. त्यामुळे कृतकर्माच्या यशापयशाने तो सुखी किंवा द:खी होत नाही. इंद्रिय सुखाची आसवित न ठेवतां, भगवतांच्या प्रितीसाठीच केलेली सर्व कर्म दैवी गुणयुक्त असतात अशा दैवीगुणयुक्त कर्मांचा परिणाम परम कल्याणमय होतो चांगल्या किंवा वाईट कर्माचा संबंध पुर्वजन्मात केलेल्या कर्माच्या प्रतिक्रिया होय. मनुष्याने केलेल्या कर्माच्या चांगल्या परिणामाकरीता आपली सर्व कर्म ईश्वरार्पण केली पाहिजेत, तरच केलेली चांगली अगर वाईट कर्म बंधनकारक ठरणार नाहीत. ईश्वर सर्वत्र आहे. त्याच्या आज्ञेशिवाय कोणतीच गोष्ट होऊ शकत नाही. त्याच्या सत्तेने प्रत्येक कर्म आपणांकडून घडत आहे. आपण फक्त निमित्तमात्र आहोत, अशी निश्चयात्मक बुद्धी मनुष्याच्या ठायी असली पाहिजे. तरच तो मनुष्य निष्काम कर्म करु शकेल. अशा तऱ्हेने केलेली कर्म समाजाला, देशाला, इतकेच काय तर सर्व मानवजातीला उपयुक्त ठरतील. त्याचप्रमाणे निष्काम भावनेने कर्म करणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणी समत्व निर्माण होईल, वासना नाहीशा होऊन प्रपंचाचा मोह सुटेल. करीत असलेली कर्म पुढच्या जन्माला कारणभूत होणार नाहीत. वैराग्य प्राप्त होवून परमेश्वराची खरी भक्ति प्राप्त होईल, व परमेश्वराच्या प्राप्तीत जी अडचण आहे ती भरुन निघण्यासाठी सदगुरुची प्राप्ति होईल. जोपर्यन्त सद्गुरुची प्राप्ती होत नाही तो पर्यंत जीवाला कर्म आणि बंधनाच्या विषचक्रांतून सुटण्याचे ज्ञान प्राप्त होत नाही.

**भक्तियोग:**

निश्चयात्मक बुद्धी व श्रद्धायुक्त अंत:करणापासून परमेधर चरणी अनन्य शरणांगती पत्करुन प्रेमाने भरुन जाणे याला 'भक्ती' असे म्हणतात. परमेश्वर प्रेमाने मनुष्य एकदा भारला गेला की त्याचे मन सतत त्या परमेश्वराच्याकडे धांव घेत असते. भक्तीत प्रेम हे मुख्य आहे. भक्ति हा परमेश्वर प्राप्तीचा सर्वात सोपा मार्ग आहे असे सांगितले जाते, परंतु भक्ति कशाला म्हणतात ते पहिल्याने जाणून घेतले पाहिजे. भक्तिबद्दल जितक्या सहजतेने बोलले जाते, तितकी भक्ति ही सोपी गोष्ट नाही! मन आणि बुद्धि परमेश्वराच्या प्रेमात बुडून गेले तरच कर्तृत्व अभिमानाने वावरणारी वृत्ती देहाला सोडून परमेश्वराच्या भक्तीमध्ये रममाण होईल; परंतु या व्यवहारी जगात वावरणाऱ्या अज्ञ जीवांना हे शक्य नसते म्हणून सर्वत्र चंचलतेने विहार करणाऱ्या मनाला आवरुन, ईश्वर चरणांकडे लावण्यासाठी सगुण उपासना आवश्यक ठरते. अशा सगुण मुर्तीची रोज थोडा थोडा वेळ गंधाक्षतांनी पूजा केल्याने त्याला पत्र, पुष्प, फल अर्पण करण्याच्या अभ्यासाने मनुष्याच्या अंत:करणांत ईश्वर भक्तीची आवड निर्माण करण्याच्या प्रयत्नांतील एक भाग आहे. असे जरी असले तरी जन्मभर तो हेच करीत राहिल. कारण जोपर्यन्त त्याच्या ठिकाणी खऱ्या भक्तीचा उगम होत नाही, तोपर्यन्त बाह्य अवडंबरालाच तो किंमत देत राहिल. भक्तीचे जे नऊ प्रकार सांगितले जातात; त्याविषयी पू. मामा दांडेकरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत वर्णन केलेले

आहे, ते अत्यंत मार्मिक आहे. पुष्कळ वेळां भक्ति म्हणून श्रीमद्भागवतांतील प्रल्हादाची पुढील उक्ती सांगण्यात येते.

*श्रवणं किर्तनम् विष्णो स्मरणम् पादसेवनम् |*

*अर्चनम् वंदनम् दास्यम् सख्यमात्म निवेदनम् ||*

या वरील श्लोकात भक्तीची व्याख्या केलेली नसून सांगितलेले नऊ प्रकार भक्तीचे वेगवेगळे अविष्कार आहेत. मनांत एकदा का ईश्वर विषयक प्रेमाची भक्तिरूपी भरती आली की मनुष्याच्या विविध इंद्रियाद्वारे होणाऱ्या क्रियांचे ते वर्णन आहे. अशी भक्ती आपल्या कानांनी ईश्वराच्या गुण वर्णनाव्यक्तिरिक्त इतर गोष्टी ऐकण्याचे टाळतो. प्रेमात आल्यानंतर हातात असतील ती पाने, फुले, भगवंताला अर्पण करतो. आपले मनोगत सांगतो. लोटांगण घालतो. अशा क्रिया आपोआप घडत असतात. याचे कारण भक्तांचे अन्त:करण भक्तिप्रेमाने, भक्तिरसाने भरून गेलेले असते. परंतु अशी भक्ति ही जन्मजन्मांतरीच्या पूर्व पूण्याईने एखाद्याच भाग्यवंताच्या वाट्याला येते. सगुणोपासकाने वरील श्लोकांत दिलेल्या क्रिया करावयाचे ठरविले, तरीसुद्धा त्या क्रियांच्या बुडाशी अनन्य भाव, प्रेम असले पाहिजे. वास्तविक परमेश्वराचे प्रेम संपादन करण्यासाठी आत्मसमर्पण करण्याची आवश्यकता आहे. पान, फूल, फळ अर्पण करणे हे ब्राह्योपचार झाले. ब्राह्योपचार हा परमेश्वराला भजण्याचे नुसते निमित्त आहे. या बाह्योपचारामध्ये अहंकार सोडून, मोठेपणा व मद टाकून शरिरही अर्पण करण्याची वेळ आली तरी सुद्धा ते देवावरुन ओवाळून टाकण्यास खंत वाटता कामा नये. आपण आपल्या जीवावर जसे प्रेम करतो ते प्रेम भगवंताला अर्पण करणे म्हणजे आत्मसमर्पण करणे होय!

काही स्वार्थी लोक, सांप्रदाय वाढविण्याच्या उद्देशाने अज्ञ लोकांत भक्तीचा विचार करताना जाणून बुजून म्हणा आगर त्यांची वैचारिक पातळी तेवढी असल्यामुळे म्हणा, ज्ञानयोग, कर्मयोग, आणि इतर योग यांना कमी लेखण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचबरोबर हे ही सांगितले जाते की, भक्तीमध्ये फक्त श्रद्धा असली व नाम घेतले की काम झाले. इतर योग हे कठीण आहेत. कारण त्याला यम-नियमांची अनेक बंधने आहेत. इत्यादी! मग भकती मार्गात यम-नियमादी इतर बंधनांची आवऱ्यकता नाही कां? भगवंताच्या प्राप्तीसाठी आचरणांत आणल्या जाणाऱ्या सर्व मार्गांना योगच म्हणतात. जीवाचे शिवाशी मिलन म्हणजेच योग! ज्ञान मार्गाला ज्ञानयोग, कर्म मार्गाला कर्मयोग तसेच भक्तीमार्गाला भक्तीयोगच म्हटले जाते! तर योगाबद्दल बागुलबोवा करुन सांगण्याचे कारण काय? अशा अपप्रचारामुळे सामान्य जीवांचा बुद्धीभेद होवून ते संभ्रमात पडतात. म्हणून अशा लोकांनी सामान्य जीवांना संभ्रमात पाडण्याचे पातक तरी करु नये. भक्ती योगांतही यम-नियमांची आवश्यकता असतेच. आहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, स्वाध्याय, ईश्वर भक्ती, ज्ञान, वैराग्य, मनोनिग्रह, सत्संग शांती इत्यादी गुणांची जशी योगाला आवड्यकता असते. त्याचप्रमाणे भक्ती योगात ही आहे.

भक्ती म्हणजे काही एक दोन तास पूजा, भजन, नाम-स्मरण व बाकीचा वेळ त्याच्याशी विसंगत कृती हे खऱ्या भक्तीचे लक्षण नव्हे. निरनिराळ्या साधनांनी परमेश्वराला भजणारे लोक आपलेच साधन बरोबर आहे, इतर साधनांपेक्षा उच्च आहे; म्हणून इतरांनीही तेच करावे असा आग्रह धरतात. असे लोक आपण करीत असलेल्या साधनेच्या उच्च भूमिकेतून विचार न करता आपलेच साधन उच्च आहे असे प्रतिपादन करतात. ज्याच्याबद्दल अंत:करणात भक्ती उत्पन्न झालेली आहे, त्या परमेश्वराच्या सत्य स्वरुपाचे 'ज्ञान' व प्राप्त झालेल्या ज्ञानाची अनुभूति येणे; ह्या तिन्ही गोष्टींचा 'योग' असल्याशिवाय परमेश्वराची प्राप्ती होणे असंभवनीय आहे. भक्तियोगात एखाद्या तासाच्या पुजनाने किंवा नाम घेण्याने परमेश्वराच्या प्राप्तीची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. तर संपूर्ण जीवन ईश्वर प्रेमाने भरून जाण्यानेच त्याच्या प्राप्तीची शक्य ता आहे. पाने, फुले, फळे वाहून परमेश्वराला आपलासा करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपण केलेल्या कर्माची फळे त्याला वाहिल्यास तो प्रसन्न होईल. श्रेष्ठ अशा भगवंताला जर आपल्या कर्माची फळे वाहायची असतील तर ती श्रेष्ठच असावी लागतील; म्हणून भक्ताने आपली कर्म जास्तीत जास्त श्रेष्ठ होतील अशा नियमाचे आचरण करण्याचा प्रयत्न करावा.

या सृष्टीचा नियंता, सर्वाधार, सर्व सत्ताधीश परमेश्वर एकच आहे. हे न जाणता भगवंताच्या स्वरुपाच्या निरनिराळ्या मूर्ती कल्पून प्रत्येक मूर्तीच्या ठिकाणी वेगवेगळे भाव धरून, अनेक हेतू ठेवून त्याची उपासना केली जाते. अश्या भक्तांचे आत्मनिवेदन म्हणजे मला अधिकार दे, पुत्र दे, माझ्या शत्रूंचा नाश कर, संपत्ती दे, घरदार दे, निरोगी ठेंव इत्यादी काम्यभाव ठेवून प्रार्थना केल्या जातात. व त्या मुर्तीजवळ आपल्या प्रार्थनेप्रमाणे प्राप्ति न

झाल्याने जो जसे सांगेल तसेच, विचारही न करतां एक मूर्ती सोडून दुसऱ्या मुर्तीपुढे ह्याच अपूर्ण राहिलेल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रार्थना केल्या जातात. अशा तऱ्हेच्या वर्तनाला भक्ती म्हणता येणार नाही. अशा तऱ्हेच्या भक्तीला व्यभिचारी भक्ती समजली जाते. असा व्याभिचार भगवंताला आवडत नाही. अशी भक्ति मानवाला शांती व आनंद प्राप्त करुन देण्यास समर्थ ठरणार नाही. प्रत्येक मनुष्याने आपल्या जीवनांतील आयुष्याचा अल्पकाळ कां होईना; निष्काम भावनेने एका परमेश्वर प्राप्तीसाठी त्याच्या चरणी अनन्य शरणांगती पत्करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होऊन आनंद व शांतीचा लाभ प्राप्त होऊ शकेल.

भक्ति हि लोकांना दाखविण्याची गोष्ट नाही, तर ती हृदयाचे गुप्त धन आहे. आपली भक्ती फलद्रुप व्हावी असे वाटत असेल, तर स्वभावतःच चंचल असणारे मन एकाग्र होऊन अंती साक्षात्कारासाठी भगवंताच्या प्राप्तीसाठी योग्य व्हावे असे वाटत असेल तर योग्य सदगुरुंचा आश्रय प्राप्त करून घेणे आवश्यक ठरते. एकदां अशा सदगुरुंची भेट झाली की भक्ताला क्रमाक्रमाने परमात्म्याच्या सत्य स्वरुपाचे ज्ञान होते. नंतर ज्ञानोत्तर भक्तीने जीवदशा संपून संसाराचे बंध तुटलेला जीव परमेश्वराच्या राज्यात मुक्ती चा आनंद उपभोगतो.

**ज्ञानयोग:**

ज्ञानाशिवाय कोणत्याही मनुष्याला मोक्ष प्राप्त होणार नाही. आपण ज्याला ज्ञान म्हणतो, ते ज्ञान म्हणजे या व्यवहारी जगात उपजिवीकेसाठी, मान मान्यता मिळविण्यासाठी, शाळां-कॉलेजातूंन दिले जाणारे ज्ञान नव्हे! तर ज्या ज्ञानप्राप्तिमुळे मनुष्याला सर्व सुखात उत्तम मानले जाणारे सुख मिळते, संसार बंधनाच्या चक्रातून सोडवून मुक्ति प्राप्त करुन देते, ईश्वराची प्राप्ती करुन देते ते ज्ञान!

या भारत वर्षातील सर्व संप्रदायाचा हेतू माणसाला ज्ञान प्राप्त करुन देणे हाच आहे. कारण ज्ञानाशिवाय मोक्ष प्राप्त होऊच शकत नाही. जीव हा परब्रह्म परमात्म्याचा अंश आहे, त्याचे मूळ सनातन स्वरुप ब्रह्मच आहे; तो अमर आहे, तो आनंदघन आहे, इ. पुस्तकातूंन किंवा प्रवचनांतून जे ज्ञान मिळते, ते अक्षरज्ञान, वैचारिक ज्ञान होय! जो साधक फक्त वैचारिक ज्ञानसाधना करतो, तो विचारांच्या चक्रातच फिरत रहातो. केवळ वैचारिक ज्ञानसाधना मोक्षदायी होऊच शकत नाही. नुसत्या विचाराने मी मुक्त आहे, असे मानल्याने वैचारिक ज्ञानसाधक मुक्त कसा होईल? शास्त्रकारांनी हे सांगितले आहे, की मी मुक्त आहे असे चिंतन करा, ते याकरिताच, की मन आणि बुद्धि मलरहित होऊन शुद्ध होण्यासाठी! मात्र अशा चिंतनाने साधकाला मी मुक्त आहे, मी ब्रह्म आहे, याची प्रत्यक्ष अनुभूति येणे शक्य नाही!

*अज्ञानं किद्दष्यं चेति प्रविचार्य विविकिना |*
*ज्ञात येन निजरुपम् कैवल्यम् परमम्शिवम् || २२ ||*
*असौ दोषै विर्मुकता किं काम, क्रोध, भयादिभी |*
*सर्व दौषे पैवृतो जीवः कथं ज्ञानेन मुच्यते || २३ ||*
*(योगबीज)*

अज्ञान हे कशा प्रकारचे आहे, याचा विवेकी पुरुषाने गंभीरपणे विचार करावा. केवळ विचारांनी स्वतःच्या अत्यंत श्रेष्ठ अशा कैवल्यरूपाला मी जाणले आहे, असे जे म्हणतात, ते काम, क्रोध, भय इत्यादी दोषांपासून थोडेच मुक्त झालेले असतात? अशा प्रकारे केवळ विचारानेच ज्यांना ज्ञान झालेले असते, ते लोक मुक्त होणे शक्य नाही! मनुष्याच्या ठिकाणी, काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर, अहंकार, शोक, इत्यादी भगवंताच्या प्राप्तीच्या आड येणारे शत्रू आहेत. त्यांचा नाश केल्याशिवाय कैवल्याची प्राप्ति होईल असे म्हणणे, म्हणजे पथ्य पाणी न करता रोग बरा होईल असे म्हणण्यासारखे आहे! जो मनुष्य परमात्मा प्राप्तीसाठी सद्भावनेने या विषयांच्या कळपातून बाहेर पडतो, त्यालाच सत्संग प्राप्त होऊन त्यास परमात्मा प्राप्तीचा मार्ग आक्रमण करण्यास सोपे जाते. असा मनुष्य, परमात्मा प्राप्तीच्या इच्छेत कर्तत्व, मद आणि फलाशा टाकून या जगात कर्म करीत राहातो. अश्या तऱ्हेने परमार्थाच्या मार्गात वाटचाल करीत राहिलेल्या साधकाचा कर्मक्षय होऊन 'गुरु कृपा' होते, व तो ज्ञान प्राप्तीच्या

मार्गाला लागतो. परमेश्वराच्या प्राप्तीच्या मार्गातील कर्मयोग ही पहिली पायरी मानली तर ज्ञानयोग ही होवटची पायरी होय.

आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी, असे भक्तांचे चार प्रकार नारदिय सुत्रांमध्ये सांगितले आहेत. सर्वसामान्य मनुष्य संकटाचे प्रसंग आल्यावर ते निवारण्यासाठी परमेश्वराला शरण जातो, व त्याचे संकट दूर झाले की त्याला विसरुन तो संसारिक भोगातच आसक्त होतो; त्याला 'आर्त' म्हणतात. जो मनुष्य संसारिक भोग हे दु:खमय आहेत, असे समजून संसारांतून विरक्त होतो त्याला 'जिज्ञासू' म्हणतात व जिज्ञासेसहित, परमेश्वर प्राप्तीच्या साधनेला लागतो व अंती ज्ञानाची कास धरतो त्यास अर्थार्थी (परमार्थी) म्हणतात.

धनसंपत्तीची कामना न करणारा, विषय सुखांनासुद्धा दुःखरुप मानणारा, कोणत्याही सुखदु:खाच्या प्रसंगी ईश्वराला न विसरणारा, असा जो ज्ञानी त्यास भक्त म्हणतात!

*तेषां ज्ञानी नित्ययुक्त एक भक्त विशिष्यते |*

*प्रियाहि ज्ञानिनोत्यर्थ महं सच मम प्रिय: ||*

वर वर्णन केलेल्या चार प्रकारच्या भक्तांमध्ये जो तत्ववेत्ता ज्ञानी भकत आहे, त्याचे चित्त माझ्यामध्ये लागलेले असते, ज्याला माझे तात्विक ज्ञान प्राप्त झालेले असेल, असा ज्ञानी भकत सर्वात श्रेष्ठ आहे; म्हणून ज्ञान्यांचा मी प्रिय आहे; व ज्ञानी मला प्रिय आहेत!

ज्ञान-विज्ञान वाचनातून कोणत्याही माणसाला भगवंताच्या सत्य स्वरुपाची प्राप्ती होत नाही. गुरु मुखाने शास्त्रार्थाचे श्रवण करुन, जीव आणि परमात्मा हे दोन्हीच एकच आहे, हे ओळखणे याला ज्ञान म्हणतात, व त्याच्याशी एकरुप होऊन परमात्मा सुखाचा अनुभव घेणे याला विज्ञान असे म्हणतात. उदा. आपणच केलेल्या पदार्थाची चव जोपर्यन्त स्वत: चाखून घेत नाही, तोपर्यन्त तो पदार्थ गोड, आंबट, कडू, खारट, अळणी इ. रुची आपल्याला कळत नाहीत. या स्थितीला ज्ञान म्हणतात. त्याच पदार्थाची आपण जेव्हा चव घेतो व तो कसा आहे याची गोडी प्रत्यक्ष अनुभवतो या स्थितीला विज्ञान असे म्हणतात. अशा विज्ञान संपन्न माणसाला कैवल्य पदाची प्राप्ती होते. अनेक मंत्रांचा असंख्य जप केला, यज्ञ, अग्निहोमादि पावन करणारी अनेक कर्म आचरली व ही सर्व साधने चित्तशुद्धीला अत्यंत शुद्ध करणारी असली, तरी सुद्धा ज्ञानाच्या एका अंशाबरोबरही त्यांच्या पवित्रपणाची तुलना करता येणार नाही. ज्ञाननिष्ठेने एका क्षणांत जो पवित्रपणा प्राप्त होतो, तो तपादि साधनांच्या योगे कल्पांतीही लाभत नाही!

*ज्ञानेन साहितं स्वात्मानंम् ज्ञात्वा:....*

अपरोक्ष साक्षात्कारापर्यंत स्वात्तम्याला जाणून....

*ज्ञानविज्ञान संपन्न: भक्ती भावत: मांभज*

ज्ञान विज्ञान संपन्न होवून भक्ति भावाने मला भज!

पवित्र ज्ञानाच्या योगे, जीवदशेने वावरणारा जीव हा परमार्थ स्वरुप आहे, असे ज्ञानविज्ञान योगी जाणतो. अशा प्रकारचा ज्ञानविज्ञान योगी परमात्त्म्याशी समरस होतो. सर्व ठिकाणी एका परमात्मा वस्तुशिवाय त्याला दुसरे काहीच दिसत नाही. सर्व वस्तूमात्रामध्ये ईश्वर भरलेला आहे. अशी भावना ठेवून, तो या जगात वावरत असतो. अशा प्रकारे एक निष्ठेने आत्मचितंन करणाऱ्या भक्ताला एका भगवंताशीवाय काहीच दिसत नाही. याला शुद्ध भक्ति म्हणतात. अशा तऱ्हेची शुद्ध भक्ति प्राप्त झालेला भाग्यवान जीव सत्व-रज-तम् या गुणांच्या पलिकडे, म्हणजे गुणातीत होऊन, जीवभाव नष्ट झाल्यामुळे, जन्मरणाचे निवारण होऊन परमात्मा स्वरुप होतो. ज्ञानाच्या प्रकाशाने त्याच्याठिकाणी असणारे द्वैत-अद्वैत रुपी अज्ञान नाहीसे झाल्याने, ब्रह्मैक्य भावाने तो परमात्म रुप होतो, ज्या ज्ञानामुळे दिव्यचक्षुचे उन्मीलन होते, जीव दशेला प्राप्त झालेला आत्मा स्वतःचे आत्मस्वरूप ओळखल्यामुळे आनंदाने डोलू लागतो. ते ज्ञान ज्ञानीयांच्या शरीरातून आपली शक्ती कशी प्रगट करते, ते ज्ञान्याच्या इंद्रियांच्या

Copyright © ghagmaharaj.guru 

क्रियांवरुन आपल्याला डोळ्याने दिसते. वसंताचा प्रवेश झाडाच्या टवटवीतपणावरून ज्याप्रमाणे जाणता येतो; त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुषांची इंद्रिये ज्ञानाचे अस्तित्व दाखवित असतात. ज्ञान पुरुषांच्या हृदयां प्रकाशित झालेल्या ज्ञानामुळे त्याच्या देहाच्या ठिकाणी जी लक्षणे उमटतात त्याबद्दल भगवंतांनी गीतेच्या तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकांत पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे -

*अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् |*

*आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनीग्रहः || ७ ||*

**अमानित्त्व:**

कुणाचीही बरोबरी न करणे, मानापमानाविषयी उदासिन, प्रसिद्ध परांडमुखता, वादविवादापासून दूर रहाणे, एकांताची आवड!

**अदंभ:**

वरवर देवाची पूजा करुन, बाह्यवेष धारण करुन, लोकांना मी महान भक्त आहे, असे भासविणारा; जो दांभिक असतो, त्याच्या उलट आपण करीत असलेली भक्ती लोकांना सांगत नाही असा तो अदंभ! लोकांना बरे वाटावे, लोकरंजनासाठी बोलत नाही तो, केलेल्या उपकाराबद्दल जरासुद्धा वाच्यता करत नाही तो! थोडक्यात दांभिक मनुष्य आपल्याजवळ नसलेले सद्‌गुण आहेत असे दाखविण्याचा प्रयत्न करतो. परंतु अदांभिक असलेले चांगले गुण जाणून बुजून दाखविण्याचा प्रयत्न करीत नाही.

**अहिंसा:**

प्राणिमात्रांच्या हत्त्ये बद्दल जरासुद्धा मनात विचार न येणे, दुसऱ्याचे अंत:करण दुखावले जाणार नाही, त्यांना क्लेश होणार नाहीत अशातऱ्हेने बोलणे, तंटा उत्पन्न होईल असे उपरोधिक न बोलणे दुसऱ्याला भिती वाटेल असे न वागणे अशा कृतीस (स्वभावास) अहिंसा म्हणतात.

**क्षमा:**

'सहज क्षमा तेथे ज्ञान' असे समजावे. त्याप्रमाणे केव्हढेही दु:खाचे डोंगर कोसळले तरी न डगमगणे, नानाप्रकारची द्वंद्वे प्राप्त झाली असता श्रम न पावणे.

**आर्जव:**

सर्वांशी समभावनेने प्रेम करणे, कोणाही विषयी विकल्प न धरणे, दहाही इंद्रिये सरळ, निष्कपट शुद्ध असणे, कोणासही शुद्र बुद्धीने न वागविणे, याला आर्जव म्हणतात.

**आचार्योपासना:**

शोक ग्रस्त जीवाला ब्रह्मपदाला नेणाऱ्या सद्‌गुरूंची पंचप्राणाने सेवा करणे. अन्तरमनादीक व बाह्यइंद्रियादिक गुरुला अर्पण करणे. सद्‌गुरूविषयी खरे प्रेम, तळमळ, गुरुआज्ञा मानणे, यास आचार्योपासना म्हणतात.

**शौच:**

कापूर ज्याप्रमाणे अन्तर्बाह्य शुद्ध असतो, त्याचप्रमाणे ज्याचे शरीर अन्तर्बाह्य शुद्ध असते, त्याच्याठिकाणी शुचित्व असते. योगाने बाह्य शरीर व ज्ञानाने अन्तरशुद्धी याला शौच म्हणतात. कोणत्याही मनोविकाराने वृत्तीत फरक पडत नाही याला शौच म्हणतात.

**स्थैर्य:**

प्राणी-मात्रांच्या ठिकाणी असणाऱ्या क्षुधादी उर्मीपैकी एकानेही चित्तात चंचलता उत्पन्न होत नाही, दारिद्रयापासून दु:ख, मृत्युपासून भय, निंदा, अपमान, शोक, मोह यांच्या लाटांपासून विचलित होत नाही. त्याला स्थैर्य म्हणतात.

**अन्त:करणनिग्रह:**

बेफामपणाने बाह्य गोष्टीकडे आकर्षित हेणाऱ्या मनाला काबूत ठेवणे, चित्ताचा संकोच होण्यासाठी देहाला झिजवून निग्रह करणे. समाधी प्राप्त होईपर्यंत ध्यान दृढ करणे. चित्त व चैतन्याच्या समरसतेने अन्तर्मुखतेत रममाण होणे, इत्यादी ज्ञानाची उत्तमोत्तम लक्षणे सांगितली आहेत. ती ज्ञानी पुरुषांच्या आचरणांत येणारी लक्षणे होय. तेव्हा ज्ञान ही बुद्धिची मिरासदारी आहे, असे समजण्याची कोणीही चूक करु नये.

*तपस्तीर्थ जपोदानं पवित्राणी तराणिच् |*

*नालंकुर्वन्ती तां सिद्धीं या ज्ञान कलयाकृता ||*

जी सिद्धी ज्ञानाच्या लेशाने मिळते, ती तप, जप, तीर्थ, दान व इतर पवित्र साधने यातील कशानेही प्राप्त होत नाही. परमात्मा प्राप्तीसाठी इतर असलेल्या साधनांनी जे प्राप्त होत नाही, ते ज्ञानाच्या एका अंशाने प्राप्त होते.

पिंडाची संहारणी होऊन दिव्यचक्षूंचे उन्मीलन झाल्याशिवाय, परमेश्वराविषयीचे आत्मविषयाचे सत्य ज्ञान होणार नाही. परमेश्वराचे ज्ञान हे तर्क बुद्धीच्या पलीकडचे आहे, असा त्याचा अर्थ आहे. आत्मज्ञान ही एक अत्यंत श्रेष्ठ अशी अनुभूति आहे. ही अनुभूति शब्दच्छलाने, पांडित्याने किंवा तर्काने मिळण्यासारखी नाही. जोपर्यंत आत्मसाक्षात्कारी सत्पुरुषांची गाठ पडत नाही, तोपर्यंत प्रत्यक्ष अनुभूति मिळणार नाही. कारण ज्याला आत्मानुभूति प्राप्त झाली आहे असेच सत्पुरुष ती दुसऱ्याला देवू शकतात. कर्मयोग, हटयोग, मंत्रयोग वगैरे साधकाला विशिष्ट मर्यादेपर्यंत आणून सोडतात. पूर्णत्वाला जाण्यासाठी सद्गुरुंच्या कृपेची आवश्यकता असते.

*मनएवं मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो |*

*बंधाय विषयासंगो मुकत्ये निर्विषयं मन ||*

*मनच मनुष्याच्या बंधनाला कारण आहे.*

*आणि मनच मोक्षालाहि कारण आहे.*

इंद्रिय विषयांत गढून गेलेले मन बंधाला कारण होते, व निर्विषय झालेले मन मोक्ष प्राप्तीला सहाय्यभूत होते. जो मनुष्य मनाला वश करु शकत नाही त्याचे जीवन नाश पावते. मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे न जिंकलेले मन! जोपर्यंत असा शत्रू आपणाजवळ आहे, तोपर्यंत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांच्या आज्ञेने आपले जीवनकार्य संपंवण्यासारखे आहे. परंतु मनुष्याने अशा शत्रूवर विजय प्राप्त केला, तर त्याच्या प्राप्तीने परमेश्वर प्राप्तीच्या मार्गात बहुमोल सहाय्य प्राप्त होते. म्हणून अष्टांग योगाच्या सहाय्याने मन-प्राण व शरिर वशीभूत करून ज्ञान प्राप्तीचा प्रयत्न करावा, शास्त्र अध्ययनाने ज्ञानाबद्दल जो निश्चय होतो त्याला शास्त्रसिद्ध 'परोक्षज्ञान' म्हणतात. तसेच तपश्चर्या, योग साधना करुन जो प्रत्यक्ष अनुभव येतो, त्याला साधनसिद्ध 'अपरोक्ष

विज्ञान' म्हणतात. शास्त्रसिद्ध परीक्षोज्ञान हे अस्थिर आहे. व जे अस्थिर असते ते अनेक तर्कवितर्कामुळे बदलू शकते. त्यामुळे चित्ताला खरे समाधान मिळू शकत नाही. परंतु साधन सिद्ध अपरोक्ष ज्ञान हे तृप्तीचा लाभ झाल्यामुळे स्थिर असते त्यामुळे ते बदलत नाही. ज्ञानी लोक असे निश्चितपणे सांगतात की, अपरोक्ष ज्ञानाशिवाय मोक्षप्राप्ति होणार नाही. म्हणून परमेश्वर प्राप्तीची ओढ असलेल्या प्रत्येक साधकाने श्रेष्ठ अनुभूतीसाठी योग साधना करणे आवश्यक आहे. योग म्हणजे मिळणे परमेश्वराच्या स्वरुपात मिसळून जाणे. योग हा मनुष्याच्या प्राकृतिक अवस्थेतून परिपूर्ण अशा साक्षात्कारापर्यंत वर चढण्याची शिडी आहे. जर मनुष्याला ब्रह्मसाक्षात्कार करुन घ्यावयाचा असेल, प्राप्त असलेल्या परमेश्वर ज्ञानाची अनुभूति घ्यायची असेल, तर ज्ञान आणि योग या दोघांच्याही अनुष्ठानाने आपले अंतिम ध्येय साध्य करण्याच्या प्रयत्नाला लागले पाहिजे.

*तत्त्वं विज्ञानमानंदं ब्रह्मविदोविदुः |*

*हेतुदृष्टांतरहीतम् वाडमनोभ्याम् गोचरम् ||*

परम तत्त्वाला जाणणारे ज्ञानी लोक सांगतात की विज्ञान, आनंद ब्रह्म हेच खरे तत्त्व आहे. हे हेतू दृष्टांतरहित असून मन - वाणीच्या पलिकडचे आहे. नुसत्या तर्काने किंवा शास्त्र पांडित्याने त्याची प्राप्ती होणार नाही. कारण ते ज्ञान युक्ती, तर्क, दृष्टांतद्रार आपल्याला समजत नाही. दुसऱ्यालाहि समजून देता येत नाही. वैचारिक ज्ञान साधना करणाऱ्या जीवाला अनेक जन्मानंतर योगची प्राप्ती होते योग्याची अनुष्ठानाशिवाय अपरोक्ष अनुभूति प्राप्त होणार नाही. परंतु............

*अनुष्ठान विना मुढो वृथा ब्रह्मषि मोदते |*

*प्रतिबिंबित शाखाग्रफलास्वादन मोदवत ||*

जे लोक योग साधनेचे अनुष्ठान न करता आपल्याला महाज्ञानी समजतात ते मुढलोक प्रतिबिंबीत वृक्ष शाखेच्या अग्रभागी लागलेल्या फळाच्या आस्वादनाप्रमाणे ब्राह्मज्ञानाचा वृथा आनंद घेतात. अशा लोकांना ज्ञानाचे फळ मिळत नाही. म्हणून योग साधना अवश्य केली पाहिजे. नुसत्या पुस्तकी ज्ञानाने, वैचारिक ज्ञान साधनेने मी मुक्त आहे, असे मनाने मानल्याने थोडीच मुक्ती प्राप्त होणार आहे ? तर सर्व बंधनातून मुक्त होण्यासाठी सत्य स्वरुपाची प्राप्ती करुन घेतली पाहिजे. त्याच्या प्राप्तीसाठी योग हे प्रत्यक्ष प्रमाण आहे. अष्टांग योग साधना करणाऱ्यांना यम, नियम, आसन, प्राणायम् इत्यादी गोष्टीं बरोबरच दृढ विश्वास व परमेश्वरी प्रेमाने सतत अभ्यास करीत राहिले पाहिजे. अशा अभ्यासाने उच्च स्थिती प्राप्त झालेली असता मनुष्याच्या शरीरात असलेली दैवी शक्ति जीला 'कुंडलिनी शक्ती' म्हणतात ती जागृत होते. सहस्त्रार चक्रांत स्थित असलेल्या शिवाला भेटण्यासाठी मुलाधार चक्रांत निद्रिस्त असलेली ही कुंडलिनी शक्ति जागृत होऊन सुषुम्नेच्या मार्गाने शिवाला भेटेल त्याचवेळी मनुष्य मुक्त होईल. यालाच परमेश्वरी साक्षात्कार म्हणतात. जोपर्यंत शिव आणि शक्ती चे मिलन होत नाही तो पर्यंत मनुष्य जीवदशेलाच राहणार म्हणून परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी कुंडलिनी जागृतीची आवश्यकता आहे. जर भक्तीयुक्त अन्तःकरणाने, योगसाधनेद्वारे मनुष्याने कुंडलिनी शक्ति जागृत करुन त्या आदि शक्ती च्या सहाय्याने मन, प्राण व शरीर, सामर्थ्यसंपन्नं करुन प्रकृतीवर प्रभुत्व मिळविले तरच निर्विकल्प समाधी" प्राप्त होऊन जीव ब्रह्मरूप होण्याचा योग प्राप्त होतो. परमेश्वराप्रत जाणारे जे मार्ग शास्त्राने सांगितलेले आहेत त्यांचे निष्ठापूर्वक आचरणानेसुद्धा कुंडलिनी जागृत होते. परंतु या सर्व मार्गापेक्षा ती प्राणायमाच्या अभ्यासाने लवकर जागृत होते. प्राणायमाचा अभ्यास करण्यासाठी एकान्त स्थळाची आवऱ्यकता असते. साधकाने एकान्त स्थळी बसण्यासाठी आसन म्हणून दर्भासन घालावें. त्यावर मृगचर्म आणि स्वच्छ मूदुकापड घालून पद्मासनांत बसावे. आसन फार उंच व सखलहो असू नये. सद्गुरुंना प्रणाम करावा. साधनेत कोणतेही विघ्न न येता साधनेची सिद्धता प्राप्त होवो, अशी प्रार्थना करावी. मन आणि इंद्रिय-निग्रह करुन (इंद्रिय निग्रह म्हणजे अजिबात विषय मोडून नव्हे तर विषयासक्ती टाकून) नियमन करणे. जो इंद्रिय निग्रह साधतो; त्याचे मन एकाग्र होते. अशा तऱ्हेने मन एकाग्र करुन प्राणायामाचा अभ्यास करावा. त्यावेळी साधकाने आपले शरीर, पाठ, मान आणि मस्तक उभी सरळ रेषेत ठेवावीत आणि नासिकाग्राकडे स्थिर पहावे. याप्रमाणे शांत चित्ताने मनाला वश करुन भिती न बाळाता संयमाने

लौकिक जीवनातून मुक्त राहून प्राणायामाचा अभ्यास चालू ठेवावा. इंद्रिय-निग्रह न करता नुसत्या योगाच्या वर्गांना जाऊनअभ्यास केल्याने योगी होता येणार नाही. तर मनसयंमाचा अभ्यास व इंद्रिय सुखोपभोगानंतर टाळूनच प्राणायामाचा अभ्यास केला पाहिजे. तज्ञ गुरुंच्या मार्गदर्शनाखाली सतत केलेल्या प्राणायामाच्या अभ्यासाने निद्रिस्त आद्यशक्ति कुंडलिनी प्राण आणि अपानरुपी हवनाने जागृत होते व शिवाच्या मिलनार्थ अनादी कालापासून निद्रिस्त असलेली ही शक्ति आपल्या निद्रेचा त्याग करून मार्गस्थ होते. जसे जसे प्राणाचे अपानात, व अपानाचे प्राणात हवन होईल, तसतसे अनेक प्रकारची दृष्ये साधकाच्या दृष्टीसमोर दिसू लागतील. अन्तर आकाशांत महाज्योतीचा प्रकाश दिसू लागेल. आनंदाने मन बेहोश होईल. चैतन्य ज्या दहा प्रकारांनी भासमान होते ते प्रत्ययाला येईल. निरनिराळे दिव्य अनुभव येऊन मन प्रसन्न होईल ह्या क्रिया होत असतानासुद्धा सतत आत्मचिंतन व रोज प्राणायाम करीत राहिले पाहिजे, तरच शिवाचे व शक्ती चे मिलन होईल, जीव मुक्त होईल. परंतु प्राणायामामध्ये काही धोके सांगितले जातात म्हणून ज्ञानी गुरुच्या मार्गदर्शनाची आवऱ्यकता असते.

पंथराज अर्थात महायोग. पंथराज म्हणजेच परमेश्वर प्राप्तीचा राजमार्ग! या महायोगाची लक्षणं:

*मंत्रो लयो हठो राजयोगोन्तभूर्मिका क्रमान् |*
*एक एव चर्तुर्धयं महायोगोभिधीयते ||*

सर्वसामान्य जन मंत्रयोग, हठयोग, लययोग, राजयोग हे निरनिराळे योग आहेत असे समजतात, हे खरे नाही. या चारहि योगाने कुंडलिनी शक्ती जागृत होते व साधक परमेश्वर प्राप्तीच्या खऱ्यामार्गाला लागतो म्हणून कुंडलिनी शक्ती ला महायोग म्हणतात. पूर्वजन्माच्या सुकृताने ईश्वराचा कृपाप्रसाद प्राप्त झाला तरच समर्थ सद्गुरु म्हणजे जे स्वत:च्या शक्ती च्या सामर्थ्याने शिष्याची कुंडलिनी शक्ति ताबडतोब जागृत करतात अशा सद्गुरूंची प्राप्ती होते व शिष्याचे कार्य होते. कुंडलिनी शक्ती या विषयासंबधी अनेक लोकांत पुष्कळ गैरसमज आहेत. काहीजण स्वार्थीपणामुळे म्हणा अगर अडाणीपणामुळे म्हणा अशा तऱ्हेचे गैरसमज सामान्य लोकांत पसरविणाचा प्रयत्न करीत असतात. वारकरी सांप्रदाय ज्यांना आपले दैवत मानतो, ज्यांचा योगियाचे योगी 'ज्ञानराज' असा आदराने उल्लेख करतो, त्या ज्ञानराजांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरीत योगाबद्दल व कुंडलिनी शक्ती बद्दल अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. त्या त्यांच्या उल्लेखांकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करून योगाने परमेश्वर मिळणार नाही, कुंडलिनी वगैरेकडे साधकांनी लक्ष देऊ नये, तो मार्ग अत्यंत कठीण आहे, म्हणून फक्त नाम जपा! असे काही लोक सांगतात. त्याचबरोबर ते हेही सांगण्यास विसरत नाहीत की कुंडलिनी जागृती वेड लागते, अनेक रोग होतात आपत्तींना तोंड द्यावे लागते व ती संतापून वर चढली की माथे भडकते! अशा तऱ्हेची विधाने करणाऱ्या लोकांविषयी शंका निर्माण होतात की यांना ज्ञानदेव समजले की नाही? यांना शक्तिही समजलेली नाही व त्यांच्या साक्षात्काराबद्दल बोलायलाच नको. वरील गोष्टी खेदाने लिहिण्याचे कारण की खऱ्या साधकांचा अशा तऱ्हेच्या वक्तव्यामुळे बुद्धीभेद होतो व त्यामुळे साधक खऱ्या साधन मार्गाला मुकला जावून जीवनात काहीच प्राप्त न झाल्यामुळे निराश होतो. हटयोगाबद्दल, ज्ञानदेवांनी काही ठिकाणी काढलेले उदगार लोकांच्या समोर बोलून साधकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न क शासाठी केला जातो? हे त्यांचे त्यांनाच माहित! हटयोगाबद्दल ज्ञानदेवांनी आपल्या हरीपाठांत, योगयाग विधी | येणे नोहे सिद्धी || बायाची उपाधी | दंभ-धर्म || अशा तऱ्हेचा दोनतीन ठिकाणी उल्लेख केला आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हटयोगाचा मार्ग म्हणजे बोचऱ्याने लोखंडाचे चणे खाण्यासारखे आहे. योगाने कैवल्याची प्राप्ति होणार नाही असा त्यांच्या म्हणण्याचा हेतू नाही. पू. मामा दांडेकरांनी ज्ञानेश्वरीवरील भाष्य केलेल्या, ग्रंथाच्या प्रस्तावनेत ज्ञानेश्वरीतील पंथराज अथवा कुंडलिनी योग या लेखात लिहिले आहे की, ज्ञानेश्वर महाराज म्हणतात - पिंडाचा ग्रास करायचा हे आमच्या नाथ सांप्रदायाचे रहस्य आहे. परंतु महाविष्णुने 'प्रशांतात्मा' इ. दोन तीन इलोकांत या नाथ रहस्याचा ओझरता उल्लेख केला, आणि आपण श्रोतेमंडळी या विषयांतील तज्ञ व आवड असणारे असल्यामुळे श्रीकृष्णानी ज्याचा नुसता अंश दाखविला ती गोष्ट स्पष्ट करून आपणांसमोर मांडत आहे. एरव्ही गीतेचा मुख्य विषय हा नव्हे, हे जाणताचं.

*पिंडे पिंडाचा ग्रासु | तो हा नाथसंकेतींचा देशु |*
*परि दावूनी गेला उद्देशु | महाविष्णु || ६ || २९१ ||*

*तया ध्वनिताचे केणे सोडुनी / यथार्थाची घडी झाडुनी /*

*उपलविली म्यां जाणुनी / ग्राहीक श्रोते // ६ // २९१ //*

याविषयी सुशिक्षित आणि अशिक्षितां मध्ये सारखाच गैरसमज आहे. ज्ञानराजाने इतके स्पष्ट लिहिलेले असूनसुद्धा मोठमोठे लेखक, ज्ञानराजांना 'माऊली' म्हणून त्यांचे भजन करणारा, परंपरेने ज्ञानराजांशी आपला संबंध जोडणाऱ्या वारकरी पंथातील कित्येक वारकऱ्यांच्या ठिकाणी या महायोगासंबंधी अज्ञान दिसून येते. पुढे ते असे म्हणतात, "ज्ञानराजांच्या काही उदगारांवरून काही वारकरी ह्यात योगाची निंदाच आहे, असे समजून योगमार्ग हा सर्वथा तिरस्कारणीय आहे, अशी आपली विपरीत कल्पना करून बसले आहेत. पण हा एक अज्ञानाचा प्रकार आहे. उलट गीतेत ज्या ज्या वेळी त्यांना साधन म्हणून सांगण्याचा प्रसंग आला, त्या त्या वेळी योगाचाच उल्लेख त्यांनी केला आहे. ! कुंडलिनी शक्ति विषयीसुद्धा अनेक ठिकाणी उल्लेख केला आहे.''

*आधार शक्तिचीया अंकी / वाढविशी कौतुकी / अ- १२ - ५*

*तेथे उल्हाट शक्तीचेनि उजिवडे / मन पवनाचेनि सुरवाडे /*

*सतरावियेचे पाणी आडे / बळीयाविळे /*

*(ज्ञाने, अ. ९. // २१४ //*

*मग कुंडलिनीयेचा टेंभा / आधारी केला उभा /*

*अ. // १८ // - ५१*

*कुंडलिनी जागवूनी / मध्यमा विकासूनि /*

*आधारादि भेदूनी / अग्निवरी // १८ // १०३८ //*

हे सर्व एवढ्यासाठीच लिहिले आहे, की ज्ञानेश्वर महाराज या कुंडलिनी योगाला किती महत्त्व देतात हे सर्वांना कळावे म्हणून. योगाकडे दुर्लक्ष केले तर ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने आपण अडाणी ठरू. ज्ञानदेवांनी तेराव्या अध्यायांत अज्ञानाची लक्षणे सांगितली आहेत. त्यामध्ये ते म्हणतात.

तो अज्ञानी की; जो 'उपनिषदांकडे न वचे' व ज्यास "योगशास्त्र न रुचे'.

कुंडलिनी जागवून जो मार्ग आक्रमण केला जातो त्याला ज्ञानेश्वर महाराज पंथराज असे म्हणतात. त्याप्रमाणे स्वामी विवेकानंद राजयोगाच्या चौथ्या प्रकरणांत म्हणतात, ''संपूर्ण ज्ञान आणि संपूर्ण चैतन्य यांची प्राप्ति करून घेण्याकरीता कुंडलिनी जागृत करणे हा एकच उपाय आपणाला उपलब्ध आहे.'' वरील सर्व शास्त्र ही शेवटी कुंडलिनी जागृतीची आवश्यकता कुठवर आहे येथपर्यन्त आणून सोडतात. इतर सर्व शास्त्रांचा विचार तथा अवलंब केल्यावर शेवटी एकच निष्कर्ष निघतो, की आत्मशक्ति कुंडलिनी जागृतीनेच मनुष्याला संपूर्ण ज्ञान व संपूर्ण शक्ति यांची प्राप्ती होते. असो - समर्थ सदगुरुंकडून अनुग्रह प्राप्त होताच कुंडलिनी शक्ती चे जाग्रण होते. शक्ति जागृतीनंतर साधकाला निरनिराळ्या योगक्रिया व दिव्य अनुभव येऊ लागतात. शिष्याच्या मन प्राण आणि शरीरात नाना प्रकारच्या बाह्य व आंतरिक कंपनादी क्रिया होवू लागतात. साधक उल्हासित होऊन हसतो, रडतो तसेच भावूपर्ण अविशांत येवून महाआनंदीत होऊन परमप्रसन्नता प्राप्त करून घेतो. जमिनीवर पडून गडबडा लोळतो आनंदात येऊन गाऊ लागतो, निरनिराळ्या वाद्यांच्या आवाजाचे मुखाने अनुकरण करतो, कवितांची रचना करतो. इ., गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्या कारणाने अशा तऱ्हेने मन - प्राणाच्या विक्रिया होऊन जे साधन होते, त्यालाच वास्तविक योग म्हणतात. या योगात होणाऱ्या क्रियांची संख्या व त्यांच्या स्वरुपाची वर्णन करणे हे मानवी बुद्धीच्या पलिकडचे आहे. साधकाला आसन, प्राणायाम, मुद्रा अशा चित्रविचित्र अनेक प्रकारच्या योगक्रिया होतात व त्या पुष्कळवेळा होतच रहातात. परंतु त्यावेळी साधकाचे मन पराधीन नसते. त्याचप्रमाणे ते ज्ञान शून्यहि नसते. तर ते पूर्ववत शाबूत असते. आनंदमदानी मन उल्हासीत होणे आन्तरीक प्रेरणेने क्रिया करू लागणे, या अवस्थेतही त्या साधकाची बुद्धी निश्चिल रहाते. मनात आल्याबरोबर तो सर्व क्रिया पासून निवृत्त होऊन पूर्ववत् आपल्या अवस्थेवर येतो. या क्रिया फक्त दिक्षेच्या वेळी होतात असे नाही तर शिवशक्तिचे जोपर्यंत मिलन

होत नाही किंवा जोपर्यंत मुक्ती प्राप्त होत नाही तो पर्यंत, जन्म जन्मांतरातही क्रिया होतच राहतात. साधकाने गुरु आज्ञेप्रमाणे रोज सकाळी व संध्याकाळी आसनावर बसून साधना केली पाहिजे. या साधनेच्यायोगे प्रतिदिवशी निरनिराळ्या क्रिया होवून अनेक तऱ्हेचे दिव्य अनुभव येवू लागतात.

*उन्मनाः पतनोत्थाने / मुर्च्छनाचमुर्हमुहः /*
*देहेंद्रयाणाम्वशः समवचस्थानिगद्यते //*

योग साधन करणाऱ्याला जमिनीवर पडणे, उठणे, अनेक प्रकारची आसने होणे, वारंवार व्यायाम करणे तसेच श्वास प्रश्वास घेणे, सोडणे इ. क्रियामुळे उन्मनी अवस्था प्राप्त होते. या उन्मनी अवस्थे पूर्वी साधकाला अनेक प्रकारच्या क्रिया होतात. आसन, प्राणायाम, बंध, मुद्रा नाडीशुद्धी इ. क्रिया होऊन साधकाला समाधी प्राप्त होते. समाधी नंतरही आवश्यकता असल्यास शक्तीकडून क्रिया करविल्या जातात. ह्या निरनिराळ्या क्रिया असून, त्यामध्ये साधकाला, शांभवी मुद्रा, खेचरी मुद्रा, आपोआप होतात. शांभवी मुद्रा ही सर्व तंत्रात गुप्त असुनसुद्ध साधकाला ती प्रयासाशिवाय प्राप्त होते. त्याचप्रमाणे खेचरी मुद्रेत जीभ उलट फिरून टाळूत जाऊन बसते ब अमृत रसाचे पान करते. अशा तऱ्हेने शिवाच्या स्थानातील अमृताचा बोध करून देणारी खेचरी मुद्रा त्याप्रमाणे परमेश्वराच्या स्वरूपाचे दर्शन घडवू आणणाऱ्या शांभवी मुद्रेच्या प्रभावाने साधकाला विभुत्त्वाचा बोध होतो. या क्रिया साधकाला विनासायास होतात. या क्रियेनंतर साधकाच्या शारीरिक क्रिया कमी होऊन फक्त प्राणाच्याच क्रिया होतात. या प्राणक्रियांनी प्राण सुषुम्ना विवरात प्रवेश करतो. त्यानंतर तो आत्मतत्त्वात तन्मय होतो. आत्मतत्वात तन्मय झालेला साधक परमसुख अनुभवतो. आनंद उपभोगतो परंतु तो त्याचे वर्णन करूं शकणार नाही. सदगुरुंच्या शक्ती संचाराने - भक्ती साधनेने - किंवा पूर्व जन्माच्या प्रबळ पुण्य प्रभावाने कुंडलिनी शक्ति जागृत होते. त्या वेळी पूर्वजन्मात अर्ध्यावर राहिलेली साधना पूर्ण होण्यासाठी पुढे चालू होते. ज्या मनुष्याच्या ठिकाणी, कंम्प, श्वेद, अश्रुपात, विकृत शब्दोच्चारण, नाचणे, हसणे, ओरडणे या प्रकारच्या क्रिया आनंद प्राप्तीच्या आवेशाने वारंवार होतात व ती सर्व अकृत्रिम लक्षणे उक्त भावनेने प्रकट होत असतात ते भक्त उत्तम श्रेष्ठ साधक समजावेत. याप्रमाणे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर खऱ्या योग साधनेला सुरुवात होते, यालाच सिद्ध महायोग म्हणतात. यामार्गामुळे सर्व वेदमयी देवी, सर्व मंत्र स्वरुपिणी, सर्व मंत्रात्मक विद्या, वेदविद्या, प्रकाशिणी, सर्व वेद ज्ञानमयी, मंत्र स्वरुपीणी सर्व मंत्रात्मिका, विद्या आणि वेद विद्येचा प्रकाश करणारी शक्ति साधकांकडून क्रिया करविते आणि त्याच्यायोगाने समस्त मंत्र व सर्व विद्येचे ज्ञान प्रकाशित होते; ज्याची कल्पनाहि करता येणार नाही अशी अदभूत आश्चर्यकारक क्रिया, जागृत झालेली कुंडलिनी शक्ती साधकांकडून करवून घेते. कुंडलिनी शक्ति ज्यावेळी सुषुम्ना मार्गात प्रवेश करते त्यावेळी ती साधकाला क्रमाक्रमाने समाधीची अवस्था दाखविते. परंतु सुषुम्ना नाडीत प्रवेश सहजासहजी होत नाही कारण शरीरातील सर्व नाड्या मलाने आवृत्त झालेल्या असतात. म्हणून साधकाला प्रथम नाडी शुद्धिच्या क्रिया होतात. नाडी शुद्धतेनंतर शरीराची स्थिरता होण्यासाठी सिद्धासन, पद्मासन, स्वस्तिकासन, विरासन, मयुरासन, मंडूकासन वगैरे अनेक प्रकारची आसने होतात. त्यामुळे शरीराला स्थिरता प्राप्त होते, शरीर निरोगी होऊन पूर्व जन्मातील अतीसूक्ष्म संस्कार देखील या सिद्ध साधनेने नाहीसे होतात. प्रत्येक जीव लक्षावधी योनी भोगून जन्माला आलेला असल्यामुळे पूर्व जन्मातील निरनिराळे संस्कार असतात. त्यामुळे भिन्न प्रकृती व भिन्न प्रवृत्ती असलेल्या साधकांना एकसारख्या क्रिया होत नाही. परंतु सर्वांच्या साधनेचे अंतिम फल समाधी ज्ञान, मोक्ष हेच आहे. जागृत कुंडलिनी शक्ती च्या द्वारे ज्या क्रिया होतात त्या निरर्थक नसतात. त्यापासून साधकांच्या सर्व पापांचा नाश होऊन साधक अद्वैत ज्ञानाने शिवरूप होतो. समर्थ सद्‌गुरुकृपा होवून शिष्याची कुंडलिनी शक्ती जागृत झाली, तरीसुद्धा त्याची कृपा संपादन करण्यासाठी त्यांना शरण जाण्याची आवश्यकता असते. साधकांना गुरु हे परमतत्व आहे. गुरु हे परमेश्वराचे स्वरूप आहे. गुरू हेच आपले आराध्य दैवत आहे. याप्रमाणे आपल्या गुरुवर निष्ठा ठेवली तरच आपण स्विकारलेल्या साधनेत आपली प्रगती होऊन आपले जे अंतिम ध्येय-म्हणजे परमेश्वर प्राप्ती आहे ते संपादण्यात यशस्वी होऊ असे समजावे.

# शक्तिपात योगाचे शास्त्रीय विवरण

- डॉ. राजेश गायकवाड

आजच्या धकाधकिच्या जीवनात सर्वसाधारण लोक एव्हडे मेटाकुटीला आले आहेत की, ह्या खडतर जीवनाचा प्रवास सुखकर व्हावा, आपल्याला क्षणीक कां होईन पण मन:शांती मिळावी आणि ती मिळविण्यासाठी कोणा सतपुरुषांचे मार्गदर्शन असावे असे त्यांना वाटत असते. अशा सुपुरुषांच्या शोधात हे लोक असतात आणि काहि मंडळी ह्याचाच फायदा ह्या सामान्य जनांकडून उठवत असतात. हल्ली जो तो उठतो तो गुरू बनतो. जेथे जावे तेथे गुरुच गुरू. अलिकडे गुरुंचे पेवच फुटले आहेत. ह्या मंडळींना एकदम हे गुरुपद कुठून मिळते हे कळत नाही. ह्यापूर्वी ते कुठे होते? काय करीत होते? त्यांची किती प्रदिर्घ साधना अथवा तपश्चर्या आहे ह्याचा जरासुद्धा थांगपत्ता लागत नाही. परंतु अशा ह्या स्वयंम् घोषित गुरुंच्या नावांचा गलबला ऐकून बिचारी साधी भोळी सामान्य जनता दिशाहिन झाली आहे. जो कोणी गुरु येतो तो आपला नवा पंथ काढतो. स्वत: मात्र तो कोणत्याही गुरुचा शिष्य नसतो, परंतु तो सर्वांचा गुरु बनायला पहातो हे बाकी नक्की! हा सुद्धा एक उदर भरण्याचा नवा धंदा झाला आहे. उपजिविकेचे साधन बनले आहे. परिश्रमविना चालणारा व्यवसाय बनवून ऐषोआरामाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु हे किती योग्य आहे?

गुरुस्थानी मानून घेणाऱ्या त्या व्यक्तीमध्ये अशी अलौकिक शक्ती असली पाहिजे की, जो आपल्या सामर्थ्याने, शक्ती ने सामान्यजनांच्या जीवनात आनंद निर्माण करुन त्याला परमेश्वराचे दर्शन घडवून आणेल. परमेश्वर शक्ती चे स्वरुप प्रत्येक मानवी देहात आहे. मग ही शक्ती कोण संचारित करु शकतो ? तर तो सत्पुरुष, जो शक्ती पाताद्वारे आंतरशक्ती कुंडलिनीला जागृत करुन मानवी देहात परमेश्वराची शक्ती संचारित करतो, जो योगाची विद्या देतो, ज्ञानाची शक्ती देतो, भक्तीचे प्रेम देतो, जिवंत असतानाच मोक्ष प्राप्ती करुन देतो, तो परम्गुरु, सद्गुरु शिवाचे अभिन्न रुप होय.

ईश्वराची शक्ती सर्व व्यापक आहे आणि ईश्वर सर्वांच्या हृदयात विराजमान आहे. मग ईधर आतून मार्गदर्शन करेलच की! मग गुरुंची आवश्यकता कां? असा काही लोकांचा समज आहे. पण त्यांच्या विचाराप्रमाणे वागणे किंवा विश्वास ठेवणे योग्य नव्हे. अहो, पाण्यावर नाव (होडी) सोडली तर पाण्याचा प्रवाह जिथे जाईल तिथे ती नांव भरकटेल. तीचा प्रवास दिशाहिन असेल. मग योग्य स्थळी ती नाव घेऊन जाण्यासाठी नावाड्याची गरज भासत नाही कां? भासते. गरज जरुर भासते. त्याच प्रमाणे शरिरात वास करणाऱ्या ईश्वरी शक्ती ला संचारित करण्यासाठी सद्गुरुंचे मार्गदर्शन असणे अत्यंत आवश्यक आहे. हृदयात वास्तव्य करणारा ईश्वर कायेच्या आवरणाने झाकलेला आहे, म्हणून अप्रत्यक्ष आहे. तसा तो तेथे राहून नियतीच्या नियमानुसार कालचक्रावर घालून माणसाला फिरवीत असतो. ('भ्रायसन सर्वभूतानि यन्त्रारुठानि मायया' - भगवतगीता अध्याय-१८ श्लोक:६१) त्यामुळे मनुष्याचा उद्घार होऊ शकत नाही. ज्या गुरुमध्ये ईथर प्रकट झाला आहे, त्याच्या कृपेने जेव्हा हे आवरण दूर होते, तेव्हा हृदयस्थ ईश्वर प्रकाशित होऊन साधकाचे कल्याण करतो. परंतु अशा विद्येबद्दल माहिती नसणारे त्यांचा अवमान करतात. आजकालच्या भौतिकयुगात तर ह्या गोष्टीचे अज्ञानच आपल्याला दिसून येते. ह्या विद्येचे ज्ञान सर्वांना करुन देणे फार महत्त्वाचे आहे.

शरीरशास्त्राप्रमाणे मानवी शरीर हे अनेक अवयव व इंद्रियांनी बनलेले असले तरी ते मांसमय पिंड नसून ते सोळा सहस्र एकशे आठ नाड्यांच्या समुदायाची एक उत्तम रचना आहे. ह्या सोळा सहस एकशे आठ नाड्या आणि नऊ द्वारे इत्यादी अष्ट चक्रे मिळून जसे काही एक घरच आहे. सोळा सहस्र एकशे आठ नाड्यांमध्ये १ ०८ नाड्या मुख्य आहेत. त्यापैकी ३ अतिमुख्य आहेत, त्या म्हणजे इडा, पिंगळा आणि सुषुम्ना.' ह्या तिन्हिंमध्ये सुषुम्ना मध्यनाडी अधिक महत्त्वपूर्ण आहे. सुषुम्ना नाडीद्वारे जीवनाचे सर्व कार्य होत असते. हो नाडी परमशिवाचे निवासस्थान. सहस्त्रापासून ते कुंडलिनी नाडीच्या मूलाधार नाडीपर्यंत अखंडरुपाने व्यापून राहिली आहे. मध्यनाडी सुषुम्नामध्ये महाशक्तिविहित आहे, ठेवलेली आहे. श्रीसदगुरुकृपेने जागृत झालेली कुंडलिनी महाशक्ती पंचप्राणाच्या आधारे १६, १०८ नाड्यांमध्ये राहून सर्वांगाला व्यापून टाकते. हो शक्ती सप्तधातूंमध्ये तसेच रसरक्ताच्या कणाकणाला, थेंबाथेंबाला व्यापून शरीरात शुद्ध, सौष्ठवपूर्ण स्वच्छ, सुडौल व सुकुर त्याचप्रमाणे मानवशरीराला तेजयुक्त व कांतियुक्त बनविते.

योगशास्त्रानुसार आपल्या मेरुदंडात (पाठीच्या कण्यात) इडा व पिंगळा या दोन ज्ञानतंतूचे प्रवाह असून, मेरुदंडातील मज्जेच्या मध्येतून जाणारा सुषुम्ना नावाचा एक पोकळ मार्ग आहे, या पोकळ मार्गाच्या टोकाशी

ज्याला योगी कुंडलिनीचे कमळ म्हणतात, ते कुंडलिनीचे निवासस्थान आहे. हे स्थान त्रिकोणाकृती असून त्या ठिकाणी कुंडलिनीशक्ती वेटोळे घालून बसलेली आहे. सदगुरुंच्या कृपेने जेव्हा कुंडलिनीशक्ती जागृत होते, तेव्हा ती या पोकळ मार्गाने म्हणजेच सुषुम्नामार्गे वर चढण्याचा प्रयत्न करते. या प्रयत्नात कुंडलिनी जसजशी पायरी-पायरीने वर चढत जाते, तस-तसे योग्याला अलौकिक दर्शन होऊ लागतात व अद्‌भूत शक्ती प्राप्त होते. ही कुंडलिनी जेव्हा मेंदूत जाऊन पोहचते, तेव्हा योगी शरीर व मनाने संपूर्ण अलिप्त होतो व त्याला स्वतःच्या मुक्त आत्मस्वरुपाचा साक्षात्कार होऊ लागतो.

मेरुरज्जेची (SPINAL CORD) घडण इंग्रजीमधील ८ आकड्याच्या आडव्या (¥)स्वरुपाची असून ती ऐकमेकांशी जोडलेली आहे. ह्या मेरुरज्जूच्या डाव्या भागात 'इडा' असते व उजव्या भागात 'पिंगळा' असते आणि मधोमध असलेला मार्ग म्हणजे 'सुषुम्ना' होय. कमरेच्या भागातील मणक्यात जिथे मेरुमज्जा संपते, तिथून अगदी बारीक सुतासारखा पदार्थ थेट खालपर्यंत जाऊन पोहचतो. सुषुम्नाचा पोकळभागही ह्या बारीक दोऱ्यामधूनही जातो. या मार्गाचे खालचे तोंड बंद असते. हे खालचे तोंड कमरेतील एका ज्ञानतंतूच्या जाळ्यापाशी (SCACRAL PLEXUS) असते. आधुनिक शरीरशास्त्राच्या मते ते त्रिकोणी असते. ज्ञानतंतूच्या ह्या विभिन्न जाळ्यांची केंद्र मेरूमज्जेत अवस्थित असून त्यालाच आपण योगशास्त्रातील निरनिराळी 'कमळं' म्हणतो.

योगी म्हणतात की, सर्वात खालच्या मूलाधार कमळापासून ते मेंदूतील सहस्त्रदलांच्या शेवटच्या कमळापर्यंत आणखी कित्येक केंद्र आहेत. म्हणून व उल्लेखलेली ज्ञानतंतूची भिन्नभिन्न जाळी (PLEXUS) म्हणजे योगशास्त्रातील निरनिराळी 'कमळं' होय. यावरुन योगी जनांची विद्या आपण आधुनिक शरीरशास्त्राच्या अनुषंगाने अगदी सहज समजू शकू.

योगी म्हणतात की, साधारण जीवात वा माणसांत ही सुषुम्ना बंद असते. तिचे कसल्याही प्रकारचे कार्य प्रत्ययास येत नाही. परंतु इडा आणि पिंगळा या दोन नाड्यांचे शरीराच्या निरनिराळ्या भागात शक्ती घेऊन जाण्याचे कार्य मात्र सर्वच प्राण्यात चाललेले दिसून येते. केवळ योगी पुरुषांची ही सुषुम्ना मात्र मोकळी असते. शक्तिपाताद्वारे कुंडलिनी शक्ती ची जागृती होऊन या सुषुम्नाचे दार उघडे होऊन जावेळी तिच्यातून ज्ञानतंतुगत शक्ती प्रवाह वर चढू लागतो, त्यावेळी आपले चित्तही अधिकाधिक उच्चपदावर आरूढ होऊ लागते. त्या वेळी बुद्धीच्या पलीकडंल्या अशा प्रदेशात आपण निघून जातो की जिथे तर्क पोहचू शकत नाही. हा सुषुम्ना मार्ग मोकळा करणे हे योग्याचे कार्य असते. आलंकारिक भाषेत उल्लेखलेली ही कमळ म्हणजेच या सुषुम्नामार्गावरच्या एकानंतर एक अवस्था होय, असे योगी म्हणतात. या कमळांतील सर्वांत खालचे कमळ या सुषुम्नाच्या खालच्या टोकाशी असून तिला 'मुलाधार चक्र' म्हणतात. त्याच्या वरच्या कमळाला "स्वाधिष्ठान चक्र' म्हणतात. त्यावरच्या तिसऱ्या कमळाला 'मणिपूर चक्र' चवथ्याला 'अनाहत चक्र" व मेंदूत असलेल्या शेवटच्या म्हणजेच सातव्या हजार पाकळ्यांच्या कमळाला म्हणतात 'सहस्त्र चक्र'. समस्तशक्ती सर्वांत खालच्या चक्रात म्हणजे मूलाधारात वसत असून तिला तेथून मेंदूतील सर्वांत वरच्या म्हणजे 'सहस्त्र चक्रात न्यायचे आहे. शक्तिपाताद्वारे नेमके हेच साध्य होते. ज्यांची कुंडीलिनी शक्ती जागृत होईल त्यांना समस्तप्रकृती एका नविन रुपात दिसू लागेल. ज्ञानाचे द्वार त्यांना मोकळे होईल. मग त्यावेळी ज्ञानासाठी पुस्तकांकडे धाव घ्यावी लागणार नाही. तुमचे मनच मग तुमच्यापाशी अनंतज्ञानाने भरलेले पुस्तक होऊन बसेल, असे स्वामी विवेकानंद म्हणतात.

मूलाधार केंद्रात वेटोळे घालून बसलेल्या ह्या कुंडलिनी शक्ती ला सुप्त अवस्थेतून जागृत व क्रियाशील करणे शक्तिपातयोगाद्वारे शक्य असून ती कुंडलिनी शक्ती जेव्हा जागी होऊन सुषुम्नामार्गे वर चढून मार्गातील केंद्रावर आघात करु लागते, त्यावेळी ज्या प्रतिक्रिया निर्माण होतात त्या फारच विलक्षण असतात. ह्याची आपणांस जाणीव होईल. ह्या प्रतिक्रिया जागृतकालीन विषयज्ञानाच्या प्रतिक्रियांहूनही अनंतपटीने प्रबळ व तीव्र असतात. ती अनूभूती आंर्तद्रीय अनूभूती असते. त्यावेळी समग्र मेंदूत त्याच्या संवेदनाशील प्रत्येक परमाणूत प्रतिक्रिया निर्माण होतात व असल्या प्रतिक्रियांचे फळ म्हणजेच - ज्ञानदीप्तीचा संपूर्ण प्रकाश अथवा आत्मानुभूती!

म्हणूनच अध्यात्म हे अंधश्रद्धा किंवा नुसताच श्रद्धेचा विषय नसून ही ईश्वरावरील शाश्वत श्रद्धा आहे. ती शक्तिपातयोगाद्वारेच अनुभवास येणे सांप्रत काळात शक्य आहे.

कुंडलिनी जागृत करणे हाच दिव्य बोध, ज्ञानातीत अनूभूती व आत्मसाक्षात्कार करुन घेण्याचा एकमेव मार्ग आहे व खरी भागवद् भक्ती प्राप्त होण्यासाठी शक्तिवानाची नितांत आवश्यकता आहे. हा शक्तिपात महापुरुषांकडून म्हणजेच सद्‌गुरुकडून होत असतो.

आपणा सर्वांना परम पूज्य श्री सद्‌गुरुसिद्धयोगेश्वर महाराजांच्या अस्सीम कृपेमुळे शक्तिपाताची दिक्षा मिळाली, याचा पुरेपूर फायदा घेऊन आपण आधिकाधिक साधना करुन परमात्म्याशी एकरुप होण्याचा मनाशी संकल्प करुन, आपल्याला मिळालेले हे परम सुख आपल्या इतर बांधवांनासुद्धा मिळावे असा सद् प्रयत्न करु या.

आपण कोण आहोत, आपल्यातच परमेश्वराचे वास्तव्य आहे, आपण त्याला जाणून घ्या आणि आपले जीवन सार्थकी लावा, असे सांगणाऱ्या; त्याचप्रमाणे आम्हां सर्वांना यथार्थ मार्गदर्शन करणाऱ्या आमच्या प. पू. श्री सिद्धयोगेश्वर महाराजांना त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आम्हां सर्व साधकांतर्फे हार्दिक शुभेच्छा आणि ते दीर्घायुषी होवो, ही ईश्वर चरणी प्रार्थना!

ghagmaharaj.guru

## नमामि सद्गुरु

सद्गुरु, कृपा करा झणी |
वसती संकल्प-विकल्प मनी || धृ. ||
आसे मिथ्या हा संसार |
मज वाटे तो साकार ||
आता सोडवा या मायेतूनी |
सदगुरू कृपा करा झणी.... || १ ||
विपूल देव, अनेक देवता |
भजावी कोण न गमे चित्ता ||
मुक्त करा या संभ्रमातूनी |
सदगुरू कृपा करा झणी.... || २ ||
सोऽहम सोऽहम जप जपतां |
स्वानंद आनंद लाभे चित्ता ||
स्वस्वरुपी अखंडत्व देवूनी |
सदगुरू कृपा करा झणी.... || ३ ||
या भवभय अंधकारातूनी |
मार्ग दावा मज लागूनी ||
हेचि करीतसे विनवणी |
सदगुरू कृपा करा झणी.... || ७४ ||
दाखवावा प्रकाश अभंग |
ठेवावे स्वानंदात दंग ||
घालीतो लोटांगण चरणी |
सदगुरु कृपा करा झणी.... || ५ ||
आपण तर सिद्धयोगेश्वर |
मज लागी साक्षात ईश्वर ||
आपण राहिलात विश्व व्यापूनी |
सदगुरु कृपा करा झणी.... || ६ ||

भावपुष्पांजली - एन्. बी. वव्हाण

## अध्यात्म्याचा महामेरु | माझे सद्‌गुरु ||

- विद्याधर मयेकर

मानवाच्या कर्माला ज्यांनी धर्म मानला अश्या ऋषीमुनींनी मानवाला त्यांच्या जन्मापासूनच कल्याणाचा मार्ग दाखवून दिला, आणि तो सर्वांसाठी मोकळा केला. पण मानवजातीचे हे दुर्भाग्य आहे कि, ऋषींच्या सिद्धांतांना त्यांनी आपलेसे केले नाहो. आपल्या अंत:करणात बहुमुल्य खजिना लपलेला असताना, आपल्या शरीरात एक अद्‌भुत शक्ती असुन ती सुप्तावस्थेत आहे आणि ती जागृत करण्या ऐवजी तो क्षणिक सुखाच्या शोधात राहिला.

जीवन हे कितीही बाह्यात्कारी असो, नैतिकतेत कितीही फरक असो, परंतु सदाचरणी व्यक्तीच्या वाणीने त्यांनी दाखविलेल्या दिशेने वाटचाल केल्यास आयुष्यात निश्चितच समाधान मिळते, अशा महापुरुषांच्या संगतीत नेहमीच रहावे.

सद्विचारांबरोबर सदाचार सुद्धा आवश्यक आहे. येथे केवळ सत्संग मिळणार नाही तर सदाचारी व्यक्तीचे दर्शन, उपदेश आणि सहवास याचा प्रभाव प्रामुख्याने आपल्या जीवनावर पडला पाहिजे.

**"सत्पुरुषात ईश्वराचे दर्शन घडते'**

आम्हाला गर्व असावयास हवा की हिन्दुस्थान सारख्या पुण्यभूमीत आपला जन्म झाला. ऋषी महर्षिंचे ज्ञान मिळाले आणि सद्‌गुरुंचे सान्निध्य मिळाले. या ऋषीमुनींचे तत्त्व, सदगुरुंसारख्या महापुरुषांकडून ज्ञान संपादन करुन आपल्या जीवनाचे सार्थक करुन दुसऱ्यांचे जीवनसुद्धा सार्थकी लावू या.

केवळ सुंदर दिसणाऱ्यावर भाळता येत नाही. तर माणूस सद्वर्तनीही असावा लागतो. प्रत्येक गोष्ट एकांगी न असता बहुअंगी असावी लागते. फूलांचा रंग केवळ सुंदर अथवा आकर्षक असून चालत नाही, तर त्याचा सुगंध दरवळला पाहिजे.

केवळ दिसायला सारखे असले म्हणजे दोघांतील गुण सारखे असतील असे नाही. कावळा रंगाने काळा आहे. कोकिळासुद्धा रंगाने काळी आहे. दोन्हींचा आकारसुद्धा सारखा आहे. मग या दोघांमधला फरक कोणता? तो ओळखायचा कसा? हे जसे आपण जाणून घेतो. त्याचप्रमाणे वज्रपान, तंत्र, मंत्र, जादूटोणा, चमत्कार करणाऱ्या शक्तींमधील व्यक्तींना आणि शुद्ध आचरणावर भर देणारे, जाती, पंथ, धर्म यांचा कसलाच अडसर नसलेले, प्रत्येक जीवाला जीवनरुपी भवसागरातून सहिसलामत तारुन परमेश्वराचे दर्शन घडवून देणाऱ्या सिद्धपुरुषांमधला फरक आपण ओळखला पाहिजे. आणि मगच आपण त्यांचे शिष्यत्व पत्करले पाहिजे.

आज समाजाला आवश्यकता आहे ती अश्या सिद्धपुरुषांची, सिद्धयोगेधर सद्‌गुरुंची कि; जे मुलांना, तरुणांना, संसारी व्यक्तींना मार्गदर्शन करुन त्यांच्या सुषुप्त शक्तिला आपल्या शक्तिपात-वर्षावाद्वारे जागृत करु शकतील.

*गुरुकृपेविण नाही आत्मज्ञात | वाउगा तो शीण साधनांचा ||*

*'सहज-साधन गुरु कृपा जाण | जीवाचे कल्याण तेणे होय ||*

लहानपणी जे संस्कार मनावर घडतात त्याचे प्रतिबिंब पुढे जीवनात पहायला मिळते. त्यासाठी घरातील धार्मिक, सांस्कृतिक तसेच अध्यात्मिक पार्श्वभूमी ही उत्तम आणि आदर्श असावी लागते. अश्याप्रकारचा आदर्श मानवजातीला त्याच्या जीवनात तीन गुरुजनांकडून मिळत असतो, ते म्हणजे आई-वडील, शिक्षक व अध्यात्मिक गुरू.

संस्काराचे धडे देणाऱ्या ह्या तिन्ही व्यवती म्हणजे संस्काराचे त्रिदेव. मातेच्या उदरात व उदरातून जन्म घेतल्यानंतर माता-पित्याकडून संस्काराचे प्रथम धडे मिळतात.

त्यानंतर शिक्षक म्हणजेच आचार्य. गुरुकूलात जाऊन ज्ञानसाधने मार्फत त्यांना प्रसन्न करुन विद्या संपादन करणारी हि दुसरी संस्कृती (संस्कार) संसाररुपी भवसागरातून आपली नाव सुखरुप शाश्वतरुपी

किनाऱ्याला लावून परमेश्वराचे दर्शन घडवून आणण्याचे संस्कार पार पाडणारे आपले तिसरे दैवत म्हणजे अर्थात आपले आध्यात्मिक प. पू. सद्‌गुरु की ज्यांच्या संस्कारामुळे आपले संपूर्ण जीवन कृतार्थ होऊन जाते, आणि म्हणूनच म्हटले जाते, 'गुरुविना मोक्ष नाही". जन्म-मृत्यु यामधील मानवी जीवन म्हणजे आयुष्य. मिळालेले दुर्लभ आयुष्य अध्यात्मिक संस्काराने, निती धर्माने आदर्शपूर्ण वागून आनंदमय करता येते.

आमच्या प. पू. सिद्धयोगेश्वर महाराजांनी म्हणजे आमच्या बाबांनी आजमिती पर्यंत ज्या-ज्या साधकांना दिक्षा देवून गुरुमंत्र दिला आहे. पण तो मंत्र वरचे वर पुटपुटल्याने सारे सुख आरोग्य आणि ज्या परमेश्वराच्या प्राप्तीसाठी जे करीत आहोत ते कदापी सहजासहजी प्राप्त होणे शक्य नाही. त्यासाठी एकाग्र चित्ताची, कठोर साधनेची आवश्यकता असते. आपल्याला जर भूक लागली असेल तर भाकरीचा तुकडा फक्त ओठावर ठेऊन त्याचा काय फायदा? त्याचे चर्वण करुन तो पोटातच गेला पाहिजे, तरच भुख शमू शकते. त्याचप्रमाणे, परमेश्वरूपी भुख भागविण्यासाठी मनाच्या एकाग्रतेची व परमोचांतिक साधनेची आवश्यकता असते. त्यामुळे साधकाला परमेश्वराची प्रज्ञा शक्ती, दिव्य प्राप्ती करता येते.

माणासाला जीवनात खरं सुख शोधायचे असेल तर भोगापेक्षा त्याग त्याला अधिक श्रेष्ठ ठरवून खऱ्या सुखाचा मार्ग शोधून देऊ शकतो. जगात आजवर निर्माण झालेले थोर राष्ट्रपुरुष, संत अश्याच कृतीतून महान झाले आहेत. आणि त्यांना त्यागातून खरे सुख प्राप्त झाले आहे. संपत्तीपेक्षा विपत्तीनेच त्यांना महान केले आहे. अश्याच पैकी आमचे प. पू. सदगुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज ज्यांनी प्राप्त असलेल्या भोगांना त्याज्य मानून साधकांच्या त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक घटक सदस्यांच्या कल्याणासाठी प्रपंचात राहूनसुद्धा जी खडतर योग साधना करुन परमेश्वराशी लीन होऊन सिद्धपौरुषत्व प्राप्त केले त्यांची महानता कोणत्या म्हणून शब्दात वर्णावी!

*मुमूक्ष म्हणे कृतार्थ जीवन |*

*प्रभु सदगुरु चरणी लीन होता ||*

भक्ती, ज्ञान, कर्म, उपासना आणि त्याग त्यांचा अगदी उत्तमरितीने समन्वय साधून प. पू. सिद्धयोगेश्वरांनी सारे अध्यात्मिक विश्व सामर्थ संपन्न केले आहे. अश्या परमसिद्ध, अधिकार संपन्न सद्‌गुरुंचा अनुग्रह आजमिती पर्यंत हजारों लोकांना स्पर्श आणि संकल्प-दिक्षेद्वारा सुद्धा झाला आहे.

*गुरु तो चि देवा ऐसा ठेवी भाव |*

*सद्‌गुरु-गौरव काय वानूं ||*

*तो चि ज्ञान-मूर्ति ब्रह्मानंद-स्थिती |*

*देई परा शांति साधकांते ||*

जीवन एक डाव आहे, तो उत्कृष्टपणे खेळला पाहिजे. जीवन एक कार्य आहे, ते करीत राहिले पाहिजे. जीवन एक परिक्षा आहे, ती उत्तीर्ण व्हायलाच पाहिजे. जीवन एक ज्योत आहे, ती तेवत ठेवलिच पाहिजे. जीवन एक बाग आहे, ती फुलवीत रहायलाच हवी. जीवन एक गाथा आहे. तीचे मनन करावयास हवे. जीवनाकडे पाहण्याचा आपल्या सर्वांचा दृष्टीकोन असाच हवा. त्यामुळे मानवी जीवनात मिळालेल्या सर्वांना गुरुकृपेच्या प्रत्येक संधीचा योग्य उपयोग करुन प्रगती साधता येते.

उसात रस असतो हे खरे, पण तो चरकात घातला तरच बाहेर पडतो. तसेच माणसाचे आहे. प्रत्येक माणसाच्या शरीरात देव, परमेश्वर वसलेला आहे. अश्या ह्या मानवी देहातील देव व तो परमेश्वर यांचे मिलन घडवून आणावयाचे असेल तर माणसाला पुष्कळश्या कसोटीस लागल्याशिवाय हे प्राप्त होऊ शकत नाही तर त्याला सदगुरुंच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते आणि म्हणून प्रथम सदगुरु प्राप्ती करुन 'त्या' परमेश्वराच्या

प्राप्तीचा ध्यास घेतला पाहिजे. कारण ईश्वर प्राप्तीच्या ध्येयाचा ध्यास लागला म्हणजे, तो गुरुप्रसादे साध्य होणारच. परम पूज्य सद्‌गुरुंच्या म्हणण्याप्रमाणे परमेश्वराच्या भक्तीची प्रत्येक साधकांमध्ये वृत्ती निर्माण झालेली असली पाहिजे.

ज्यांच्या अंत:करणात संतोष आहे, त्यांच्या धनसंपत्तीत केव्हाच तुटवडा पडत नाही. त्यांचे अक्षय भांडार सर्वत्र भरलेले असते. त्याप्रमाणे आपल्या सदगुरुंर आपली अढळ निष्ठा ठेवली, तर सद्‌गुरुंच्या अशिषभांडारातून मिळणाऱ्या कृपावर्षावांनी तुम्ही कितीही संकटात असलात तरी तरुन जाल. गुरुंना त्यांच्या मुलांची काळजी असतेच. ज्याप्रमाणे घार आकाशी जरी हिंडत असली तरी तीची नजर आपल्या पिलांवर सदैव असते. त्याप्रमाणे सदगुरुंची कृपा छाया, कृपा सावली आपल्या भक्तांवर असते. त्यांची आपणांस आत्मिक सहानुभूती दिसत असतेच पण त्याचबरोबर आध्यात्मिक कृपाछत्राचे वज्रकवच सुद्धा निर्माण करीत असते.

गुरुंच्या ठायी वास करणाऱ्या उत्कट कृपाशक्ती ला प्रतिसाद देणारा शरणांगतीचा तितकाच उत्कृट भाव शिष्याच्या ठायी जागृत झालेला असल्याशिवाय गुरूचे ज्ञान शिष्याकडे प्रवाहित होत नसते. सद्‌गुरुंच्या पहिल्या दृष्टिक्षेपाचा शिष्यावर काही संस्कार होतच नाही, असे मात्र नाही. संस्कार होतोच. बहुतेक सत्पुरुषांच्या कमी-अधिक सहवासानंतर आपल्या गुरुंच्या गुरुत्वाचा शोध लागल्याचे दिसते. आणि त्यानंतर त्यांच्याकडून होणाऱ्या संस्कारमुळे शिष्याला काही अनुभव येऊ लागता. पण त्या अनुभवांचा हेतु श्री सदगुरुचरणी लीन होऊन शिष्याला परमेश्वर प्राप्तीसाठी आवश्यक ती त्याची तयारी करुन घेतात. आणि याचाच अर्थ असा होतो की, सद्‌गुरुच्या अंत:करणात शिष्याच्या कल्याणाविषयी इच्छा उत्पन्न होणे, हाच तर खरा अनुग्रह, ' शिष्याचे भले व्हावे' असा संकल्प सद्‌गुरुंच्या चित्तात उदित होणे, हीच खरी दीक्षा.

आपल्या चरणी आलेल्या एका जीवाच्या उद्धारासाठी कृपामय सद्‌गुरु केव्हढा खाटाटोप करीत असतात, हे आपण जाणून घेतले पाहिजे. पण त्यांना यात कोणतेही कष्ट वाटत नाही. त्यात त्यांना आनंदच वाटत असतो. मूलत: प्रत्येक शिष्याचा जीवन मार्ग प्रशस्त व सुखमय व्हावा म्हणून गुरुमहाराजांनी ज्यांना ज्यांना दीक्षा देऊन कृपांकित केलेले आहे त्या प्रत्येकाच्या बाबतीत व्यक्तिश: ही अशी खाटाटोपाची प्रक्रिया चालू असलेली आढळते; आणि त्यामुळेच आज अशी कुटुंबच्या कुटुंबं सद्‌गुरुंचा आश्रय घेऊन त्यांच्या सेवेत रंगून गेलेली आढळतात.

मनुष्य जन्म मिळालेल्या आमच्या सारख्या पामरांचा हा जन्म सार्थकी लागावा म्हणून ज्या आमच्या प. पू. श्री सिद्धयोगेश्वरांनी भक्ती, ज्ञान, कर्म, उपासना आणि त्याग यांचा उत्तमरितीने समन्वय साधून साऱ्या अध्यात्मिक विश्वाचे भांडार आमच्यासाठी उघडून दिले अश्या अध्यात्म मेरू, परमसिद्ध आणि अधिकार संपन्न 'बाबांना' त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आमचे कोटी कोटी प्रणाम! आणि आई जगदंबा त्यांना दिर्घायुष्य देवो ही तिच्या चरणी प्रार्थना!!

ghag

# सगुण आणि निर्गुणातील फरक दाखवून देणारे प. पू. श्री सिद्धयोगेश्वर महाराज

- रमेश धोंडिबा जाधव

सातारा

चरम पूजनीय सद्‌गुरु सिद्धयोगेश्वर महाराजांकडून अत्यंत सामर्थ्यशील अशी शक्तिसंचार दिक्षा प्राप्त होईपर्यंतची एका अज्ञानी जीवाची भ्रमंती याचे थोडक्यात वर्णन खाली देत आहे.

सुखाच्या प्राप्तीसाठी प्रत्येकाची धडपड जीवनभर सुरु असते. परंतु सुखाच्या चुकीच्या कल्पनेप्रमाणेच त्याच्या प्राप्तीसाठी केलेले प्रयन्तही काळाच्या ओघात नामशेष होऊन जातात व सत्य, शाश्वत असे सुख मिळू शकत नाही. खरे सुख प्राप्त करावयाचे असेल तर संत-सदगुरुंकडेच जायला हवे, की जे आपणांस अप्रतिम सुखाचा मार्ग दाखवितात.

“श्री गोंदवलेकर महाराजांची प्रवचने' हे पुस्तक वाचनात आले. नाम घेणे सुरु झाले पण कोणते नाम घ्यावे याचा निर्णय होईना. एके दिवशी ऑफिसात दोन संन्याशी आले. त्यांच्याशी थोडी चर्चा झाली. त्यांनी मला एक रुद्राक्षाची माळ व तीन रुद्राक्ष एकत्र असलेला एक रुद्राक्ष दिला. रोज १-२ तास जप व जमेल तेवढे नाम सुरु केले.

त्यावेळी आपणांस पाठीराखा सद्‌गुरु असावा असे वाटू लागले. आपल्याला गुरु नाही याची खंत वाटू लागली. गावातील एकजण मुंबईला नाथसंप्रदायात असतो, त्याच्याशी चर्चा केली. त्याचे गुरु मला दिक्षा देतील कां, हेही विचारले. पण त्याने सांगितले की मुंबईला बदली करुन घ्यावी लागेल. मग प्रयत्न करुन बघू. मग जो भेटेल त्याच्याकडे चौकशी करणे सुरुवात झाले. त्याच दरम्यान 'श्रीगुरुचरित्र' वाचण्यास व पारायण करण्यास सुरुवात केली. अपेक्षा अशी होती को, आपले गुरु हे उच्चकोटीतीलच असावेत. चर्चा करतांना एकाने सांगितले की मला श्री गुरुप्राप्ती व्हायला अजून पाच वर्षे अवकाश आहे. अशा प्रकारे शोध घेत असता मी एका प्रसिद्ध व महान योगी महाराजांना भेटायला गेलो नमस्कार केला व म्हणालो, '“मला सायुज्य मुक्ती मिळण्यासाठी दिक्षा हवी आहे. तरी कृपया आपण ती देऊन मला शिष्य करुन घ्यावे.'

क्षणभर विचार करुन ते म्हणाले, '“कोणत्याही डोंगरात जाउन बारा वर्षे ॐ चा जप करा. मग मी दिक्षा देतो.”

त्यांचे उत्तर ऐकून मी हादरलोच. पण विचार केला की ही सुद्धा आपली परिक्षा असावी. म्हणून स्वतःला सावरुन मी म्हणालो, “ठीक आहे. पण माझ्या नोकरीचे व बायकामुलांचे काय?''

यावर काही भाष्य न करता त्यांनी मला दीक्षा देणे नाकारले व म्हणाले, “ जा! हरी; हरी करीत पंढरपूरला जा.'' तरीही मी जागा सोडली नाही. एवढ्यात कोणी मुंबईचे बडे लोक तिथे आले. महाराज त्यांचेशी बोलू लागले. तरी ही मी थांबलेला पाहून म्हणाले, '“इथे तुला ऐकण्यासारखे काही नाही. तू जा.''

त्यानंतर श्री गुजरबुवा यांचेशी थोडी चर्चा झाली त्यांनी काही मार्गदर्शन केले व दिक्षा मिळण्यास अजून दोन वर्षे अवकाश आहे असे सुचविले.

पुन्हा एखादा सहकुटुंब पुसेगांव - शिंगणापूर - गोंदवले – पंढरपूर - तुळजापूर - अक्कलकोट - गाणगापूर - रेवणनाथ असा दर्शनाचा योग आला. पंढरपूरला मी कधीही गेलो नव्हतो व जाण्याची इच्छाही नव्हती व गेलोच तर आषाढी, कार्तिकी व इतर एकादशी सोडून एरव्ही जाईन असे विचार मनात होते.

सर्व दर्शनं झाली पण मन रमेना. एका मित्राच्या नातेवाईकांकडे वेण्णानगर येथे मुक्काम केला. तेथे श्री. पंडीत यांच्याशी परिचय झाला. गावांमध्ये प्रवचनांचे आयोजन केले गेले होते. थोडे मन रमावे आणि ह्यातून थोडे फार ज्ञान ग्रहण करावे म्हणून त्यांच्या बरोबरीने प्रवचनं ऐकली. तिसऱ्या दिवशी श्री. पंडीत गैरहजर राहिल्यामुळे ते कां आले नाहीत ह्याची त्यांना प्रत्यक्ष भेटून विचारपूस केली व कालचे प्रवचन फार चांगले झाले असे सांगितले. त्यावर कोणते प्रवचन झाले अशी विचारणा त्यांच्याकडून केली गेली असता श्री ज्ञानदेवांच्या हरीपाठातील पहिलीच ओवी “देवाचिये द्वारी, उभा क्षणभरी | तेणे मुक्ती चारी, साधियेल्या||“ ह्यावर फार छान प्रवचन झाले असे मी म्हणालो. त्यावर श्री. पंडितांनी ह्यावर इतके चांगले विवेचन केले की, ते ऐकून मी प्रभावीत झालो आणि त्यांची अध्यात्मिक पातळी उच्च कोटीची आहे ह्याची मला जाणीव झाली. म्हणून कुतुहलाने त्यांच्या सदगुरुंविषयी

विचारणा केली. तेव्हा त्यांनी माहिती दिल्यावर मी त्यांना विचारले तुमचे सदगुरु मला दिक्षा देतील कां? त्यावर त्यांनी होकारात्मक तसेच अश्वासक उत्तर दिले.

एके दिवशी संध्याकाळी श्री. पंडीत माझ्याकडे आले व म्हणाले, “बाबा सातार्‍याला आलेले आहेत. मी त्यांना तुमच्याबद्दल सांगितले आहे, व त्यांनी तुम्हाला उद्या संध्याकाळी भेटावयास बोलावले आहे.''

माझा आनंद गगनात मावेनासा झाला. दुसरे दिवशी मी श्री. पंडीत यांचे बरोबर सातार्‍याला गेलो. बाबांचे दर्शन घेतले व त्यांच्या समोर बसलो. श्री. पंडित यांनी माझी ओळख करुन दिली व चर्चेला सुरुवात झाली.

बाबांनी मला विचारले, '“तुम्ही काय काय करता?'' तेव्हा म्हणालो की, मी गायत्रीमंत्र, दत्तमंत्र, लक्ष्मीमंत्र, देवीकवच वगैरे करतो. तसेच अनुभवलेले सर्व प्रसंगही त्यांना सांगितले. त्यावर बाबांनी विचारले, “तुम्ही गाणगापुरला काय काय पाहिले?” मी उत्तर दिले - संगम, दत्तमंदीर, नदीतील तिर्थे तसेच निर्गुण पादुका पाहिल्या. त्यावर बाबांनी दुसरा प्रश्न केला, ''तुम्हाला निर्गुणातले दिसतेकां?'' मी नाही म्हटल्यावर ते म्हणाले, “मग त्या पादुका निर्गुण कश्या?”' तुम्ही पादुकांना हात लावून दर्शन घेतले कां?'' मी म्हणालो, ''नाही. कारण तिथे झरोक्यातूनच दर्शन घ्यावे लागते कारण तिथे सोवळे पाळले जाते.''

मग बाबा म्हणाले, ''जो देव आपल्याला शिवून घेत नाही तो आपले काय कल्याण करणार? देव कसा असावा, तर आपण जर नरकात असलो तर आपल्याला नरकातून वर काढण्यासाठी देवाने नरकात सुद्धा हात घातला पाहिजे.!'

झाले! माझ्या शंकाच संपल्या आणि खात्री झाली की इथेच आपले काम होणार आहे. मग मी इतर चर्चा न करता सरळ बाबांना विनंती केली की, कृपा करुन आपण मला दिक्षा देऊन उपकृत करावे.

तेव्हा बाबा म्हणाले, '“तुम्हाला कसली दिक्षा हवी आहे, सोवळे पाळणारी की न पाळणारी?''

मग मी शांतपणे उत्तर दिले, '“सोवळे नको, काही नको, मला पदरात घ्या.'' माझी विनंती श्री गुरुंनी तात्काळ मान्य केली. श्री. पंडीत यांच्याकडून त्यांचा पत्ता घेऊन पत्र पाठवायला सांगितले.

अशाप्रकारे महान विभूती व असामान्य योगीराज प. पू. सिद्धयोगेश्वर महाराज यांचे आदेशानुसार दिक्षा मागणीचे याचना पत्र पाठविले. प. पू. सदगुरुंनी कृपावंत होऊन दिक्षा देण्याचे पत्राने कळविले व अन्य सूचनाही दिल्या. त्यानुसार ज्याच्या प्राप्तीसाठी युगे-युगे वाट पहावी अशी ती अतुलनीय संकल्प दिक्षा मला मिळाली व पुढील मार्ग माझ्यासारख्या अतिसामान्य व्यक्तीकडून आक्रमवून घेणे सुरु झाले.

सध्या मी अतिशय सुखात आहे. हे कोणते सुख आहे तेही मला यशावकाश समजेल. पण आज मात्र मी तो असीम, अतुल्य असा आनंद उपभोगित आहे, ते फक्त माझ्या सदगुरुंमुळेच.

प. पू. सद्‌गुरु श्री सिद्धयोगेश्वरांच्या अमृत महोत्सवानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा! आणि गुरुप्राप्तीच्या शोधात भटकणार्‍या माझ्या सारख्या असंख्य याचकांना त्यांच्या कडून गुरुप्रद प्राप्त होवो यासाठी महाराजांना उदंड आयुष्य लाभो हि ईश्वर चरणी प्रार्थना!

## साधकांसाठी.....

- प. पू. सदगुरू श्री सिद्धयोगेश्वर महाराज

मायारूपी जलाने तुडुंब भरलेला हा संसार सागर जीवाला तरुन जाण्यासाठी अत्यंत कठीण झालेला आहे. या समुद्राचे पाणी निव्वळ खारट आहे. या पाण्यात प्रचंड जलचरे अनिवार झालेली आहेत, आणि ती जलचरे इतकी मगरमस्त झालेली आहेत की, त्या पाण्यातील एका एका जलचरांनी आपल्या सामर्थ्याने सर्व चराचर गिळून टाकले आहे. या संसारसागरात मोहाच्या एका पाठोपाठ एक अशा अति दुर्धर लाटा उसळत आहेत. त्या उसळलेल्या लाटा ऐहिक तीराच्या तटावर आदळतात आणि त्यामुळे जीवाचे असलेले ध्यैर्य कोलमडुन पडते.जीवामध्ये अहंकार रुप झंझावत असतो. तो अहंकार रुपी झंझावात रो रो असा आवाज करीत सर्व समुद्र नुसता खवळून टाकतो, आणि जीवात असणारा अहंकार मी आणि माझं असे म्हणून मोठमोठ्याने गर्जना करत असतो. त्याचप्रमाणे या संसार सागरात नाना प्रकारच्या वासनांचे भोवरे गरगर फिरत असतात. त्यामुळे या संसार सागरातून पलीकडे जाण्याचे धैर्य जीवाला सहसा होत नाही. या संसार सागराला मिळणाऱ्या द्वेषरुपी खाड्या आहेत. त्यांना क्रोधाची भरती येते आणि असूया, असूया तर तिरस्कारांची तोंडं आवासून बसलेली असते.

या भवसागरात कामरूपी पर्वतांची असंख्य, उंच उंच अशी शिखरे आहेत. त्या शिखरांवर जीवाच्या इच्छेची मोठं मोठी झाडे आहेत. आणि हि झाडे विषयाकुंराने फोफावली आहेत. या समुद्रात संकल्प आणि विकल्परूपी मासे आहेत. निंदारूपी सुसरी आहेत. द्वेषरूपाने माजलेले नक्र सुध्दा या समुद्रात तडफडत आहेत. हा प्रचंड संसार सागर तरुन कसा जावा हे जीवांना कळेनासे झाले आहे. जीवांचे जीवन हे त्रिविध तापांच्या समुहाने भरलेले आहे. या विश्वातील जीवाचे जीवन जन्म, बाल्य, तारुण्य, वृध्दत्व आणि मृत्यू या येणाऱ्या प्रत्येक अवस्थेत त्याला भोगाव्या लागणाऱ्या त्रिविध तापांनी. त्रिविध ताप म्हणजे आदिदैविक, आदि भौतिक आणि अध्यात्मिक. या त्रिविध तापांनी याचे जीवन भरलेले आहे.

**त्रिविध ताप म्हणजे काय?**

आता ताप कशाला म्हणतात ते पाहू. पिंड आणि परिस्थिती यांच्यात जी खेचाखेच होते, त्यावेळी पिंडावर जे प्रतिकूल आघात होतात त्याना संतसत्पुरुष ताप असे म्हणतात. तर या जगात जीवाने केलेल्या कर्माचा जाब त्या जीवाला द्यावाच लागतो. जीवाने केलेल्या चांगल्या अगर वाईट कर्माप्रमाणे याच देही किंवा हा देह सोडल्यानंतर म्हणजे मृत्युनंतर त्याला यमयातना म्हणजे स्वर्ग किंवा नरक याचे भोग भोगावेच लागतात. हे मृत्यूनंतरचे जे भोग आहेत ते मनुष्यजन्मातील सामान्य जनांना समजणार नाही. कारण हा जो फळ भोग आहे तो अंतिद्रय आहे. पण लक्षात ठेवा की तो आपल्याला दिसत नाही म्हणून तो काल्पनिक आहे असे मात्र समजू नका. मृत्यूनंतरच्या अवस्थांची जी वर्णन केलेली आहेत, ती शास्त्रांनी केलेली आहेत. या मृत्यूच्या पलीकडे भगवंतानी काही व्यवस्था करुन ठेवलेली आहे. या जगात जीवाने केलेल्या कर्माचा जाब त्याला द्यावाच लागतो.

आपण पाहतो की समाजात अनेक स्वभावाच्या व्यक्ति असतात. कांहींना त्यांच्या पूर्व पुण्याईमुळे त्यांना एक किंवा अनेक शक्ती प्राप्त झालेल्या असतात. पण त्या शक्तींचा उपयोग ते लोक फक्त आपलाच स्वार्थ साधण्याकरीता करीत असतात. म्हणून ही अनिती आहे, अन्याय आहे. अशा तह्रेने कर्म करणाऱ्या माणसांना या जगातील अनेक सुखसोयी जरी मिळत असतील आणि हे आपण पहात जरी असलो तरी मृत्युनंतर त्यांना त्यांनी केलेल्या कर्माची फळे भोगावीच लागतात हे आपण विसरता कामा नये. मृत्यु नंतरच्या यातना या भयंकर आहेत. अक्राळविक्राळ आहेत. मृत्युनंतर भोगाव्या लागणाऱ्या यमयातनांना आदिदैविक ताप असे म्हटले जाते.

आता आदिभौतिक ताप म्हणजे काय ते पाहू! आदिभौतिक ताप म्हणजे माणसाला माणसाकडून होणारे दु:ख. जीवाला बाह्य पदार्थाच्या संयोगाने निर्माण होणारे जे दु:ख असते, उदा. मन बेचैन हेणे, शरीर रोगट होणे, शरीराला अपघात होऊन दुखापत होणे, खडुयात पडणे वगैरे अनेक दुःखदायक गोष्टी ज्या घडत असतात; त्यांना आदिभौतिक ताप असे म्हटले जाते.

आता अध्यात्मिक ताप म्हणजे काय ते पाहू! अध्यात्मिक ताप म्हणजे अनेक काळजीने काळवंडणे, अनेक दु:खाने मानसिक यातना भोगणे, रोग नसताना सुध्दा जीवाची तगमग होणे, म्हातारपणाच्या यातना, सदान

कदा कांही रोग जडणे इत्यादी. तर अनेक रोग, अनेक भोग, अनेक दु:ख, अनेक जखमांमुळे माणसाला जे दु:ख होते त्याला अध्यात्मिक ताप असे म्हटले जाते.

तर माणसाचे जीवन आदिदैविक, आदिभौतिक आणि आध्यत्मिक या त्रिविध दु:खाच्या समूहांनी भरलेले आहे. या दु:ख समुहांना बाजुला करुन त्यातून सुटका होण्यासाठी प्रत्येक जीव अविरत प्रयत्न करत असतो. जीवाकडून होणारी सर्व कर्म सुध्दा सुख आणि शांती प्राप्त होण्यासाठीच केलेली असतात. पण जन्मापासून देहत्यागापर्यँत जीवाला कल्पनातीत हाल अपेष्ठा सोसून सुध्दा, रात्रंदिवस प्रयल करुन सुध्दा या भौतिक सुखाच्या प्राप्तीने शाश्वत सुख आणि चिरकाल शांती प्राप्त झाली आहे कां? तर त्याचे 'नाही' हेच उत्तर द्यावे लागेल. जीवाने सुखप्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नांना काही वेळा यश आल्यासारखे जरी दिसत असले तरी सुध्दा त्याने केलेले प्रयत्न शेवटी विफल होऊन मनुष्य ज्या गोष्टीपासून सुखाची अभिलाषा धरतो ते सुख नसतेच मुळी. तर तो केवळ सुखाचा आभास असतो. सुखाची अभिलाषा बाळालेली वस्तू जर त्याला प्राप्त झाली आणि जरी त्याला क्षणिक सुखाची प्राप्ती होत असली; तरी सुध्दा त्या प्राप्त झालेल्या सुखात आणखी दु:ख रुपी वृक्षांची बीजेच त्यात दडून बसलेली आहेत. हे त्याला कालांतराने दृष्टीस येते. कारण नाशवंत वस्तू आणि नाशवंत व्यक्ती त्याचप्रमाणे परिवर्तनशील परिस्थिती यामुळे शाश्वत सुखाची अनुभूती होणे असंभवनीय आहे. या जगातील सुखं नश्वर आणि अशाश्वत आहेत; म्हणून या अशा नश्वर अशाश्वत आणि अनित्य सुखाच्या प्राप्तीसाठी हा जो धडपडणारा जीव आहे, तो बंधनात पडून आपला अध:पात करुन घेतो. जीवाला निरनिराळ्या अवस्थातून जावे लागते. जीवाची बाल्यावस्था असते ती तर क्रीडा, कौतुकातच निघून जाते. नंतर तारुण्य स्त्री, पुत्र, धन, घर, जमीनजुमला यांच्या आसक्तीने मोहात फसते आणि असं मोहात फसलेलं तारुण्य नंतर जिर्ण होऊन जर्जर अवस्थेत प्राप्त होणारी दुःखचं दु:ख तो भोगत असतो. त्यामुळे जीवाला केव्हाही आणि कोठेही सुख आणि शांतीचा लवलेशही प्राप्त न होता आकस्मितपणे एक दिवस स्वत:चे कल्याण साध्य करुन न घेता तो जीव मृत्यूच्या कराल जबड्यात भक्ष्यस्थानी पडतो. सर्व जीवन अपार कष्ट आणि मृत्युसमयी वेळेच्या यमयातना; अशाप्रकारे त्याच्या जीवनाची समाप्ती होते.

सुख कसे प्राप्त होईल याचा सतत शोध घेत असलेल्या जीवाला सुख प्राप्ती न होता दु:खच प्राप्त होतं. याचा अर्थच असा आहे की, जीवाचे सुख प्राप्तीचे मार्ग तरी चुकत असले पाहिजे किंवा त्याच्या सुखाच्या कल्पनेत हिनत्व असले पाहिजे. आता सर्व सामान्य जीव ज्याला सुख समजतात ते सुख नसतेच मुळी; तर दु:खचं सुखाचा पोषाख घालून त्याला छळत असते. या भौतिक सुखाची तऱ्हाच अशी आहे. येथील सुर्यादिकांचा जन्मच मुळी अस्तासाठी झालेला असतो. गर्भ उदरात असतानाच मृत्यू त्याला शोधत असतो आणि सध्याच्या या वैज्ञानिक प्रगत युगातसुध्दा मानवाने सुखासाठी केलेले प्रयत्न शेवटी नाशालाच कारण होतील की काय अशी भीती निर्माण झाली आहे. म्हणून हे सर्व प्रयत्न अपूर्ण आहेत, हेच आपल्या अनुभवायला येतात. सर्व प्राणिमात्रांचे प्रयत्न चिरंतनानंद रूप सुखाची प्राप्ती होण्यासाठीच असतात. ते त्यांना मिळत नाही.

ज्ञानेश्वर माऊलीच्या शब्दात सांगायचे झाले तर ते म्हणतात की, या लोकांचे प्रयत्न म्हणजे पाण्यात पडलेल्या चंद्रबिंबला मासे पकडण्याच्या जाळ्यात पकडण्याप्रमाणे असतात. त्याचे प्रयत्न चुकीचे असतात. मग कोणत्या मार्गाने गेले असता निश्रेयस, निरतिशय, सच्चिदानंद प्राप्त होईल? याला उत्तर आहे की, जीवाला आत्मविस्मरणामुळे त्या भगवंताला विसरल्यामुळे या संसार चक्रात भटकत राहण्याची पाळी आलेली आहे. त्यामुळे त्याला अनंत दु:खं भोगावी लागत आहेत.

यातून सुटका होऊन आपल्या जीवाचे जर कल्याण व्हावे असे वाटत असेल तर, त्यासाठी आपल्याला परिपूर्णतेच्या शिखरावर असलेल्या जो सर्व फळाचा दाता, दयाळू, भक्तिचा भुकेला आहे आणि असंख्य दु:खाने भरलेल्या या संसारसागरातून आपल्या भक्ताला आपल्या लिलेने पार करणारा असा जो सर्वशक्तिमान परमानंद परमेश्वर आहे; त्याला प्राप्त करुन घेणे हे प्रत्येक माणसाचे पहिले कर्तव्य आहे. या संसारात प्राप्त होणारी जी दु:खं आहेत त्यांना नष्ट करणारी कोणती शक्ती असेल तर ती म्हणजे परमेश्वर! म्हणून प्रत्येक माणसाने परमेश्वर प्राप्तीसाठीच सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. परमात्मा साक्षात्कार हेच मानवी जीवांचे अंतिम ध्येय असले पाहिजे.

जीवाने परमेश्वर प्राप्ती करुन घेतली तर जीवाला कोणत्याही प्रकारची न्यूनता न राहता सर्व गोष्टींची अनुकूलता प्राप्त होते. आणि जगी प्रारब्ध कर्मानुसार त्यांच्यावर केव्हढेही दु:खद प्रसंग कोसळले तरी सुध्दा ते दु:खद प्रसंग त्याला विचलीत करु शकत नाहीत. अशा परमेश्वराला जर आपण विसरलो तर आपणच आपल्या अधःपतनाला कारणीभूत ठरणार आहोत. हे जर माणसाने जाणले आणि तो जर परमेश्वराच्या प्राप्तीसाठी वाटचाल

करु लागला तर त्या मार्गाने वाटचाल करणाऱ्या भक्ताला याच जन्मात किंवा सृष्टिनियमानुसार अनेक जन्मानंतर का होईना परमेश्वराच्या त्या दिव्य मंदिरात प्रवेश मिळून त्या सच्चिदानंद रुप परमेश्वराला प्राप्त करुन घेता येईल. एका परमेश्वराशिवाय या जगात आपल्याला कोणाचाच आधार नाही असे मानून मान, कीर्ती आणि प्रपंच यावरील आसक्ती यांचा त्याग करुन संसारातील अहंता ममतारहीत होऊन एक परमेश्वरच आपला सर्वेश्वर आहे, आपला आश्रय तोच आहे आणि तोच आपल्याला परमगती देण्यास समर्थ आहे; असे समजून परमेश्वराची भक्ती दृढ करण्यासाठी आपल्याला पौरुष प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे आत्मसाक्षात्कार होण्यासाठी श्रेष्ठ महात्म्यांचा सदाचार, श्रृती, स्मृती, रुप, शास्त्रे हे दोन डोळे उघडे ठेऊनच आपल्याला वाटचाल करावी लागेल. आपण हे लक्षात ठेवावे की, डोळे उघडे ठेऊन श्रेष्ठ महात्म्यांचा सदाचार पाहणे आणि डोळे आहेत म्हणून शास्त्रवाचन करणे म्हणजे डोळे उघडे ठेवणे नव्हे. तर श्रेष्ठांचे आचार व शास्त्र जे कांही सांगत आहे त्याचे आचरण आपण केले पाहिजे. ते आचरण दृढ करणासाठी आपल्याला वैयक्तिक प्रयत्नांची जोड द्यावीच लागेल तरच आपल्याला अंतिम ध्येय साध्य करता येईल. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, या वाटचालीत प्रचंड अडथळे निर्माण करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी मुख्य गोष्ट म्हणजे माणसाची मानसिक दुर्बलता. मानसिक दुर्बलतेला प्रयत्नपूर्वक झुगारुन दिले पाहिजे आणि दुसरी जी बुध्दिची मलिनता आहे तीला दूर करुन कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. अध्यात्मिक साधनेत स्थिरता प्राप्त होऊन अखंडानंद प्राप्त होण्यासाठी आपल्या मनात उदभवणाऱ्या विचित्र वासना आहेत त्याचा त्याग करण्याची क्षमता प्रत्येकाने साध्य केली पाहिजे. या विचित्र वासनांचा त्याग करण्यात जर आपण यशस्वी ठरलो तरच आपला ज्ञान प्राप्तीचा मार्ग सुखकर होऊन आपल्याला इच्छित स्थळी विनासायास लवकर पोहचता येईल.

प्रकृती ही त्रिगुणात्मक आहे. या तीन गुणांपासून या सृष्टीत उत्पन्न झालेल्या जीवांना अविद्येमुळे दुःखाचे भोग भोगावेच लागतात. तर हे दुःखाचे भोग कशामुळे घडत आहेत आणि आपल्याला क्षणभर वाटणारे हे भौतिक सुख कसे दुःखदायक आहे याचा जर आपण सतत विचार केला तरच आपल्याला त्या विषयभोगातील दुःखाचं ज्ञान होऊ लागेल आणि असं ज्ञान प्राप्त झाले तरच माणसाच्या मनांत विवेक व वैराग्य उत्पन्न होऊन त्याचे मन अक्षय सुखाच्या प्राप्तीसाठी मोक्षाच्या वाटेला लागेल. परंतु जन्माला आलेला जीव अविद्येमुळे, अज्ञानामुळे त्याला आत्मविस्मरण होऊन संसारचक्रातच घुटमळत रहातो. आपण प्रथम हे समजून घेवूया. अज्ञानी कोणाला म्हणतात हे सुद्धा समजून घेऊ या.

जे मूर्ख आहेत, रजोगुणी आहेत, पढतमुर्ख आहेत, करंटे, आळशी आणि आत्मविस्मरण होणाऱ्याला अज्ञानी समजले जाते. त्याचप्रमाणे जे लोक सत्वगुणी आहेत, ज्यांच्याजवळ सदविद्या आहे, जे निस्पृही आहेत, विरक्तही आहेत, भक्त ही आहेत आणि आत्मसन्मुख आहेत अश्यांना सुध्दा अज्ञानी समजले जाते. मग आपल्याला प्रश्न असा पडतो की, ज्ञानी कोणाला समजायचं? तसं पाहिलं तर या विश्वातील जीवांना प्रपंच चालवण्यासाठी व्यवहाराचे ज्ञान आहेच आणि त्या ज्ञानाला अनुसरुनच या विश्वातील व्यवहार चालत असतात. होय, हे जरी खरे असले तरी सुध्दा आपण सामान्य माणसं ज्याला ज्ञान समजतो ते ज्ञान आणि या संसारातील दुःखापासून सोडवून भगवंताचे दर्शन घडवून देणारे जे ज्ञान आहे या दोघात मोठा फरक आहे. तर ज्ञान म्हणजे आत्मज्ञान जोपर्यंत आपल्याला अंतर्यामी असलेले आत्मस्वरुप साक्षात्काराद्वारे प्रचितीस येत नाही आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत सारं अज्ञान आहे. तर इंद्रियजन्य विषयी सुख ही शेवटी दुःखदायक आहेत. परमशांतीचे मार्ग भिन्न असले पाहिजेत असे विचारचक्र जर माणसाच्या चित्तात सुरु झाले तरच त्याच्या सुखदुःखाच्या कल्पनेत बदल घडून शाश्वत अशा सततच्या प्रयत्नाने भौतिक सुखापेक्षा निरतिशय, नरालंब, अक्षय सुख ज्या मार्गाने गेले असता प्राप्त होईल अशा मोक्षाच्या वाटचालीला तो लागेल. या वाटचालीत त्याच्या चित्ताला जर श्रेष्ठ प्रतिची सुखं दिसू लागली तरच त्याचं मन विषय सुखापासून पराङःगमुख होईल. जीवाला श्रेष्ठ प्रतिचे सुख पाहिजे असेल तर जीवाच्या ठिकाणी विशिष्ट प्रकारची पात्रता असावी लागते. प्रपंचात काय किंवा परमार्थात काय कोणतेही कार्य सिध्दीस न्यायवयाचे असेल तर जीवाच्या ठिकाणी विशिष्ट प्रकारची पात्रता असावीच लागते.

आत्मज्ञान प्राप्त होण्यासाठी विवेक आणि वैराग्य या दोघांची नितांत आवश्यकता आहे. गाडीला चालण्यासाठी ज्याप्रमाणे दोन चाकांची आवश्यकता असते किंवा माणसाला चालण्यासाठी दोन पायांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे विवेक आणि वैराग्य हे दोन्ही साधकाच्या अंगी समतोलपणाने असले पाहिजे. एक विवेक नसेल तर नुसतं वैराग्य असून चालणार नाही. आणि नुसतं वैराग्य आहे पण विवेक नसेल तरीही चालणार नाही. तर एका वाचून एक वाया जातो. मग अशी परिस्थिती होते की, धड ना प्रपंच, ना परमार्थ. तर आपले ध्येय कोणते आहे? प्रपंचाचे स्वरुप काय आहे? आपण करीत असेलली साधना कोणती? जगाचा स्वभाव कसा व

स्वानुभूतिची लक्षणं कोणती? इत्यादी प्रश्नांची अगदी स्पष्ट अशी उत्तरे बुध्दीने आकलन करणे याला विवेक असे म्हटलेले आहे.

त्याचप्रमाणे वैराग्य निर्माण होणेही आवश्यक आहे. वैराग्य म्हणजे माणसावर कोणतीतरी भयानक आपत्ती कोसळते, त्यावेळी तो जीव त्या आपत्तीला घाबरुन आपले कर्तव्य सोडून पळून जातो, त्यालाच तो वैराग्य असे समजतो. नंतर तो साधू संन्यासी होण्याची गोष्ट करत असतो, त्याला वैराग्य म्हणता येणार नाही. प्रेत दहनासाठी स्मशानात गेलेल्या माणसाला स्मशानात असेपर्यंतच वैराग्य. पण बाहेर पडले कि वैराग्य संपले. तसेच प्रसुती काळात आलेले वैराग्य. याला वैराग्य म्हणता येणार नाही. तर सर्व बंधनातून मुक्त होण्यासाठी वैराग्य निर्माण होणं आवश्यक आहे. जे चंचल स्वरुपवत आहे; ते नाशिवंत आहे. तसेच इंद्रियांपासून सुख घेण्याची प्रवृत्ती क्षीण होणे, आपल्याला हे हवे ते नको असे विचार शांत होणे, त्याचप्रमाणे हे सर्व दृष्य, हे सर्व दृष्य जगत आपल्या देहासकट त्याची किंमत आत्मज्ञानापेक्षा कमी आहे असे वाटणे, मन कशातही गुंतून न रहाणे यालाच वैराग्य म्हटले जाते.

चित्ताचे सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. या तीन गुणांपैकी ज्या गुणाचे प्राधान्य चित्तात असते त्याप्रमाण त्याच्या चित्तात सात्विक, राजस आणि तामस अशी वृत्ती निर्माण होते. तर विवेकाने काया, वाचा, मन यांचे दमन केलं पाहिजे. वाणीचं दमन म्हणजे वाकदंड. मनाचे दमन म्हणजे मनोदंड आणि शरीराचे दमन म्हणजे कायादंड. मनुष्याच्या बुध्दीत हे जे तीन प्रकार आहेत त्याना त्रिदंडी असे म्हटले जाते. तरी ह्या तिन्ही दंडाच्या सर्व भुतांच्या रक्षणासाठी प्रयोग करणारा मनुष्य काम क्रोधाच्या संयमाने मोक्ष रूपी सिध्दी मिळवतो. तर सत्व, रज आणि तम ह्या तीन गुणांपैकी ज्या गुणाचे अधिक्य चित्तात असेल त्याप्रमाणे त्याच्या चित्तात सात्विक, राजस आणि तामस ह्या वृत्ती उत्पन्न होतात, त्याना अनुक्रमे सात्विक म्हणजे शांत, राजस म्हणजे घोर आणि तामस म्हणजे मूढ वृत्ती म्हटले जाते.

भग्वदगीतेत भगवंतांनी अमानित्वादि गुणविषयक वृत्ती ह्यांना शांत वृत्ती असे म्हटले आहे. तर काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, दंभ, असूया ह्या राजस म्हणजे घोर वृत्ती आहेत. त्याचप्रमाणे प्रमाद, आळस, मूढ, दुशचिंतता, निद्रा इत्यादी वृत्तींना तामस म्हणजे मूढ वृत्ती म्हटले जाते. आता सत्वगुणाचे लक्षण काय, तर एक वस्तू आहे त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान होणं, परमेश्वराच्या ठिकाणी प्रिती. हि प्रिती म्हणजे क्लेश रहित असणं. त्याचप्रमाणे वेदांचा अभ्यास, तप, शास्त्रीय ज्ञान, शुध्दता, इंद्रियनिग्रह, धर्मनिष्ठा आणि परमेश्वराचे चिंतन हे सत्व गुणामुळे होत.

रजोगुणांचे लक्षण पाहू या. प्रिती आणि विषाद परमेश्वराच्या ठिकाणी दु:ख उत्पन्न करणारी संवेदना. परमेश्वरावरील प्रिती दूर करणारी आणि विषय इच्छा वाढविणारी वृत्ती. अमूक फळ प्राप्त व्हावे म्हणून ते फळ मिळविण्यासाठी काम करणे आणि ती लहान वस्तू प्राप्त झाली नाही तर गलीत धैर्य होणे, निषिध्द असलेल्या कर्माचे आचरण करणे आणि नेहमी विषय भोगासाठीच तत्पर असणे ही रजोगुणी लक्षणं आहेत.

तमोगुणाची लक्षणं: वस्तूचे यथार्थ ज्ञान होणं हे सत्व गुणाचे लक्षण आहे तर त्याच्याविरुध्द अयथार्थ ज्ञान होणं हे तमोगुणाचे लक्षण आहे. त्याचप्रमाणे सारासार विचार न करता अस्पष्ट स्वभावात वावरणारी व्यक्ती अंत:करण, बाह्य इंद्रिये ही ज्ञान ग्रहण करण्यास असमर्थ असलेली आणि जिचे स्वरुप कोणत्याही तऱ्हेने ओळखता येत नाही ती संवेदना तमोगुण रूप होय. तर चित्तात घोर आणि मूढ वृत्ती जास्त प्रमाणात नांदत असतात त्याचप्रमाणे त्याचे चित्त आणि इंद्रिय ही स्वभावताच बहिर्मुख असल्यामुळे त्यांची धाव बाहेर असते. ही चित्ताची अशुध्दता आहे. जर आपल्याला ही बाहेर जाणारी धाव आवरून धरायची असेल तर त्यासाठी संयमाची आवश्यकता आहे. यासाठी आपल्यामध्ये सत्वगुणाची वाढ झाली पाहिजे. कैवल्यप्राप्तीसाठी बाहेर जाणारी धाव आवरुन धरायची असेल तर आपण पौरुष प्रयत्नांनी यम आणि नियम यांचे अनुष्ठान केलेच पाहिजे.

योगाची आठ अंगे आहेत. यम, नियम, आसन, प्राणायाम, साधना, धारणा, ध्यान व समाधी ही योगाची आठ अंग आहेत. नेहमी चंचलतेने सर्वत्र विहार करीत असलेल्या चित्ताला निरोध करणे म्हणजेच योग. हा योग जर आपण साधला तरच जीवाचे अज्ञान जाऊन ज्या अविद्या मायेमुळे जीव जन्म मरणाच्या भोवऱ्यात सापडला आहे त्या संसार चक्रात संसाराच्या दुष्टचक्रातून जे दु:ख भोगत आहे ते नाहीसे होऊन त्याला मुक्ती प्राप्त होऊ शकेल. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी | तेणे मुक्तिचारी साधियेल्या | तर या चार मुक्ती कोणत्या ते आपण पाहू.

एक सलोखता, दोन समिपता, तिसरी स्वरुपता, चौथी सायुज्य. सलोखतेच्या अवस्थेत भक्ताला मृत्युनंतर देवलोकात रहायला मिळते. दुसरी समिपतेच्या अवस्थेत भक्त ज्या देवतेची उपासना करतो, त्या

देवाच्या सहवासात त्याला रहायला मिळते. तिसरी स्वरुपता-भगवंताची भक्ती. भक्ती करणाऱ्या भक्ताला तो ज्या देवाची भक्ती करतो त्या देवाचे रुप येते. पण लक्षात ठेवले पाहिजे की, भगवंताची भक्ती करणाऱ्या भक्ताला जरी भगवंताचे रूप प्राप्त होत असले तरी त्याला साक्षात्कार होत नाही. तर सलोखतेच्या अवस्थेत भक्त देवलोकात रहातो. समिपतेच्या अवस्थेत ज्या देवाची भक्ती करतो त्या देवाच्या सहवासात रहातो आणि स्वरुपतेच्या अवस्थेत तो अंतर्बाह्य भरुन जातो. तर ह्या भगवंतावरील प्रेमाच्या चढत्या अवस्था आहेत. ह्या तीन्ही मुक्ती साधलेले लोक पुण्यवान तर आहेच, परंतु भक्ताला त्याच्याही पलिकडे जावून परमात्मस्वरुपात विलीन व्हावे लागते. तर सगुणातून निर्गुणात येथेच भक्ताने न थांबता त्याच्याही पलिकडे आपली आत्मबुध्दी नेणं आवश्यक आहे. त्याचे कारण याला एकच आहे. ते म्हणजे कल्पांताच्या वेळी सर्व विश्व नाश पावते, इतकेच काय पण सर्व देवही नाश पावतात तर अशा या संहारात पहिल्या तीन मुक्ती कश्या टिकणार? तर विश्व नाशानंतर फक्त निर्गुण परमात्मा स्वरुपच जशेच्या तसे रहातो. निर्गुणाची भक्ती तशीच रहाते. तर चंचलतेने सर्वत्र विहार करणाऱ्या चित्ताला आवरुन धरणं म्हणजेच योग साधण्यासाठी साधकाला यम आणि नियम याचं पालन केलचं पाहिजे. यम पाच आहेत आणि नियम पाच आहेत.

पाच यम कोणते तर अहिंसा, सत्य, आस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह. तर पाच नियम आहेत सौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्राणिधान.

शरीराला प्रत्येक अवयव महत्वाचा आहे. त्या प्रत्येक अवयवाची उपयुक्तता आहे त्याचप्रमाणे योग्याला (भक्ताला) यम आणि नियमाची आवश्यकता असते. मात्र आपण एक गोष्ट लक्षात ठेवा की, सर्वच अंगे सारखीच महत्वाची आहेत असे मात्र समजू नका. पण आपण यमाचे अनुष्ठान केलेचं पाहिजे. आपण जर यमाचे आचरण केले नाहीत तर योगात विघ्ने उत्पन्न होतील. साधकाचा भक्तीमार्ग भ्रष्ट होईल व त्याचे पतन होईल. एक वेळ नियमांचे आचरण आपली परिस्थिती असेल त्याप्रमाणे केले तरी चालेल आणि साधनेसाठी आता नियमापैकी ध्यान, धारणा आणि समाधी हे नियम अत्यंत आवश्यक आहेत. या पाच यमापैकी, अहिंसा आणि ब्रम्हचर्य यांचे निष्ठापूर्वक जर पालन केले तर नंतर जे तीन यम आहेत त्यांची अनुष्ठाने निर्विघ्नपणे सुखकर होतील.

**यम:**

१) **अहिंसा**: माणसाच्या हातून जी जी कर्म घडत असतात त्या कर्मांचा संबंध शरीर, वाणी आणि मन यांच्याशी येतो. परमेश्वर प्राप्तीसाठी वाटचाल करणाऱ्या भक्ताने आपल्या शरीराने, वाणीने, मनाने इतरांना दुःख होणार नाही असे आचरण केले पाहिजे. इतरांना म्हणजे केवळ माणसानांच नव्हे तर इतर प्राणी, पशु, पक्षी, कृमी, किटक, वृक्ष, लता इत्यादिकांना सुध्दा आपल्याकडून दुःख होणार नाही याकडे फार लक्ष दिले पाहिजे.

**कायीक अहिंसा** - म्हणजे शारीरिक कर्मामुळे इतरांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पिडा होणार नाही असे वागणे हौ कायिक अहिंसा.

**वाचिक अहिंसा** - आपल्या बोलण्याने दुसऱ्याला दुःख होईल असे खोचक, मर्मभेदी भाषण करणे, कोणाला घालून पाडून बोलणे, कडक कठोर बोलणे, दुसऱ्याची कुचेष्टा, निंदा करणे ही वाचिक हिंसा होय.

२) **सत्य**: आपल्याला एखाद्या गोष्टीचे सत्य ज्ञात झाले असेल आणि ते दुसऱ्याला सांगायचे असेल तर आपण जसं पाहिलं ते त्या माणसाला समजेल त्याला बोध होईल असेच बोलले पाहिजे. पण एखाद्यावेळी असाही प्रसंग येतो की, आपण जर खरं बोललो तर त्याला दुःख होण्याचाही संभव असतो. मग अशा वेळेला आपल्याला प्रश्न असा पडतो की दुसऱ्याचे मन दुखावले तर आपल्याकडून वाचिक हिंसा होईल व अहिंसा व्रताचा भंग होईल; तर सत्य व्रताचे आचरण करणे अतिशय कठिण आहे. यासाठी महाभारतकार व्यासांनी भाषणाविषयी मर्यादा सांगितलेली आहे. त्याप्रमाणे भाषण करण्याचे धोरण ठेवले पाहिजे.

*सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयात न ब्रूयात्सत्यम् प्रिया |*

*प्रियंत् ना कृतं ब्रूयात येनधर्मः सनातनः ||*

याचा अर्थ असा आहे की, सत्य आणि प्रिय असेल तेच बोलावे. सत्य आहे पण अप्रिय आहे ते बोलू नये. प्रिय असेल पण खोटे असेल तर तेही बोलू नये; हा सनातन धर्म आहे. अर्थात या सर्व गोष्टी जर जपणार नसतील तर मौन पाळावे. आपल्या आचरणाने इतरांचा गैरसमज होईल, असे वागणे म्हणजे अहिंसा व्रताचा भंग करणे होय.

३) **अस्तेय**: ईश्वरी योजनेनुसार देहपोषणासाठी त्याचे वर्धन, त्याचे रक्षण होण्यासाठी आणि सृष्टि नियमानुसार नियोजित कार्य घडून यावे म्हणून आवश्यक असलेल्या भोगाव्यतिरिक्त अधिक भोग न घेणे हे अस्तेय होय.

४) **स्तेय**: आपल्या देहात जी इंद्रिये आहेत त्यांचे योग्य प्रकारे पोषण व्हावे आणि त्यांच्याद्वारे नित्य-निमित्य कर्त्तव्य आपल्या हातून नीट पार पाडावीत म्हणून अन्न आणि वस्त्र यांचा आवश्यक तेवढाच विचार करावा. पण अती आसक्तिमुळे माणसे अधिक विषयांचा अधिक प्रमाणांत उपभोग घेतात. दुसऱ्याच्या वस्तुचा त्याला न विचारताच न कळविता उपभोग घेतात म्हणजे चोरी करतात याला स्तेय म्हटले जाते. तर देहाचे पोषण, रक्षण आणि त्यायोगे सृष्टी नियोजित कर्मे यथासांग घडावी म्हणून आवश्यक असलेल्या भोगाव्यतिरिक्त अधिक भोग न घेणे हे अस्तेय होय.

५) **ब्रम्हचर्य**: भगवंताने ह्या सृष्टीमध्ये अनंत कोटी जीव निर्माण केले आहेत. त्या जीवांचे रक्षण व्हावे व त्यांच्या वंशाचे जनन कार्य व्हावे अशी निसर्गाची योजना आहे. ज्याप्रमाणे पिंडाच्या रक्षणासाठी अन्न, पाणी आणि वस्त्रे इत्यादिकांची अशी आवश्यकता आहे; त्याचप्रमाणे जातीच्या वंश रक्षणासाठी जनन कार्याची सुध्दा आवश्यकता आहे. म्हणून जनन कार्याद्वारे जातीचे सातत्य टिकविण्यासाठी निसर्गाने स्त्री आणि पुरुष पिंडाची म्हणजे नर आणि मादीची निर्मिती केली आहे. ते एकत्र आल्यावर संयोग होऊन पिंड निर्माण होतो. परमेश्वराने या दोघांच्या ठिकाणी पराकाष्ठेचे आकर्षण निर्माण केले आहे. या आकर्षणामुळे नर आणि मादी एकमेंकाकडे आकर्षिली जातात आणि त्यांचा संयोग होऊन पुरुष-स्त्री बीजाचे एकीकरण होऊन पिंड निर्माण होतो. मानवी प्राण्यात पुरुषापेक्षा स्त्रीच्या पिंडात शरीर सौष्ठव अधिक करण्याची शक्ती अधिक प्रमाणात मिळते. तसे पाहिले तर पशुपक्ष्यांच्या ज्या जाती आहेत त्यामध्ये मादीपेक्षा नरात आकर्षण जास्त असते. उदाहरण द्यायचे असेल तर प्राण्यात हरिण-काळविट, सिंह-सिंहीण, बैल-गाय आणि पक्षांमध्ये मोर-लांडोर, कोंबडा-कोंबडी इत्यादी जोडपी आहेत. त्यात नराच्या ठिकाणी शरीर सौष्ठव शारिरीक गुण जास्त श्रेष्ठ आहेत; हे आपल्या पाहण्यात येते. पण मानवातच निसर्गाने हा पक्षपात कां केला, असा आपल्याला प्रश्न पडतो. मानवाच्या ठिकाणी उलटा पालट करण्यांत निसर्गाचा काही हेतू असला पाहिजे. मनुष्य जातीत पुरुषाच्या बुध्दिचा विकास झाल्यानंतर मनुष्य वैषयिक सुखापेक्षा वैचारिक सुखाकडेच जास्त ओढला जातो. कारण मानवी विकासाचे हे फळ आहे. तर श्रेष्ठ प्रतीची मानसिक बौध्दिक सुखं जर मनुष्याला मिळू लागली तर मनुष्य वैषयिक सुखाकडे दुर्लक्ष करील आणि स्त्री जवळ संयुक्त होण्यास स्पर्श सुखासाठी किंवा वैषयिक सुखासाठी आकर्षण त्याला अपुरे पडेल. त्यामुळे निसर्गनियोजित वंश रक्षणाचे कार्य आहे ते मंदगतीने झाल्याने त्याचा ऱ्हास होऊन शेवटी वंशाचा संपूर्ण क्षय होण्याचा दुर्धर प्रसंग निसर्गाला पहावा लागला असता. म्हणून असा प्रसंग ओढवू नये यासाठी स्त्री पिंडाच्या ठिकाणी अनेक आकर्षक गुण निसर्गाने निर्माण केलेले आहेत. स्त्रीच्या ठिकाणी चंद्रबिंबाचे स्पर्धा करणारे मुखकमल, हस्तपादादि सुकोमल अवयव, सर्वांगाचे नयनमनोहर सौष्ठव, मोहक चाल इत्यादी मनुष्याला मोहीत ठेवणारे अनेक गुण एकवटून निसर्गाने स्त्री देह निर्माण केला आहे. पुरुषांच्या चित्तात जोपर्यंत अध्यात्मिक आणि बौध्दिक मूल्यांचा उदय झालेला नसतो तोपर्यंतच चित्ताला मोहविणारे गुण असलेली स्त्री पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या विकारांचा प्रक्षोभ करण्याला कारण होते. तर विकाराचा प्रक्षोभ झालेला पुरुष स्त्रीकडे आकर्षिला जातो आणि तो पुरुष स्त्रीकडे शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध या स्त्रीकडे पाचही गुण असणाऱ्या आकर्षणामुळे तो अनेक पटीने आकर्षिला जाऊ लागला त्यामुळे अशा मोहाने आकर्षित झालेल्या माणसाला या आकर्षणापासून आवरणे महाकठिण कर्म होऊन बसलेलं आहे. तर निसर्गाने केलेल्या या आवरण्यास कठीण असलेल्या या मोहाला आवरुन विषयावर संयम पाळणे याला ब्रम्हचर्य म्हटले जाते.

जर ब्रम्हचर्य पाळले गेले तर सर्व यम आणि नियम पाळण्यासाठी आवश्यक असलेले मनोधैर्य आपोआप या जीवाच्या अंगी येईल. जीवाने यम नियम कितीही आस्थेने आणि कठोरतेने पाळले आणि ब्रम्हचर्याचे पालन केले नाही तर भक्तीयोगातील प्रगती खुंटेल. साधक योगभ्रष्ट होईल. "यदिच्छन्तो ब्रम्हचर्य चरन्ति' असे ब्रम्हचर्य व्रताचे महिमान वेदांनी केलेले आहे. ज्या साधकाची बुध्दी बऱ्याच वरच्या विकसित अवस्थेत झालेली असते असा माणूस बुध्दिग्राह्य सुखाच्या मागे लागलेला असतो आणि त्यामुळे तो साधक स्वभावताच अनित्य आणि क्षुद्र असे जे इन्द्रिय ग्राम विषयी सुखं आहेत त्यांना तो तुच्छ लेखतो व त्यापासून तो परन्मुख होतो. जर माणसाची

अशी अवस्था झाली तर काय होईल? तर निसर्गाला पाहिजे असलेले वंश रक्षणाचे प्रजनन कार्य बंद पडून प्रजातंतू विच्छिन्न होण्याचा प्रसंग ओढावेल. असा प्रसंग ओढवू नये म्हणून 'विद्वा समपि कर्षति' म्हणजे विद्वानाला सुध्दा ओढून घेण्याची शक्ती निसर्गाने स्त्रीच्या ठिकाणी निर्माण केली आहे. वंश विच्छेद होऊ नये म्हणून शास्त्रांनी सांगितले आहे. 'प्रजातंतू मा व्यवच्छेसी' म्हणजे प्रजातंतूचा विच्छेद करु नकोस. 'अनुत्पाद्य तथा सुतान्मोष्यम्तिछ: व्रजत्यय:' म्हणजे पुत्रोत्पादन केल्यावाचून मोक्षाची इच्छा करणारा अधोगतिला जातो किंवा 'पुत्रोच्छश्र्वोत्पाद्य धर्मत: मनोमोक्षे निवेशयेत:' धर्मानुसार पुत्र संतति निर्माण करुन मग मोक्षाकडे लागावे. अशा प्रकारच्या शास्राज्ञा केलेल्या आहेत.

या आज्ञा कोणासाठी केलेल्या आहेत? जे लोक संयमशील आहेत. जे लोक सुसंस्कृत आहेत, ज्यांची बुध्दी विकसित झाली आहे; अशा मुमुक्षू साधकाला प्रजातंतूचा उच्छेद होऊ नये म्हणून श्रृतीनी हा उपदेश केला आहे. पण सामान्य माणसाला अशा उपदेशाची आवश्यकताच नसते. कारण ह्या माणसांचा जीवनक्रमच मुळी भोगप्राप्तच्या दिशेनेच चाललेला असतो. स्त्रीयांपासून रुप, रस, शब्द, सर्श आणि गंध या पाचही विषयांचे आकर्षण पुरुषाला असल्यामुळे व ते भोग भोगल्यामुळे क्षणिक सुखाचा आभास का होईना पण पुरुषांच्या पांचही इंद्रियांची तृप्ती होत असते. अशी माणसे शरीर रक्षणासाठी आवश्यक असलेल्या अन्न आणि वस्त्रे यांची तरतुद झाल्यानंतर स्वाभाविकच ती माणसं विषयसुखासाठी स्त्रीकडे ओढली जातात. त्यांना विषय सेवनापासून जे सुख मिळते त्या सुखाच्या पलिकडे त्यांना दुसरं काहीच दिसत नाही. असा हा मानव योगाभ्यासाला आणि ब्रम्हचर्य व्रताला अपात्र आहे. तो ब्रम्हचर्य आचरणाला अधिकारी होऊच शकत नाही; आणि अशाही साधकांना उपदेशाची आवश्यकता नसते की ज्या साधकांनी चित्ताची एकाग्रता संपादन केली आहे.

चित्तवृत्ति निरोध केल्यामुळे त्यांना उत्तरोत्तर अध्यात्मिक सुखाचा आस्वाद मिळू लागलेला आहे. अध्यात्मिक सुखाचा आस्वाद मिळू लागल्यामुळे तो साधक विषयी सुखापासून आपोआप निवृत्त होतो. तर अशा साधकाला उपदेशाची आवश्यकताच नसते. कारण तो जे ब्रम्हचर्य पाळत असतो ते व्रत आहे. अशी भावनाच त्याच्या चित्तात नसते.

ज्ञानेश्वर माऊलीच्याच शब्दात सांगायचे झाले तर, ज्याचा जठर अमृताचा निर्झर प्रसवतो त्याला क्षुधा-तृषेची पीडा कोठून होणार? अर्थात जे जीवन मुक्त पुरुष आहेत ते ब्रम्हचर्याविषयी जो उपदेश केला जातो; त्याच्या पलीकडे गेलेले असतात. तर आता उपदेशासाठी राहिले कोण? तर जे लोक चित्ताची एकाग्रता चित्तवृत्ति निरोध संपादन करण्याच्या इच्छेने योग्याभ्यास करण्याला प्रवृत्त झालेले आहेत असे मुमुक्षू. अशा मुमुक्षूची अवस्था अशी असते की, त्याला विषय सुखाचा कंटाळा आलेला असतो. पण पूर्वजन्मीच्या वासनांमुळे तो अनिच्छेने कां होईना विषयसुखाकडे ओढलाच जातो. हे जरी असले तरी सुध्दा आपल्याला योगामुळे मिळणारी श्रेष्ठ प्रतीची सुखं ही मिळावीत या आशेने तो योगाभ्यासाला प्रवृत्त होतो. परंतु प्रथम त्याला चित्ताची एकाग्रता आणि चित्तवृत्ती निरोध या पासून मिळणाऱ्या शांती सुखाचा अनुभव मिळण्याइतकी त्याची प्रगती झालेली नसते. म्हणून अशा साधकांनां मात्र ब्रम्हचर्य व्रत पाळण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तर असे साधक यम आणि नियम यांच्या अनुष्ठानांचा उपदेश करण्याला योग्य असतात. तर ब्रम्हचर्याचा अभ्यास करीत असताना साधकाने आपली संयम शक्ती हळूहळू पण निश्चयाने वाढविली पाहिजे. साधकांनी पाच यमांचे अनुष्ठान पाळणे आवश्यक आहे. पतंजलीनी ब्रम्हचर्य व्रताला 'महाव्रत' असे म्हटले आहे. तरीसुध्दा ज्यांच्या हातून अत्यंत कडक असं महाव्रत पाळणे कठीण जाईल म्हणून शास्त्रकारांनी विचार करुन थोडी सवलत दिली आहे. शास्त्रकारांच्या मते स्त्रीचा ऋतुकाळ म्हणजे मासिक रजोदर्शन झाल्यापासून सोळा रात्रीपर्यंत असतो. संततीप्राप्तीसाठी संयोग व्हायला पाहिजे असेल तर तो संयोग याच काळात झाला पाहिजे. ह्या ज्या सोळा रात्री आहेत; त्या पैकी पहिल्या चार रात्री स्त्री मलिन अवस्थेत असते आणि शरीर व मनही थोडे अस्वस्थ असते. म्हणून या चार रात्री संयोगास सर्वथा वर्ज मानलेल्या आहेत. तसेच या चार रात्रीप्रमाणेच अकरावी आणि तेरावी ह्या दोन रात्री सुध्दा धर्मशास्त्रकारानी वर्ज्य सांगितल्या आहेत. तर सोळा रात्रीतून पहिल्या चार आणि अकरावी व तेरावी ह्या दोन मिळून जर सहा रात्री वगळल्यास दहा रात्री उरतात. ह्यानंतर अष्टमी, चतुर्दशी, पोर्णिमा, अमावस्या ह्या पर्वतिथी या कार्याला वर्ज्य केल्या पाहिजे.

वर सांगितलेले नियम पाळून ज्या रात्री उरतील त्या रात्रीपैकी कोणत्याही दोन रात्री सर्व मर्यादा सांभाळून स्त्री संयोग केल्यास “ब्रम्हचार्येन भवति यत्र यत्राश्रमे वसन' म्हणजे तो सपत्नीक साधक कोणत्याही आश्रमात असला तरी तो ब्रम्हचारी होय. शास्त्र सांगत की, साधकाने ब्रम्हचर्यपूर्वक जर वेदाध्ययन आणि योगानुष्ठान केलं तर तो साधक देव आणि ऋषी यांच्या ऋणातून मुक्त असले तरीसुद्धा तो पितरांच्या ऋणातून मुक्त झालेला नसतो. तर धर्मशास्त्राचा असा अभिप्राय आहे की,

*'ऋणानी त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयत |*

*अनापाकृत्य मोक्षंतु सेवमानो वजत्यधः |*

तर देव, ऋषी आणि पितरं या तीनही ऋणांची फेड करुन मग मोक्षाकडे लागावे, ही ऋती वचने न घेताच जो मोक्षाकडे वळतो तो अधोगतीला जातो. म्हणून सर्व नियम पाळून ब्रम्हचर्य व्रताचे पालन करावे. या ब्रम्हचर्य व्रताने योगाभ्यासात प्रगती होईल.

वर सांगितलेले निर्बंध पाळण्यासाठी साधकाच्या ठिकाणी फार मोठ्या मनोधैर्यांची आवश्यकता आहे. मनोधैर्य आणि संयम ज्या साधकांच्या ठिकाणी असेल त्यांनाच योगप्राप्ती होईल आणि नसेल त्यांना योगप्राप्ती कधीही होणार नाही. तरीसुध्दा त्यांनी संयमाचा थोडा थोडा चढता अभ्यास करीत जावा. आपला हा प्रयत्न जरी या जन्मी पूर्णपणे सफल झाला नाही तरी सुध्दा भगवंतांनी गीतेत सांगितलेल्या वचनाप्रमाणे

*"तत्रंम तं बुध्दीयोगे लभते पौरदेहीकम्"*

या गीतावचनाप्रमाणे या जन्मात नाही तर पुढच्या जन्मात ते प्राप्त होईल. आपला प्रयत्न सफल होईल असा विश्वास बाळगून कोणत्याही प्रकारे आपण आपल्या साधनेत खंड पडू देता कामा नये. सतत प्रत्येक दिवशी नियमित वेळी योगाभ्यास करावा.

*ॐ पूर्णमदः पूर्णःमिंद पूर्णातपूर्णमुदच्यते |*

*पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाव शिष्यते ||*

भगवंत पूर्ण आहे. तो परिपूर्ण असल्यामुळे त्याच्या पासून निर्माण होणारे सर्वकाही पूर्ण दृष्य जगत आहे, ते सुध्दा पूर्ण पाहिजे. पूर्णापासून निर्माण होणारे ते सुध्दा संपूर्णच असते. भगवंत परिपूर्ण असल्यामुळे त्याच्यापासून अनेक पूर्ण एक एक असे निघत असून ते संपूर्णच आहे.

# प. पू. सद्गुरु श्री सिद्धयोगेश्वर महाराज
## अमृत महोत्सव समितीतर्फे



- स्मरणिकेला उदार अंत:करणाने दिलेल्या सर्व जाहिरातदारांचे,
- स्मरणिकेसाठी जाहिरात गोळा करणाऱ्या बाबांच्या सर्व साधकांचे, हितचिंतकांचे,
- अमृतमहोत्सव कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांचे,
- कार्यक्रमाप्रसंगी ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल....



## हार्दिक आभार !



Copyright © ghagmaharaj.guru